॥ ॐ नमो श्रीआद्या ॥

श्रीज्ञानदेव सिद्धबेट तपोवन

ज्ञान-योग-अध्यात्म विद्यापीठ प्रतिष्ठानचे मुखपत्र

# ॥ बापरखुमादेविवरु ॥

सद्गुरु श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या तत्त्वज्ञान आणि साहित्य-परंपरेच्या सर्वांगीण अभ्यासाला वाहिलेले एकमेव मराठी मासिक

**खण्ड ९ । अंक ९**

वटपौर्णिमा

ज्येष्ठ शु.१५ , दिनांक : ७ जून २००९

मूल्य : रु. २०

वार्षिक शुल्क : रु.१७५

द्विवार्षिक शुल्क : रु. ३००

**संस्थापक**

वै.श्रीसंत प.पू.श्री.श्री.द.(मामा) देशपांडे

**संपादक**

शिरीष शांताराम कवडे

**सहसंपादक**

सौ.शकुंतला जयंत आगटे

**कार्यकारी संपादक**

डॉ.प्रल्हाद वडेर

**व्यवस्थापक**

निरंजन कुलकर्णी

वसंत महादेव पाटणकर

**मुखपृष्ठ आणि सजावट**

विजय गडकरी

**॥ श्रीवामनराज प्रकाशन ॥**

'श्रीगुरुकृपा', श्रीसंत मामासाहेब देशपांडे पथ,

आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०५१

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी अध्यक्ष, विश्वस्त व संपादक सहमत असतीलच असे नाही.



**वाचकांच्या माहितीकरिता**

'बापरखुमादेविवरु' या मासिकाचे मराठी महिन्यांप्रमाणे अनुक्रमे दर महिन्याला एक यानुसार वर्षाचे बारा अंक प्रसिद्ध होतील. वर्षारंभ आश्विन अंकापासूनच होईल. वार्षिक शुल्क एकशे पंचाहत्तर रुपये. द्विवार्षिक शुल्क केवळ तीनशे रुपये. किरकोळ अंकाचे मूल्य केवळ वीस रुपये.

# अनुक्रमणिका


- **सांडूनि कवणा भजावे : २५ ।** श्री.भालचंद्र बुर्से ४
- **श्रीक्षेत्र आळंदीमाहात्म्य ।** एक अप्रकाशित हस्तलिखित २०
- **संत तुकाराम आणि संत कबीर ; चरित्र व वाङ्मय : ११ ।** डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर २६
- **कर्म : जीवनाचे मुख्य सूत्र ।** डॉ.सौ.सुनीता तांबे ३८
- **तयातें मी माथां मुकुट करीं ।** ह.भ.प.श्री.राजेंद्र गणपत दहिभाते ४२
- **भारत सावित्री ।** प्रा.माधव ना.आचार्य ५०
- **स्वानंदसुखाची ठेव : 'श्रीज्ञानेश्वरी' ।** डॉ.शरद दामोदर महाजन ६२
- **अमृतानुभवातील भावसौंदर्य ।** डॉ.यशवंत साधु ६९
- **संतसाहित्याची फलश्रुती ।** प्रा.म.अ.कुलकर्णी (स्वामी प्रज्ञानंद) ७९




# संपादकीय

आज ज्येष्ठ पौर्णिमेच्या, 'वटपौर्णिमे'च्या सुमंगल, पावन पर्वावर, **'बापरखुमादेविवरु'**चा नवव्या वर्षीचा हा नववा अंक आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे.

या अंकातील, वैविध्यपूर्णतेने नटलेले सर्वच लेख वाचक-अभ्यासकांना निश्चितपणे सुखावतील, याची खात्री वाटते.

'धर्म'संकल्पनेसंदर्भात अतिशय अभ्यासपूर्ण आणि सुसूत्र मांडणी असणारा प्रा.माधव ना.आचार्य यांचा **'भारत सावित्री'** हा लेख अभ्यासकांना चिंतनाची एक नवी दिशा देईल.

डॉ.यशवंत साधु यांचा **'अमृतानुभवातील भावसौंदर्य'** हा लेख देखील, श्रीमाउलींच्या 'अमृतानुभव' ग्रंथाची त्यातील तत्त्वज्ञानाबरोबरच काव्य-सौंदर्याच्या अंगानेही चर्चा करणारा असा अतिशय सुंदर उतरलेला आहे.

**'सांडूनि कवणा भजावे'** या श्री.भालचंद्र बुर्से यांच्या लेख-मालिकेतील, श्रीसंत मीराबाईंचा दक्षिणेतील अवतार मानल्या जाणाऱ्या भगवती आंडाळ यांचा परिचय घडवणारा लेखही अतिशय सुरेख आणि नावीन्यपूर्ण असाच आहे.

महाराष्ट्र भूमीतील संतसाहित्याचा धांडोळा घेणारा प्रा.म.अ.कुलकर्णी (स्वामी प्रज्ञानंद) यांचा **'संतसाहित्याची फलश्रुती'** हा लेख; आणि श्रीसंत तुकाराम महाराजांचे कार्य, साहित्य आणि जीवनचरित्र यांचे चिंतन घडविणारा ह.भ.प. श्री.राजेंद्र दहिभाते यांचा **'तयातें मी माथां मुकुट करीं'** हा लेख; हे दोन्हीही लेख देखील अतिशय वाचनीय झाले आहेत.

सरते शेवटी; वाचनसुखाची रससोय घडवणारा हा अंक आपल्या हाती ठेवून, पुढील अंकापर्यंत आपली रजा घेतो !

**पुणे :** **- शिरीष शांताराम कवडे**

'वटपौर्णिमा',
ज्येष्ठ शु.१५, श्रीशके १९३१
दिनांक : ७ जून २००९



# सांडूनि कवणा भजावे

**लेखांक : २५**

श्री.भालचंद्र बुर्से

---

भगवद्भक्तिभूषण विष्णुचित्त आळवारांची कन्या आणि भगवान श्रीकृष्णांची कांता असणाऱ्या भूदेवी भगवतीचा अवताराविष्कार असणाऱ्या आंडाळ गोदादेवींना शतशः नमस्कार ! जन्मापासूनच माधुर्याच्या भक्तिमस्तीत अविरत कालक्रमणा करणाऱ्या, सर्व तमिळ आळवारांना भूषणभूत असणाऱ्या, या तमिळ मीरेला आमचे साष्टांग अभिवादन असो !

श्रीपराशर भट्ट म्हणतात;

**नीलातुंगस्तनगिरितटी सुप्तं उद्बोध्य कृष्णं ।**
**पारार्थ्यं स्वं श्रुतिशतश्रिस्सिद्धम् अध्यापयन्ती ।**
**स्वोच्छिष्टायां स्रजिनिगलितम् या बलात्कृत्य भुङ्क्ते ।**
**गोदा तस्यै नमः इदमिदं भूय एवास्तु भूयः ॥**

भगवती गोदादेवीचा जयजयकार असो. तिच्या चरणी आमची अखंड नमनावली चिरकालत्वाने गर्जत, जयजयकार करीत समर्पित होवो. श्रीकृष्णचरणी माधुर्यभक्ती नवनीत जिने आपल्या श्रुतिसिद्ध वेदवाणीने जागृत केले, तिचा जयजयकार असो. भगवती नीलादेवींच्या वक्षरूपी शेषाचलावर समाधिनिद्रेत पहुडणाऱ्या भगवान श्रीकृष्णांना जिने आपल्या माधुर्य-प्रेमबंधाने अंतर्बाह्य जागृत केले, त्या भगवतीला नमस्कार ! 'माझे आत्मस्वरूप त्याच्यासाठी आणि त्याचेच सदान्कदा सर्वकाळ;' अशा प्रपत्तीपूर्वक प्रचितीचा जिचा अखंड त्रिपरिच्छेदरहित अनुभव; जिच्या गळ्यातील सुगंधी सुमनांसहित, तुळशीमंजिरींसह डुलणाऱ्या हाराची साक्षात् भगवंतांना बेचैन करणारी आणि त्यांचे एकमेव समाधान करणारी आंतरिक ओढ, त्या भगवती माधुर्यभूषणरत्न आंडाळदेवीला आमचे निरंतर नमस्कार असोत ! (स्वैर अनुवाद.).

आम्ही विष्णुचित्त आळवारांच्या श्रीकृष्णभक्तिरसात अवगाहन केले ते वर्षा-दीडवर्षापूर्वी आणि भगवती गोदादेवीच्या माधुर्यरसाचे अनुपान **'बापरखुमादेविवरु'** प्रेमिकांसाठी घडविण्याचे आश्वासन दिले ते त्याच लेखाच्या अखेरीस. मध्यंतरी आमची नाथांवरची लेखनसेवा **'बापरखुमादेविवरु'**तून रुजू झाली. या अवधीत भगवतीकृपेने **'नाच्चियार तिरुमोई'**च्या एकशे त्रेचाळीस दिव्य प्रबंध-गीतांचे इंग्रजी भाषांतर आम्हांला प्राप्त झाले. एप्रिल, मे, ऑगस्ट १९९७ या महिन्यांचे गीताधर्म मंडळाच्या 'गीतादर्शन' मासिकाचे अंक आमच्याकडे होते. त्यात भगवती आंडाळदेवीच्या **'तिरुप्पावै'** नामक तीस प्रबंध-गीतांचा पूज्य जयश्री शंकरन् अम्मांनी केलेला स्वैर अनुवाद प्रसिद्ध झालेला होता. प.पू.श्री.शिरीषदादांच्या आज्ञेनुसार, काही आळवारांचा परिचय 'बापरखुमादेविवरु'च्या वाचकांना घडविण्याचा संकल्प आम्ही केला होता. गेली दोन अडीच वर्षे, आम्ही अम्मा जयश्री शंकर यांना भेटण्याच्या प्रयत्नात होतो; पण त्यांची भेट होऊ शकली नाही. या खटपटीत आमचे अंक आमच्याजवळ राहिले नाहीत. पण गतमासात, गीताधर्म मंडळ कार्यालयाच्या कार्यकर्त्या सौ.सुरेखा जोशी यांच्या सहकार्याने, हे साहित्य उपलब्ध झाले अन् सेवेला मुहूर्त लाभला.

साऱ्या गोपींनी माधुर्यरसाच्या परमानंदस्वरूप अनुभूतीचा आस्वाद रासलीलेत घेतला. त्या दृश्याला डोळेभरून अंतःकरणात साठवून ठेवण्यासाठी, देव-देवतांची आकाशात गर्दी झालेली होती. त्यांत होती भूदेवी. सारा रास साक्षात् नजरेतूनच काय, पण सर्व इंद्रियांच्या द्वारे भरभरून अंतःकरणात साठवून ठेवला होता भगवती भूदेवीने. गोपींची प्रिय भेट व्हावी म्हणून, साक्षात् भगवंत त्यांच्या दारात तासन्तास, दिवसेन्दिवस करुणा भाकत तिष्ठलेले. अशा लावण्यसम्राज्ञी गोपींची रासानुभूती भगवतीला ज्ञात. इतिहास मनःचक्षूंसमोर साकार होऊ लागलेला.

ज्ञानेश्वरमाउली चरणदास योगिवर्य श्री.अ.ना.भावे आपल्या सुलभ संक्षिप्त भागवतात म्हणतात;

**शांत दान्त सख्य वात्सल्य । आणि पाचवा भाव माधुर्य ।**
**या सकळांमाजी वरिष्ठवर्य । माधुर्य भाव बोलिला ॥१०.१३.२॥**
**या मधुर रसाची गोडी । नेणती इतर सामान्य हेंगडी ।**
**व्रजगोपींना त्याची आवडी । किंवा जाणे शुकनाथ ॥१०.१०.३॥**



क्षणभर देहभान नुरलेल्या शुकमुनींचे इतिहास-निरूपण, **'शुद्ध चित्ते परिसावा ।'** असे सांगणे.

**म्हणोनि कथा न हे वैषयिक । माधुर्य भाव उच्च आध्यात्मिक ।**
**विषय सांडोनी सकळिक । शुद्ध करा चित्त श्रवणासी ॥**

लीलाविग्रही सच्चिदानंदघन काया धारण करणाऱ्या भूदेवी भगवतीचे निरतिशय शुद्ध चित्त. तिला उलगडलेला हा दृश्येतिहास. शरद ऋतूची परिपूर्णता. साऱ्या वृक्षवल्ली तरारून प्रफुल्लित झालेल्या. सुगंधी सुमनांनी आसमंतात दरवळविलेल्या परिमलाचे जागृत चैतन्य. चंद्रम्याने पखरण केलेली, प्रणयी सिंचनात न्हालेली किरणप्रभा वृंदावनाने पांघुरलेली. केशरासारख्या किंचित् तांबूस, शीतल प्रकाशाने वातावरण व्यापलेले. यमुनेत वस्त्रविरहित अवस्थेत स्नान करणाऱ्या गोपींना वस्त्रे परत करताना दिलेले आश्वासन भगवंतमनी स्फुरले. आश्वासनपूर्तीचा समय समीप पातला.

अशा त्या रमणीय वातावरणात, भगवंतांनी आपल्या चिदानंदघन वेणुतून आनंदलहरींचा प्रवाहओघ पसरविण्यास सुरुवात केली. ते अनंगवर्धन वेणुवादन; त्याच्या त्या गुंजारवाने गोपी अवघे भान विसरल्या. देहराहित्य पूर्णपणे विकसित झाले. जीवभाव नुरला. विषयांचा ठाव समूळ नाहीसा झाला. चिदानंदाचा चिदानंदी व्यवहार सुरू झाला.

गोदोहन, दळण-कांडण, पतिसेवा, लहानग्यांना स्तनपान यांचा संपूर्ण विसर पडलेल्या गोपी, वृंदावनातल्या वेणू-सुरांच्या मूळ स्रोताकडे लीलाविग्रह धारण करून धावल्या. धावता धावता कृष्णध्यान. अंतःकरणात आलिंगन. ध्यान-आलिंगनाने पाप-पुण्यरहितता. ब्रह्मस्थितिप्राप्ती. त्यातील ही रासलीला अनुभूती. माउली श्रुतिवेदाधार.

**पाहें पां वल्लभाचेनि व्याजें । तिया व्रजांगनांचीं निजें ।**
**मज मिनलिया काय माझें । स्वरूप नव्हती ॥ज्ञाने.९.३२.४६५॥**

**'मुरली वाजविली श्रीकृष्णे । गोपींचे चित्त वेधले तेणें ॥'** गोपी श्रीकृष्ण मुक्कामी. भगवंतांनी केले स्वागत. प्रेमवर्धनार्थ भगवंतांनी स्त्रीधर्म सांगून परतण्याचा उपदेश वरवरच्या भावनेतून करून, त्यांचा कृष्णाश्वासनाच्या

पूर्तीचा अंकुर फुलविला. **'माझे करावे श्रवण मनन ध्यान, गुणसंकीर्तन । कासया इच्छावा समागम ।'** असे उपदेशून, समागम भावनाच चेतविली. मन हेच इंद्रियांचे अधिष्ठान; तेच भगवंतांनी हरण केलेले. वैषयिक समागमाची कल्पनाच स्फुरत नव्हती त्या गोपींना. सर्वव्यापक चिदानंदघनतेच्या स्फुरणामुळे लाभलेल्या एकदेशियतेला, (प्राधान्यत्वाने) आनंदलहरींना, वृत्तिस्फुरणाला, सर्वव्यापक तरी एकदेशीय अशा आनंदघन जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी व्यापून राहिलेल्या वृत्त्याधार श्रीकृष्णस्वरूपाचे ठायी मिळण्याची धावघाई झालेली होती. वृत्तिरूपाचे वृत्त्याधाराशी होणारे ऐक्यमीलन, तो समागम गोपींनी चाहलेला. त्वंपदाचे तत्पदी मीलन. आत्मस्वरूपाचे ब्रह्मस्वरूपाशी मीलन. भगवंतांचे हास्य, भगवंतांचे वेणुवादन, यांतून प्रदीप्त झालेला मदनाग्नी अधरामृताचे प्राशन करू इच्छित होता. प्रेमरस या ब्रह्मरसमयतेत स्वतःला पूर्णतया बुडवून, **'रसौ वै सः परमात्मा ।'** अशा श्रीकृष्ण-प्रेमरसाशी उसळ उसळून मिळण्याचा क्षण चाहत होता.

महामुनी शुकाचार्य, मानवी माधुर्य व्यवहाराचा आश्रय घेऊन विषय प्रतिपादतात. गोपी म्हणतात; ''तुझ्या कर्णांतील कुंडलांची आभा फाकली आहे. भुरुभुरु उडणाऱ्या कुरळ्या केसांच्या बटा झुलताहेत. सौंदर्याची परमसीमा असणाऱ्या या लीलाविग्रहावर आम्ही मोहित झालो आहोत. नव्हे नव्हे, सारा चेतन आसमंत मोहित झाला आहे. तू सर्व विश्वाचे रक्षण करतोस. आदिपुरुष तूच. महाविष्णू तूच. तूच सर्वांतर्यामी. तुझे माहात्म्य आम्हांस पूर्ण विदित. आमचा स्वीकार कर.

**त्यांचे ऐकोनि करुण वचन । स्वये असोनि आत्माराम ।**
**गोपींसवे झाला रममाण । भक्तकाम पुरविता भगवंत ॥**

नक्षत्रांनी वेढलेला चंद्र शोभावा तसे गोपींच्या गराड्यात श्रीकृष्ण भगवंत शोभू लागले. गोपींसवे वृंदावनात नाना विलास करीत बागडू लागले. विनोद, हास्य, आलिंगन, थट्टा, स्पर्श, कटाक्ष, चुंबन या सर्वांचा फुलोरा क्रीडेत फुलला. लावण्याचा सम्राट लावण्याच्या सम्राज्ञींबरोबर रमला.

परमविरहासक्तीच्या अनुभूतीसाठी, भगवंतांनी गोपींच्या ठायी क्रीडाभिमान स्फुरविला अन् भगवंत अदृश्य झाले. विरहाने व्याकूळ झालेल्या गोपी धरणीवर लोळण घेऊ लागल्या. **'आठवे कृष्णाचे अवलोकन । आठवे**



**कृष्णाचे सुहास्य वदन । आठवे कृष्णाचे मधुर भाषण । आठवे विनोद कृष्णाचा ॥' 'तेणे तन्मय गोपीजन । करिती लीलांचे अनुकरण ।'** अशी जणू भ्रमिष्टावस्था गोपींना प्राप्त झाली. चेतन-अचेतनांना हाकारून झाले. कुठे कृष्णाची आणि कोणा सखीची पदचिन्हे दृष्टीस पडली, केशकलापातील सुमनांची पखरण आढळली की, विरहात प्रेममूलक मत्सर उठून, विरहाग्नी अधिकच पोळू लागे. धावा सुरू झाला. विरहव्यथेची उत्कटता शिगेस पोहोचली. अन् 'गोपी गीत' श्रुती जन्मली. या श्रुतींनी श्रीकृष्णप्रेमिकांना अक्षरशः वेडे केले आहे. या गोपींच्या कृष्णप्रेमाचा हा विलक्षण आदर्श. परमोच्च बिंदू. काया-वाचा-मनेकरून कृष्णमेवता. स्वामी विवेकानंद म्हणतात;

"It is forgetfulness of everything, and the lover sees nothing in the world except that Krishna & Krishna alone. When the face of everything becomes Krishna, when his own face looks like Krishna, when his soul has become tinged with the Krishna-colour, when that madness comes in your brain, when you understand the blessed Gopies, there you will understand what (Krishna) Love is. When you have got that, you got Everything."

**जयति तेऽधिकं**... पासून **कूर्मादिमिभ्रमति** पर्यंतचे एकोणीस श्लोकांचे विरहासक्ती नवनीत भगवान श्रीकृष्णचरणी वाहिले गेले. मीलनाचा अभिमान समूळ लुप्त झाला अन् भगवंत प्रकटले.

**'श्रीशुक म्हणती ऐकता विलाप । प्रकट जाहला मदनाचा बाप । पीतांबरधारी वैजयंती धृत । प्रभा फाकली दश दिशी ॥'** निर्जीव देहात प्राण प्रवेशावा तशी अवस्था झालेल्या गोपी, **'लवलाही खडबडोनी उठल्या त्या ।'**. कुणी भगवंतांचा हात प्रेमाने आपल्या हातात हळुवारपणे घेतला. कुणी भगवंतांच्या पायांवर लोळण घेतली. कुणी आपल्या वस्त्रांच्या पदराने त्यांना वारा घालू लागल्या. तर धक्क्याने समाधिस्थ झालेल्या काहींची दृष्टी भगवंतांच्या आपादमस्तक सौंदर्याची सीमा असणाऱ्या लीलाविग्रहावर खिळून राहिली. कुणी प्रेमभरल्या लोचनांतून त्यांच्याकडे अनिमिष पाहात राहिल्या.

उघडे नयन ध्यानात तसेच राहिले. विरहाचे दुःख शमले. विरहाने व्याकूळ झालेल्या गोपींना भगवान श्रीकृष्णांची पुनःप्राप्ती झाली. कृष्णाकारता लाभली. त्या पूर्णकाम झाल्या. या पूर्णकाम अवस्थेतच रासलीला रसरसली.

प्रत्येक गोपीसाठी भगवंतांनी आपले वेगवेगळे पण ते तसेच रूप धारण केले आणि प्रीतिनर्तन सुरू झाले. वस्तुतः मध्ये श्रीकृष्ण भगवंत आणि फेर धरून साऱ्या गोपींचा प्रेमपदन्यास. पण प्रत्येक गोपीला ते आपलेच प्रत्ययले. बिंबाने प्रतिबिंबाशी भिडावे तशी क्रीडा झाली. साऱ्या उद्दीपन-भावांची एकवटून परमावधी झाली.

या प्रेमलहरीतल्या लहरींनी आकाश-प्रांगणात दाटीवाटीने दाटलेल्या देवदेवतांनाही पहुडवून घेतले. त्यांनाही प्रेमलहरींचा लाभ घडला. त्याही प्रेमधुंद झाल्या. मनोमन प्रेमानुभव घेऊ लागल्या.

मूळ भागवत आणि त्याच्यावर असणाऱ्या अनेक टीका उपलब्ध आहेत. त्या टीकाकारांना याचे वर्णन करताना शब्ददारिद्र्य जाणवले. (श्रीसद्गुरुकृपा झाल्यास, या प्रेमआस्वादाच्या सहोदरपणाचा लाभ आमच्या कोत्या कुवतीनुसार आम्ही या मालिकेच्या अखेरीस स्वतंत्रपणे घेऊ.) विस्तारभयास्तव फारच थोडे रस चाखणे झाले.

भगवती भूदेवींनी या अनुभूतीची जरी आकाश-प्रांगणातून संधी साधली, तरी त्यांचे समाधान झाले नाही. त्यांना गोपी होऊन माधुर्यरसगोडीची आतुरता तृप्तावी असे वाटले. अवताराविष्काराची वेळ आली.

विष्णुचित्त यशोदाभावात जाऊन भगवान वटपत्रशायी श्रीकृष्णांची भक्ती करीत. विष्णुसहस्रनामाची आवर्तने करावीत. पवमानसूक्तांनी भगवंतांस अभिषेक करावा. सुगंधी द्रव्यांनी त्यांना न्हाऊ-माखू घालावे. तासन्तास टक लावून त्या मूर्तीकडे पाहात तन्मय होऊन जावे. सारे देहधर्म विसरावे. अवघ्या इंद्रियांना त्या वटपत्रशायी भगवंतांचाच लळा लागावा. भगवंतांच्या सर्वांगाला चंदनाची उटी लावावी. आपल्याच वाटिकेतल्या ताज्या गंधित कुसुमांचा, तुळशीमंजिरींसह हार श्रीकृष्णनाम जपत गुंफावा आणि त्या हाराने त्या भगवंतांना सुशोभित करावे. शोभिवंताला शोभवावे. तेजोमयतेला नीरांजनाने ओवाळून तेजाळावे. नैवेद्य भरवावा. स्फुरणविद्याजन्य शब्दब्रह्मज्ञान्यांनाही न आकळणाऱ्या या भगवंतांचे



'नेति नेति' विसरून, स्तुतिस्तोत्र-गान-संकीर्तन मोठ्या प्रेमाने चारी वाणींद्वारा करावे. स्वप्ने पाहावीत. पहाटे पहाटे कुणी गोपी, कुणी भगवती आपल्या हाती अगदी नवजात बालिकेच्या रूपाने पहुडलेली. या साऱ्यांसाठी प्रिय पत्नीचे पूर्ण अनुमोदन, पूर्ण सहआचरण सदाचेच त्यांना लाभलेले. दिवसभराच्या एकमेकांशी होणाऱ्या संवादात याचाच भावानुभव असावा. स्वप्न असो वा नसो, हात अशी तयारी दाखवीत की ज्यात जणू एखादी गोपी, नाही बालरूपात राधाच विसावतेय. उभयतांचा वेडसरपणा म्हणावा इतक्या पराकोटीला हा छंद गेला. त्या आसेला मन सोडेचना. पण असे बाळ, अशी बाला आपल्या नशिबी इतक्या काळात आली नाही याची खंत. ती कोणापुढे मांडावी ? कोणाच्या कानात सांगावी ? तोच तो वटपत्रशायी भगवंत. त्याच्या कानात अनेकवार सांगून झाले आणि वटपत्रशायी भगवंत कळवळले. भगवती भूदेवीला प्रेरणा केली गेली. अन् भगवान सूर्यनारायण कर्क राशीत, चंद्र पूर्वाफाल्गुनी नक्षत्री असताना एक अवचित घटना घडली. पुन्हा पुन्हा पडणाऱ्या स्वप्नाला जागृतावस्थेची साक्षातता लाभली.

विष्णुचित्त अन् त्यांची समचित्त पत्नी परसातल्या उपवनात ताजी सुगंधी फुले हळुवार हातांनी खुडत होते. फुले खुडून झाली अन् तुळशीच्या मंजिऱ्या खुडण्यासाठी त्या गंधित तुळशीवाफ्याकडे गेल्या. मुखाने मंत्रोच्चार होत होता; **'तुलस्यमृतनामासि सदा त्वं केशवप्रिये । केशवार्थं विचिन्वामि वरदा भव शोभने ॥'**

अवचित एक नवजात बालिका, अयोनिसंभव बालिका त्या उभयतांच्या दृष्टीस पडली. जशी जनकराजांना भूमातेची भगवती कन्या जानकी, तशी विष्णुचित्त आळवारांना भूदेवीच अशी गोदा, आंडाळ. भूदेवी भगवतीचा हा अवताराविष्कार प्रकट झाला, विष्णुचित्तांच्या तुलसी-उपवनात. भूवर पडलेल्या तुलसीपर्णांच्या गादीवर तुलसीमंजिरी आणि माती यांनी लपेटलेला.

त्या बालिकेला विष्णुचित्तांनी हातांच्या कवेत हळुवारपणे उचलून घेतले. वटपत्रशायींचे दर्शन घेतले. त्यांच्या हृदयाजवळ ठेवून, त्यांचा प्रसाद म्हणून उचलून घेतले. ''कोदई, गोदे !'' अशी आर्त साद घातली. तिला पत्नीच्या ओटीत घातले. ते उभयता त्या बालिकेचे आई-वडील झाले. या आईवडिलांची ती कन्या झाली.

विष्णुचित्त आळवारांच्या साऱ्या भक्तिभावनांना ती साक्ष झाली. तिच्या सहवासावाचून, साहचर्यावाचून कोणत्याही उपासनेचे, प्रेमभक्तीचे, चिदानंदाच्या अनुभूतीचे रसपूर्णतेने घडणे घडेचना. तिच्या सान्निध्यात ती खुलावी. या बालिकेचे अनिमिष नेत्रांनी वटपत्रशायींकडे पाहणे त्यांना वेडावी. त्या विचारांच्या दाटीतच, ते प्रेम भक्तिरसामृतस्वरूप लेऊन कधी विष्णुचित्तांच्या, कधी कोदईच्या, कधी उभयतांच्या नयनांतून समाधी समाधान होईपर्यंत पघळत पघळतच राही. इंद्रियांच्या कवाडांना मिटवून साधलेल्या योगप्रक्रियेतील समरसतेला लाजवून, उघड्या इंद्रियांना जाणीवरहित ठेवून, वटपत्रशायींच्या चरणी प्रपत्तिपूर्वक शरणागततेतील समरसता प्रकट होई. विष्णुचित्तांची, कोदईची, गोदेच्या मातेची ही अनुभूती. साऱ्या श्रीविल्लीपुत्तुरच्या बालगोपाळांना, मुलींना, त्यांच्या आईवडिलांना आनंदीआनंद. वर्तमान भूतात जमा होता होता, कोदईला तिसरे वर्ष लागले.

गोदा आता स्वतः वडिलांबरोबर श्रीरंगनाथांचे स्मरण करू लागली. श्रीरंगम्‌च्या रंगनाथ भगवंतांचे दर्शन घेऊन आल्यापासून तिला रंगनाथांचा छंदच लागला. ती स्वतःला 'रंगनायकी' म्हणून भावू लागली. त्या मंदिरात **'वंदे श्रीरंगनायकीम्'**चा घोष ऐकल्यापासूनचा हा वृत्तिपालट. भविष्यातला **'गोदां वन्दे श्रीरंगनायकीम्'** हा मंत्रोच्चार, विष्णुचित्तांना आधीपासूनच तर तिच्यात भावू लागला नव्हता ना ?

विष्णुचित्तांच्या लक्षात आले होते की, ही गोदा आता साऱ्या श्रीविल्लीपुत्तुर या गावाला वृंदावन समजू लागली होती. भगवंतांच्या मंदिराला श्रीकृष्णांचे घर समजू लागली होती. तिच्या सख्यांमध्ये तिला गोपींचा प्रत्यय येऊ लागला होता. भगवान श्रीकृष्णांचा तिला तीव्रतम ध्यास लागला होता. भगवान श्रीकृष्ण हाच एक वृत्तिस्फुरणव्यवहार तिच्या साऱ्या चाल-चलवणुकीतून प्रकर्षाने दृग्गोचर होत होता.

आणि एक दिवस, आपल्या हातून महादोष घडला म्हणून त्यांनी अन्न-जलग्रहण वर्ज्य करून टाकले. पश्चात्तापदग्धतेच्या परिसीमेने ओघळणाऱ्या अश्रूंना आवरता येईना. वटपत्रशायींचे घट्ट धरून ठेवलेले चरण सुटता सुटेनात. देह-जीवभाव येथेच संपवावा अशी प्रार्थना होऊ लागली.



वटपत्रशायी भगवंतांना घालण्यात येणाऱ्या हाराची गुंफण आता गोदा करू लागली होती. विविध रंगी, विविध सुगंधी कुसुमांत जणू श्रीकृष्ण भगवंत प्रतिष्ठित होत. त्या भगवंतांना वाटे; या कोदईने यावे, आपल्या चिदानंदघन प्रेमपूर्ण सुकोमल करांनी आपणांस हळुवारपणे खुडावे. हारात गुंफावे आणि तो हार वटपत्रशायीरूप मला घालून मला माझ्यात मिळवावे. भगवंतांचे हे असे अपार भक्तप्रेम. भक्तकामकल्पद्रुम असा हा नंदनंदन, गोपीजनवल्लभ श्रीकृष्ण भगवंत, भगवती भूदेवीच्या अवताराविष्काराकडून गोपीप्रेमाचे अनुभव स्वतः घेऊ लागला होता ! भगवंतांचे भक्तावरचे केवढे हे अवीट स्वयंस्फूर्त प्रेम !

श्रीकृष्णप्रेमाने रसरसलेला चिद्‌घन कुसुम-तुलसीमंजिरीमंडित हार अलगद घेऊन, गोदा विष्णुचित्तांच्या पूजेच्या तयारीत गुंते. इकडे मंदिरात तासन्‌तास विष्णुचित्तांची पूजा चाले. मध्येच कोदई हारादी त्यांच्याजवळ आणून ठेवी. पण एक गोष्ट करून.

भगवान श्रीरंगनाथ श्रीकृष्ण, मी त्यांची रंगनायकी. लक्ष्मीचे लावण्य, सौंदर्याची सीमा असणारे लावण्य माझ्या या लीलाविग्रहातून या भगवंताला साजेसे होईल ? क्षणभर असा विचार. मग क्षणभरात आपल्या काळ्याभोर दाट लांबसडक कुंतलांच्या वेणीची ती सुमनोहर रचना डावीकडील फुलोऱ्यासह घालून होई. फुले माळली जात आणि तो भगवंतांसाठी गुंफलेला पुष्पहार ही कोदई आपल्याच गळ्यात घालून घेई. त्या आपल्याच रूपात हारासह आलटून पालटून श्रीकृष्णमूर्तीला पाही. त्याचे, आपले सौंदर्य न्याहाळी. समाधानाची पोचपावती मिळताच, ते साहित्य आपल्या पित्याकडे, विष्णुचित्तांकडे हजर करी.

असे दिवसेंदिवस चालू होते. अगदी बिनबोभाट. अन्‌ एक दिवस असा तो हार भगवंतांच्या गळ्यात घालून झाल्यावर, त्या वटपत्रशायींकडे अनिमिष नेत्रांनी पाहताना विष्णुचित्तांना त्यात एक लांबलचक काळाभोर केस आढळला; कोदईचा केस.

आपल्या हातून हा भयंकर अपराध घडला, याची त्यांना जाणीव झाली. कारण गोदेचे हे गुपित त्यांना कळले अन्‌ त्यांनी अन्न-पाणी वर्ज्य केले. भगवंतांना स्वतः केलेला हार घालावा; तर तो तत्काळ कोमेजावा. असे रोज होऊ लागले.

सर्वव्यापक परब्रह्माने **'अहं बहुस्याम् ।'** या स्फुरणेच्छेतून ल्यालेल्या नानाकारतेस एकाच अधिष्ठानसाकार न्यायाने श्रीकृष्णस्वरूपास सगुण साकार प्रकटवावे आणि नानाकारतेतील सद्‌चिद्‌घन वृत्त्याकारतेलाच पत्नीस्वरूपात प्रेम प्रदान करावे. श्रीरंगम्‌चे श्रीकृष्णप्रभू आणि श्रीविल्लीपुत्तुरची गोदा यांत अशी ही माधुर्यता प्रकटतेय अशी विष्णुचित्तांची खात्री. तरी देखील भगवंतांच्या गळ्यातील पुष्पहारात गोदेचा केस ? ही कल्पना त्यांना सहन होईना. पश्चात्तापाचे आठवडाभर अनुष्ठान. उपास-उपासनेने भक्तकामकल्पद्रुम वटपत्रशायी कळवळले.

चुकून डोळा लागला अन् वटपत्रशायी स्वप्नी साकारले. भगवंतांनी **'दो वरी दो भुजा घेवोनि ।'** या न्यायाने विष्णुचित्तांना आलिंगिले. आपल्या मनीचे गूज सांगितले; ''गोदेने स्वतःस प्रथम हार घालून घेऊन नंतर मला घातलेल्या हारात माझे मन गुंतले आहे. मी फक्त त्याचाच भुकेला आहे. त्या हारातील प्रत्येक पुष्पाच्या रंगातून, सुवासातून, उमलत्या सौंदर्यातून गोदेच्या माधुर्य-प्रेमलहरींचा निरंतर प्रत्यय मला येत असतो. खरे तर या प्रेमलीलेस्तव मीच दोनपण पांघुरतो. हार स्वतः लेऊन स्वतःस शृंगारण्यात तिने आपले आत्मस्वरूप विरविले आहे. तो हार माझ्या गळ्यात पडतो तेव्हा तिच्या असीम सौंदर्याचे मी पान करतो. निर्विकार, निर्विषय अशा मूलभूत प्रेमानंदाचे हे पान मला घडविण्यातच तुझी सेवा स्वीकार्य होईल. म्हणून हार गोदेलाच करू दे. तिला स्वतःला घालून घेऊ दे. बघू दे दर्पणी तिला तिचे रूप, अगदी तिला हवा तेवढा काळ. मगच ती पुष्पमाला तू मला घाल. तिच्या भावात जाऊन मला अर्पण कर. यासाठीच तर भूदेवी तुझ्याकडे अवताराविष्कृत झाली ना ?''

विष्णुचित्त जागे झाले, धावले. आपल्या पत्नीजवळ कावऱ्या बावऱ्या होऊन बसलेल्या गोदेला त्यांनी उचलले आणि वटपत्रशायींच्या मंदिरात नेले. तेथे पडलेला हार उचलून गोदेच्या गळ्यात घातला. प्रेमपूर्ण भावनेने तिला आपल्या नयनांत साठविले अन् हार अलगद काढून भगवंतांच्या गळ्यात घातला. सुगंधाचे लोट परिमळले. सारा आसमंत, सारे श्रीविल्लीपुत्तुर त्या सुगंधाच्या लाटेत न्हाऊन निघाले. विल्लीपुत्तुर धावले वटपत्रशायींच्या मंदिरात. भगवंतांचा जयजयकार हृदया-हृदयांतून, नाडीच्या ठोक्या-ठोक्यांतून



नर्तनाच्या लयीत गरजत राहिला. गोदेला गोकुळाचा साक्षात्कार झाला. तिच्या मुखातून श्रुति प्रकटू लागल्या. भावविभोरावस्था नित्याचीच झाली.

कोदईचे माधुर्य विष्णुचित्तांच्या लक्षात आले खरे; पण हे घडवायचे कसे ? याची चिंता त्यांना सतावू लागली. एखादा सुयोग्य धार्मिक तपाचरणी श्रीकृष्णभक्त तिच्यासाठी वर म्हणून नेमस्त करावा यासाठी शोधयात्रा काढल्या. तिचे मत तरी विचारात घ्यावे, म्हणून गोदेकडे पृच्छा केली गेली. ''भगवंतावाचून इतर कोणाशीही माझा विवाह होणे नाही'' असे निक्षून सांगणे झाले. भगवंतांच्या सर्व अवतारांविषयी ऊहापोह झाला. गोदेच्या मनीची निश्चिती आकळली. 'मी'ला नुरविता, ती श्रीरंगम्‌च्या श्रीरंगनाथांची, श्रीकृष्ण भगवंतांची, सर्वस्वाने केवळ त्यांचीच होती. असा श्रीकृष्णांविषयीचा गोदेचा भाव, संपूर्ण समर्पिततेचा.

हे अवघड काम साधायचे कसे ? याचा विचार विष्णुचित्तांना सतावीत राहिला. या एका कार्य-घडवणुकीसाठी अखेर संपूर्ण प्रपत्तीचा मार्ग विष्णुचित्तांनी अवलंबिला. ''तुझी इच्छा तूच पूर्ण करून घे !'' अशी वटपत्रशायींना प्रार्थना करून झाली. रोज रोज प्रार्थना आर्द्र चित्ताने होऊ लागली, जणू त्याचेच पुरश्चरण.

गोदेने पुष्पमाला करायची. आपल्या कृष्णमय देहावर माळायची. भगवंतांचे सौंदर्य आरशात न्याहाळायचे. आपली जोड कल्पायची आणि हाराची प्रतिष्ठापना वटपत्रशायींच्या गळ्यात करायची. कृष्णाने कृष्णाला परिणायचे आहे अशा भावात जाऊन, आपण कोदईचे घेतलेले नाम-रूप पांघरून.

दिवसांमागून दिवस गेले. मासांमागून मास. वर्षांमागून वर्षे. मोहरलेली नवयौवना, माधुर्यभक्तीत तल्लीनता आली. साधना साध्यात परिणत झाली. विष्णुचित्तांचे पितृत्व कळवळले. धर्मपत्नीचा लकडा मागे होताच. वटपत्रशायींच्या चरणांवर अश्रु-अभिषेक झाला. समाधी लागली. तळमळीची आस वृत्तिरूपात डोकावू लागली. अखेर भगवंतांनाच सुचेनासे झाले. ते विष्णुचित्तांच्या जागृत-स्वप्नी आले. वटपत्रशायींनी श्रीरंगनाथांचे रूप धारण केले. 'आपणांस गोदेचे कन्यादान करून द्यावे', अशी आज्ञा केली. 'गोदेला घेऊन, समारंभपूर्वक मिरवत येथे आणावे', अशी सूचना झाली.

भगवंत श्रीरंगनाथ सगळ्याच श्रीरंगम्‌मधील पुरोहितांच्या स्वप्नी एकाच दिवशी आले आणि ''श्रीविल्लीपुत्तुरच्या विष्णुचित्तांच्या गोदा नामक कन्येचा माझ्याशी विवाह लावून देण्यासाठी तिला येथे घेऊन यावे''; अशी आज्ञा झाली. राजा वल्लभदेवांनाही अशी आज्ञा झाली. **'न भूतो न भविष्यति'** अशा विवाहसोहळ्याची प्रेरणा राजाने घेतली. सारे श्रीविल्लीपुत्तुरला आले. वटपत्रशायींचे पूजन झाले. विष्णुसहस्रनाम-पठण झाले. पवमानाने दुग्धाभिषेक झाला. डबडबत्या लोचनांच्या साक्षीत भगवंतांकडून या सोहळ्यासाठी आशीर्वचन-परवानगी घेण्यात आली.

राजा वल्लभदेवांचा लवाजमा आणि सारे श्रीविल्लीपुत्तुर, श्रीरंगम्‌च्या पुरोहितांसह वटपत्रशायींच्या मंदिरात प्रस्थान ठेवते झाले. भगवंतांचे गुणगान, नामसंकीर्तन पहाटेपर्यंत झाले. गजराज, अश्व, यांना सजविण्यात आले. गोदेची पालखी सुशोभित करण्यात आली. प्रयाण-मुहूर्त वेळ जवळ येऊ लागली. विष्णुचित्तांचा कंठ दाटून आला. गतेतिहासाची चित्रे मनःचक्षूंपुढे क्षणभरासाठी साकार झाली.

तिसऱ्या वर्षापासूनच गोदेला सारा आसमंत जणू गोकुळ प्रत्ययू लागला होता. स्वतःस ती सजवू लागली ते त्याला परिणिता यावे म्हणून. तिने भगवंतांस पती म्हणून मिळवण्यासाठी भल्या पहाटे उठावे. नदीवर स्नान करण्यासाठी साऱ्या सहेली-गोपींना उठवावे. त्यांच्यासह लगबग स्नान करून भगवंतांना उठवावे. यासाठी मार्गशीर्ष महिन्यात ती व्रतोपासना करू लागली होती.

या दरवर्षीच्या उपासनेतून जन्मलेल्या तिच्या वेदश्रुती **'तिरुप्पावै'** त्यांना आठवू लागल्या. या तीस कवनांना महिनाभर प्रातःकाळी म्हणण्याचा प्रघातच श्रीविल्लुपुत्तुर गोकुळात पडला. फलित माधुर्यभावात विरहाची कड मिसळून गेली. **'नाच्चियार तिरुमोई'**च्या एकशे त्रेचाळीस श्रुतिगीतांची, गोदासूक्तांची घडण झाली. भगवंतांबरोबर स्वप्नी विवाह झाल्याची कथा ती सांगू लागली. या भावाला भुलूनच भगवंतांनी आपणांस दृष्टांत दिला असावा याची खात्री पटली. श्रीकृष्णभक्तीच्या धगधगत्या ज्वालेत ही बालिका तग धरून राहावी म्हणून तळमळणाऱ्या आपल्या चित्ताने केलेली भगवंतांची प्रार्थना फळास आली, हे पाहून त्यांनी वटपत्रशायींचे प्रेमस्मरण अखंड चालू ठेवले. **'पडिले वळण इंद्रियां सकळा ।'** या न्यायाने.



सारे श्रीवल्लीपुत्तुर अपूर्व उत्साहाने, आनंदभराने नवनवीन वस्त्रे-अलंकार लेऊन श्रीरंगम्‌च्या रंगनाथांकडे प्रयाण करण्यास सज्ज झाले. भगवंतांच्या मूर्तीशी की लीलाविग्रह साक्षात् धारण करणाऱ्या भगवंतांशी हा विवाह सोहळा परिणत होणार ? याची आपापल्या विचारापरी गाठ ही वऱ्हाडी मंडळी बांधत होती. अपूर्व सोहळ्याचे हे साक्षीदार गोदेच्या प्रेमाच्या अभिमानाने फुलले होते. त्यांनी गोदेला केव्हाच 'आंडाळ' 'भगवती आंडाळ' म्हणून संबोधित केले होते. **'स तरति स तरति स लोकान्स्तारयति । (ना.भ.सू.५०)'** या न्यायाने या भगवंतांच्या भूदेवी आविष्काराने साऱ्या श्रीवल्लीपुत्तुर गोकुळाला तारण्याचा केलेला यत्न आता सुफलित होण्याचा क्षण नजीक आला होता. आणि या पूर्तीच्या भावनेने हे अवघे गोकुळ वऱ्हाडी म्हणून निघाले. ते पदन्यास करीत होते, करपल्लवी प्रकटवीत होते. ओसंडून वाहणारा प्रेमानंद त्यांच्या सर्व इंद्रियांच्या व्यवहारातून दृग्गोचर होत होता.

स्वतः राजा वल्लभदेवांनी, या वऱ्हाड्यांसह त्यांच्या बरोबर आलेल्या हत्ती, घोडे, राजदरबारातील अधिकारी वर्ग, श्रीरंगम्‌चा पुजारी-पुरोहित वर्ग यांची मिरवणूक व्यवस्था लावली. वधूला नेणारी वाहिका, नाना तऱ्हांच्या फुलांनी, अलंकारांनी सजविलेली पालखी विष्णुचित्त आळवारांच्या दारी येऊन ठेपली.

गोपींनी, श्रीविल्लपुत्तुरच्या सख्यांनी आपली सारी कला पणाला लावून या द्वादश वर्षीय गोदेला नाना फुलामालांनी, नाना वस्त्रांनी, नाना अलंकारांनी सजविले. या उपाधींनी तिचे सौंदर्य खुलले, की मूळच्याच सौंदर्याच्या प्रभांनी ही उपाधी अधिक सौंदर्यसंपन्न झाली ? असा प्रश्न पडला. या सौंदर्यसंपन्नतेला पांचभौतिक अंशच नुरल्याने, सौंदर्याची सीमा असीमित होत्साती क्षणोक्षणी बहरू लागली. 'त्याला' भुलविण्यासाठी, प्रेमातुर करण्यासाठी सौंदर्यशक्तिमाया लावण्याला पांघरून घेत होती.

भगवती आंडाळदेवीला, तिच्या **'तिरुप्पावै'**मधली 'नपिन्नै' (राधा) सामोरी आली. आळीपाळीने साऱ्यांनी पंच पंच नीरांजनदीपांनी ओवाळले. सख्यांनी साक्षात् आणि सर्व उपस्थितांनी मनोमनी या भगवतीच्या सौंदर्याला दृष्ट लागू नये म्हणून दृष्ट काढली. काजळतीट रेखली.

पालखी पाऊलवाट चालू लागली. श्रीरंगनाथांचा ध्यास. त्यांचे नामस्मरण.

त्याचे गुणसंकीर्तन. **'यश श्री औदार्य ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ।'** अशा षड्गुणैश्वर्याची, त्यातील प्रत्येक गुणाच्या सर्वव्यापकतेच्या अनुभूतीची वाक्सुमने उधळली जात होती. आळंदीहून पंढरपूर, तसे सारे श्रीविल्लीपुत्तुर श्रीरंगम्कडे भक्तिरसात न्हात न्हात वाटचाल करीत होते. गावोगावच्या समविचारींची गर्दी दाटली. दर मुक्कामी संकीर्तनाचे सारीपाट खेळले गेले. उल्हासाला ऊत आला.

श्रीरंगम्च्या तर रस्त्यारस्त्यांवर सुवासिक सुमनांच्या पायघड्या अंथरल्या होत्या. भगवंतांचे मंदिर रोषणाईने सजले होते. अनेक समयांच्या मंदमधुर प्रकाशाने मंदिराचा आसमंत तेजाळून निघाला होता. भगवंतांच्या मूर्तीला सजविले होते. सारे श्रीरंगम् नववधूच्या आगमन-स्वागतार्थ सज्ज झाले होते. सडा-संमार्जन, विविधाकृती रांगोळ्यांनी, शुभागमनाच्या सुचिन्हांनी अवघ्या घरांची अंगणे सुशोभित केलेली होती.

जशी जशी पालखी श्रीरंगम्च्या आसमंतात आली, तशी तशी आंडाळची वृत्ती भगवंतांना सतत ध्यानात पाहून तन्मय झाली. श्रीकृष्णमयतेने सर्वव्यापकता ल्याली. 'नपिन्नै'चा कृष्ण या आंडाळ नपिन्नैला व्यापून राहू लागला. अष्ट श्रीकृष्णपत्नींचे विवाहैश्वर्य एकवटून आले. विवाह-सोहळा दाक्षिणात्य पद्धतीने सुरू झाला.

आदल्या दिवशी सायंकाळी वाङ्निश्चय झाला. भगवंतांची चल मूर्ती वराकडली, तर साक्षात् विष्णुचित्तकन्या आंडाळ वधूपक्षासमवेतची. या विवाह-सोहळ्यात एकच विलक्षण चमत्कार होता; विष्णुचित्त आळवार, त्यांची धर्मपत्नी, विष्णुचित्ततनया भगवती गोदा आणि गोदेच्या दहा सहेल्या (**'तिरुप्पावै'** प्रमाण) यांना भगवंतांच्या अचल मूर्तीच्या ठायी साक्षात् लीलाविग्रही 'चतुर्भुज रूप सावळे सुंदर' सतत प्रत्ययत होते. बाकी सर्वांना मूर्तीच प्रत्ययत होती.

भगवंतांची विधिवत् सोडमुंज करण्यात आली. वाजत गाजत भगवंतांना शेजारच्या मंदिरात नेण्यात आले. वधूच्या मामांनी (श्रीविल्लीपुत्तुरच्या एका सहेलीचे वडील) भाची देण्याचे आश्वासन दिले. वर परतले. उभयतांना झोपाळ्यावर बसवून झाले. गळ्यांतील हारांची अदलाबदल करून हार घालण्यात आले. सुवासिनींनी औक्षण केले. अखिल नद्यांच्या तीर्थांनी परिसर-संमार्जन झाले. वर-वधूंना विवाहमंडपात आणण्यात आले.



नववधू आंडाळच्या तेजोमय कपाळावर श्रीचूर्णरेखा शोभत होती. गोपीचंदनाचा अर्धगोल काढलेला दिसत होता. ल्यालेली कर्णफुले आनंदाने डुलत होती. कुंडलांचा सुवर्ण वर्ण अंगभऱ्या सुवर्णकांतीशी स्पर्धा करत होता. नासिकेतील हिऱ्यामाणकांची चमकी तेजाळत होती. काजळरेखा नयनांबाहेरील प्रांगणात पहुडली होती. दृष्ट लागू नये म्हणून गालावर लावलेली तीट उठून दिसत होती. सर्वांगावर अलंकारांची दाटी झालेली होती. कमरपट्टा, वाकी, गळसरी, नूपुरे आदी विविधालंकारांनी हजेरी लावली होती. लांबसडक, मृदुमुलायम काळ्याभोर केशरचनेने मस्तकावर विश्वाकारता साकारली होती. माळलेल्या निरनिराळ्या फुलांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. 'पट्टपडवै' साडीचा (विवाहसमयीचा) पेहराव नववधूचे सौंदर्य खुलवीत होता. आंडाळ सौंदर्याच्या सीमेपारची लावण्यसम्राज्ञी म्हणून प्रत्ययास येत होती.

इकडे भगवंत तोडीस तोड अशा स्वरूपसौंदर्याने विलसत होते. भगवंतांना भगवतीसमीप आणण्यात आले. एकमेकांचा हात एकमेकांच्या हातात देऊन, (सहेलींचा अनुभव सांगत आहोत.) चांदीच्या कलशावर कन्यादानाचे तीर्थ सोडण्यात आले. हळदीजलात पावन केलेल्या धाग्याचे मंगळसूत्र घातले गेले. मंगळसूत्र विष्णुचिन्ह-मंडित होते. सुवर्ण-नारळाचा खेळ रंगला. इकडून तिकडे जाणाऱ्या नारळाबरोबर असीमित प्रेमलहरींचे आदान-प्रदान होत राहिले. उच्चतम प्रतीच्या तांदळाच्या पंचपक्वान्नांचा बेत, त्याचा साऱ्या वऱ्हाड्यांनी आस्वाद घेतला. आकाशातल्या देवदेवतांनी वऱ्हाड्यांची सोंगे घेऊन, साऱ्या विवाहसमारंभाची लज्जत लुटली.

हत्तीच्या अंबारीत विराजमान असणाऱ्या श्रीभगवंतांची उत्सवमूर्ती व आंडाळ या उभय प्रेमिकांची मिरवणूक साऱ्या श्रीरंगम्च्या आसमंतात फिरून परतली, तेव्हा श्रीरंगम्मधील श्रीरंगनाथांच्या प्रांगणात आकाशातून पुष्पवृष्टी झाली. सुगंधी द्रव्यांचा वर्षाव झाला, परिमल परिमळला. भक्तिप्रेमाच्या भावविभोरतेला भरती आली. भगवती आंडाळ, तिच्या सहेल्या आणि माता-पिता यांना या सर्वकाळात, मूर्ती न दिसता साक्षात् भगवंत प्रत्ययले अन् त्यांची चालती बोलती समाधी धुंद होत विहरली. आनंदाच्या अनुपम्यतेला उकळ्या फुटून प्रेमस्फुरण धन्य झाले.

मंदिराच्या प्रवेशद्वारात उच्चीच्या तांदळाने भरून ठेवलेले माप ओलांडून नववधू प्रवेश करती झाली. भगवंतांची चल मूर्ती तिच्या मंदिरातील स्थानी विराजमान झाली. आंडाळने माता-पित्यांच्या चरणांवर मस्तक ठेवले. त्यांचे चिरंजीवी आशीर्वाद घेतले. सहेल्यांचा निरोप घेतला. सारा वऱ्हाडी परिवार मंदिरात दाटीवाटीने दाटला. सारे एकटक आंडाळ, तिचे भगवंतांकडे मार्गक्रमण आणि आतुर श्रीरंगनाथ या दृश्याची साठवण लवणाऱ्या पापण्या नकळत थांबवून, आपल्या अंतःकरणात साठवून घेत होते.

श्रीरंगनाथांच्या समीप, अतिसमीप भगवती आंडाळ विराजमान होण्याचा क्षण आला. अन् लखकन् वीज चमकावी तसा प्रखर तरी शीतल प्रकाश मंदिरभराला व्यापून राहिला. सर्व आमंत्रित वऱ्हाड्यांना या प्रकाशाचा स्पर्श झाला अन् महाआनंदाची प्राप्ती झाली. आंडाळच्या रूपी भगवंत आणि भगवंतांच्या रूपी आंडाळ असा साक्षात्कार अखिल वऱ्हाड्यांना झाला. पापण्या समाधानाने मिटणार, तोच भगवंत श्रीरंगनाथ त्यांच्या नित्याच्या जागी प्रत्ययले. भगवती आंडाळ सशरीर श्रीरंगनाथांच्या हृदयस्थानात नाहीशी झाली. अश्रूंचा बांध फुटला. या एका दृश्याने सारे अवाक् झाले. भगवती आंडाळच्या गळ्यातील हार भगवंतांच्या गळ्यात त्यांच्या मूळच्या हारासह विराजमान झाला होता. त्याच्या आभेच्या, सुगंधाच्या लाटा आवेगाने कितीतरी काळ लहरत राहिल्या.

अशी ही दक्षिणेची मीरा, कोदई-गोदा-आंडाळ माधुर्याच्या परममंगल आनंदघनतेत अखंड मग्न झाली. (क्षमा असावी; **'बापरखुमादेविवरु'** प्रेमिकांनो ! विस्तारभयास्तव हा माधुर्यसोहळा आखडत्या हाताने वर्णिला.).

हे सद्गुरु स्कंददास माउलीस्वरूप श्रीगुलाबराव माउली महाराज ! आपला माधुर्य संप्रदाय. त्याच्याशी समरस असणाऱ्या भगवंतस्वरूप भगवती आंडाळ हिची ही माधुर्यसाक्षातता केवळ आपल्या कृपेने आमच्या मनात गेली दोन-तीन वर्षे गुंजारव करीत होती. तिच्या **'तिरुप्पावै'** आणि **'नाच्चियार तिरुमोई'**तील भावविभोरतेचा आस्वाद घेण्याचे मनात यावे आणि आपली अनुमती लाभावी याकरिता केलेल्या प्रार्थनांना यश लाभले. प.पू.श्री.शिरीषदादांचे प्रोत्साहन लाभले अन् या सेवेला सुमुहूर्त सापडला माघ शुद्ध चतुर्थीचा, श्रीगजाननाच्या जन्मदिनाचा.



श्रीकृष्णभक्तिरसात चिंब न्हाऊन तत्स्वरूप झालेल्या भगवती आंडाळदेवीच्या रसरूप चरित्राचे हे बाळबोध अवगाहन सद्गुरु स्कंददासचरणी, सप्ताक्षरी स्मरत, अशा कृपेची पुनःपुन्हा प्रपत्तिपूर्वक याचना करीत अर्पण करतो. कृष्णू विष्णु, हरि, गोविंद, माउली श्रीज्ञानेश्वर महाराज, परमसद्गुरु श्रीगुलाबराव महाराज यांचे एकात्म चरण तेच आपले चरण आम्हांस सदोदित दृग्गोचर होवोत; असा आशीर्वाद द्यावा. हे सद्गुरुनाथ; या विनंतीस प्रतिसाद द्याल ना !

□□

# ॥ श्रीक्षेत्र आळंदीमाहात्म्य ॥

**(मागील अंकावरून ...)**

एक अप्रकाशित हस्तलिखित

---

॥श्लोक॥ **नाहं मनुष्यो न च देवयक्षो न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः** ॥३॥टीका॥ ज्ञानदेव म्हणे मी कोण । हे मजसीच न कळे जाण । ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र वर्ण । मी तो जाण नोहे काही ॥७६॥ नोहे देवगण निशाचर । पृथ्वी आप तेज वायू समीर । काहींचि नोहे मी अपरंपर । कोणाही पार न कळेचि ॥७७॥ ज्ञानदेव ऐसे बोलतां । गोरोबा पायी ठेवी माथा । आजि भाग्य माझे पाहतां । ब्रह्माही आता वर्णू नेणें ॥७८॥ मग सर्व सिद्धता करूनि पाही । भोजने करूनि एके ठाई । कीर्तनी नामा उभा राही । नामा म्हणे नामे टाळी सर्वही वाजवा पै ॥७९॥ तो ज्ञानदेव म्हणे सर्व टाळी वाजविती । ज्यास हस्त नसलिया काय करिती । नामा बोले तयाप्रति । ऐसे नोहे नामी प्राप्ती सर्वही ॥८०॥ नामाचा अपार महिमा वेदी वर्णन । नामे सागरी तरती पाषाण । निंद्य त्याही वर्णिती पुराण । ऐसें महिमान नामाचे ॥८१॥ नाम म्हणता पापे जाती कोडी । नाम कळिकाळाते दवडी । नाम कर्मांतराते झोडी । तळी रगडी किल्मिषासी ॥८२॥ नाम प्राक्तनाते उभे

गिळी । नाम कळिकाळाची नरडी पिळी । नाम तापत्रयाते सर्व जाळी । करी रांगोळी चिंतेची ॥८३॥ नाम पातकाचा ठाव पुसी । नाम भवाब्धीत तारी सकळिकांसी । सकळ सिद्धी नामापासी । अहर्निशी कर जोडोनी ॥८४॥ नाममंत्राचे कडकडाटी । बुडल्या प्रायश्चित्तांच्या कोटी । व्रते तपे पळती कपाटी । धाक पोटी कर्मांतराच्या ॥८५॥ नाम घेता वाल्मीकाने । फुटली टोणप्याला पाने । ऐसे म्हणता नामदेवाने । अपूर्व जाण वर्तले ॥८६॥ गोरोबा आनंदे कीर्तनात । थोटे हाती टाळी वाजवीत । त्याजकडे ज्ञानदेव कृपेने पाहत । अकस्मात हात फुटती ॥८७॥ मग ते देखिले सर्वजणी । गोरोबा पाहे सावध होऊनि । तंव तळहात बोटे नखे तयेक्षणी । देखे नयनी आपुल्या पै ॥८८॥ आनंद सर्वांसी तये काळी । हर्षित जाहली संतमंडळी । आधीचि ब्रह्मानंद कीर्तनकल्लोळी । समस्ते टाळी पिटिली ॥८९॥ गोरोबाची कांता ते वेळी । येऊनि नामदेवाजवळी । म्हणे पाहा अंधार पडला कुळी । दीप उजळी कृपेचा ॥९०॥ हस्त आले परी पुत्र नसे । पोकळ कीर्तन ऐसे कैसे । नामा म्हणे त्रिविक्रमाचे देऊळी पुत्र असे । हाक मारी पिसे येईल ॥९१॥ कांता येऊनि पाहे त्रिविक्रमाजवळे । तंव बाळ देवाचे गाभारी खेळे । त्याते पाहोनी स्नेह उचंबळे । पान्हा त्यावेळी फुटला ॥९२॥ समस्तीही पाहोनी तये वेळी । ब्रह्मानंदे पिटली टाळी । ऐसी संतमहिमा आगळी । म्हणती सकळी शास्त्रपुराणे ॥९३॥ तेथोनी निघती सर्व संतजन । गोरोबासीही घेतले प्रीतीकरोन । करू निघाले ज्योतिर्लिंग दरुशन । परळी वैजनाथ करोन निघती पुढे ॥९४॥ आवंढ्या नागनाथी येऊनि । राहती महाशिवरात्री तये दिनी । नामदेव उभा राहे कीर्तनी । संत सर्व जन श्रवणी सादर ॥९५॥ क्षेत्रस्थ ब्राह्मण करिती वेदघोष । जलधारा करिती अभिषेकास । पुढे टाळ मृदंग नामघोष । आनंद सर्वांस पिटिती टाळ्या ॥९६॥ तेणें ब्राह्मणा उपजे त्रास स्वभावे । म्हणती वेदउच्चारामाजी शूद्र नसावे । देवा सन्निध उगीच नामदेवे । कोल्हाळ सर्वी माजविला ॥९७॥ ऐसे म्हणतां नामयाने । देवालयामागे पाहोनी निवांत स्थान । तेथे येऊनि मांडिले कीर्तन । एकाग्र मन नामघोष ॥९८॥ अत्यंत आनंदे कीर्तन ते स्थळी । आनंदे श्रोते वक्ते वाहती टाळी । ते शंकर नामामृत आवडे मुळी । शिव मुरडोनी न्याहाळी कीर्तनरंगा ॥९९॥ तेथे जाहले नवल परी । शिव फिरता कीर्तनाकडे माघारी । ते राऊळ फिरे पाठीमोरी । मग ते



द्विजवरी देखिले ॥१००॥ ब्राह्मण म्हणती निंदिले भगवत्प्रिय । तेणेची फिरले देवालय । मुळी शंकरचि नाम जपता होय । नामप्रिय भवानीवर ॥१०१॥ दुसरे दिवशी पारणे । ब्राह्मणे करोनी सन्माने । नेऊनि सकळिक संत जने । महोत्साह पूर्ण केला ॥१०२॥ अद्यापि क्षेत्री साक्ष आहे । नंदी दीपमाळी देऊळामागे पाहे । ऐसे कीर्तन-माहात्म्य विशेष हे । देवासी प्रिय संत बहु ॥१०३॥ असो तेथे सोडोनी पारण्या । जाती सोरटी सोमनाथादी गोकर्णा । सर्व गेले ज्योतिर्लिंग दर्शना । पुढे वाराणसी जाणा जाते जाहले ॥१०४॥ प्रयाग मथुरा वृंदावन । द्वारका अयोध्यादी मुक्तपुऱ्या संपूर्ण । स्नानदानादी क्रिया विधिप्रमाण । केल्या जाण सर्वांनी ॥१०५॥ मग काशी क्षेत्री येऊनि । कबीरा घरी उतरती जाऊनि । नामघोष गर्जोनी । सर्व संतांनी पिटली टाळी ॥१०६॥ तंव ते कबीराची वृत्ती कैसी । निष्काम बुद्धी अहर्निशी । उत्पन्न भक्ष नेणे परिग्रहासी । संचयासी न करीचि ॥१०७॥ कांता पुत्र आणि आपण । ऐसे महा माजी तिघेजण । सूत मोले घेऊन । शेले विणून विकीतसे ॥१०८॥ अखंड रामध्यानी वृत्ती सतत ॥ शेले विणीत अष्टभाव दाटत । नाठवे देह गेह सदा समाधिस्थ । मग श्रीरामे विणीत बैसावे ॥१०९॥ शेले घेऊनि हाटी बैसता । एकवार सांगावे मोल समस्ता । दिधले तरी घेणे नेदी तरी चित्ता । तळमळ व्यथा नसेचि ॥११०॥ तितक्याचि द्रव्य उदरनिर्वाह जाण । करिती तिघेही संपूर्ण । अतिथी आलिया अतिथि-पूजन । भाव धरोन करिती पै ॥१११॥ अतिथी विन्मुख होता । नाशु होय सुकृता । दुर्लभ अतिथी पूजिता । होय अनंता आल्हादु ॥११२॥ कबीरा आल्हादु मनात । कोण आले असती अतीथ । आनंदे पातला त्वरित । जेथे संत उभे असती ॥११३॥ साष्टांगे करोनी नमन । सिंहासनी बैसविले नेवोन । धन्य म्हणे आजिचा दिन । संत-दरुशन जाहले मज ॥११४॥ ज्ञानदेवादी सर्व वैष्णव । पाहोनी दाटले अष्टभाव । म्हणे आले आजि माझिया दैवा दैव । कैसा देवराव तोषला ॥११५॥ पुसिला क्षेम समाचार । आनंदे एकमेकां साचार । तंव कबीरा म्हणे ज्ञानेश्वर । त्वरा सत्वर करावी ॥११६॥ दिन गेलासे अस्तमानी । आम्ही आलोसे मार्ग चालोनी । सर्व उपवासी असती अजुनी । कुशल मागोनी पुसावे ॥११७॥ साहित्य द्यावे सर्वांपुरते । पाक करणे लागे आमुते । जरी भोजन करणे तुमचे असते । पाहता तेही न घडेचि ॥११८॥ मग कबीर विचार करी ।

जाऊनि कांतेसी विचारी । म्हणे पाहा वैष्णव आलेती घरी । त्यांसी सामग्री द्यावी लागे ॥११९॥ कांता म्हणे कबीराप्रति । मुष्टीभर अन्न नसे कैसी गती । उसणेही आम्हां कोणी न देती । विपरीत गती काळाची ॥१२०॥ मग पुत्र म्हणे ताता । चला जाऊ दुकानी आता । कैसेही करूनि भगवद्‌भक्ता । भोजन आता देईजे पै ॥१२१॥ मग पितापुत्र झडकरी निघती । तंव रात्र झाली द्वारे लागती । रस्त्यामाजी दोघे उभे विचार करिती । जन जागे नसती कोणीही ॥१२२॥ कबीर म्हणे आता कैसे करावे । विन्मुख जातील वैष्णव माघारे । कमाल म्हणे दुकान फोडावे । परी पुजावे संतवृंदे ॥१२३॥ काय पाहता अधर्माकडे । संतसेवा ज्या कर्मी जोडे । जरी त्या कर्मी अधर्म घडे ॥ तरी तो अधर्म बापुडा काय करी ॥१२४॥ ऐसेचि आहे पूर्वापार । व्यभिचारे गोपी ब्रह्म जाहल्या साचार । गुरुआज्ञेचे बळी नेणे विचार । पुढे विश्वंभर उभा त्याच्या ॥१२५॥ जेणेकडोनी अंतर गुरुभक्ता । तोचि अधर्म म्हणावा तत्त्वता । अधर्मे जरी तृप्त यज्ञभोक्ता । तरी तो म्हणता नये अधर्म ॥१२६॥ ऐसी म्हणोनी केली तातडी । पहार आणोनी दुकान फोडी । कमाल प्रवेशोनी बांधी गाठोडी । कबीरे संतांपुढे ठेविले ॥१२७॥ साहित्य पोचले संतांपुरते येऊनि सांगे कमालाते । तंव सावकार जागा जाहला तेथे । धरिले त्याने कमालाते । चोर चोर त्याते म्हणोनिया ॥१२८॥ कमाल द्वाराबाहेर येता । पाडिले छिद्र त्यातून त्वरे निघता । शरीर बाहेर पाया धरिले तत्त्वता । न ये निघता बाहेरी ॥१२९॥ कबीर कमाला वोढी बाहेरी । चरण दंड धरिले सावकारी । ऐसी होतसे ओढाओढी शरीरी । आपदा अपारी शरीराते ॥१३०॥ कमाल हळुचि सांगे पित्याते । आतां घात होऊ पाहे संतसेवेते । गलबला होता बहु येथे । लोक साह्याते मिळतील ॥१३१॥ दोघा घात होईल बघता । केला सायास जाईल वृथा । उभय लोकी होऊ पाहे घाता । घडे संतां उपवास ॥१३२॥ सोडून गेलिया येथे बरे नाहीं । अनर्थ करतील घरी जाऊनि पाही । तरी जोवरी गलबला नाही । तोवरी खांडा पाही शिर माझे ॥१३३॥ मुद्दा सांगाते न्यावे शिर । माझे संतसेवे वेचेल शरीर । काय याचे शाश्वत केव्हाही जाणार । मोह साचार धरू नये ॥१३४॥ देह अशाश्वत जाणोनी । एकी कर्वतीला कर्क करोनी । एके देहाते दोर बांधोनी । बैल जुंपोनी पळविलें ॥१३५॥ एके देहाचे मांस तोलिले । नाशिवंत देऊनि स्वहित केले । एके



पोटीचे बाळ खांडिले । रांधुनी तोषविले अतिथीसी ॥१३६॥ नाशिवंत जाणोनी बुद्धिमंते । अशाश्वत देऊनि केले स्वहिते । तुम्हीही आशा ममत्व सांडोनी पुरते । न्यावे शिराते खांडोनी ॥१३७॥ सुरी पोटीची दिली काढोनी । तात उशीर न करावा ये क्षणी । इह परत्र जाईल हातुनी । झणी जन मिळोनी येतील ॥१३८॥ ऐसे म्हणतां कमालबाळ । सुरी घेऊनि कबीर तात्काळ । श्रीराम म्हणोनी छेदिले कंठनाळ । घेऊनि ते वेळे जाय न कळता ॥१३९॥ वस्त्रात गुंडाळोनी शिर । घरी येवोनी ठेविले त्वरे । सरंजाम दिधला तूप-साखरे । संतां आदरे जेववी ॥१४०॥ मग कांतेपासी जाऊनि । वर्तले तेही सांगे कानी । म्हणे कळो नेदी कोणालागोनी । अनर्थ संतभोजनी होईल ॥१४१॥ ऐसे सांगोनी कबीर । कांतेपासी झाकोनी दिले शिर । आपण गेला संतांसमोर । केला आदर यथाविधी ॥१४२॥ कांतेने शिर पाहोनी ते वेळी । म्हणे बाळा त्वां जेवविली संतमंडळी । संतसेवे देह अर्पिला ये काळी । स्वरूप सुखमेळी मिळालासी ॥१४३॥ बाळा त्वां साधिला परमार्थ । आम्हां टाकुनी येथे व्यर्थ । कैसा साधिला गूढ गुह्यार्थ । आपुला स्वार्थ त्वां केला ॥१४४॥ नव मासवरी वागविले । अंति त्वां आम्हांते मोकलिले । कैसे एकट्याने जिंतियले । निजस्वरूप केले आपुलेसे ॥१४५॥ ऐसे क्षण एक विलाप करूनि। शिर तेवि रुद्राढ झाकुनी । मग संतमंडळीमाजी येऊनि । करी विनवणी समस्तांची ॥१४६॥ भोजने सारुनी समस्त । कीर्तनी उभा राहे नामा तेथे । आनंदे समस्तही श्रोते-वक्ते । कबीर स्त्रीसमवेत कीर्तनी ॥१४७॥ ऐशी चारी प्रहर रात्र सर्व । कीर्तन रंग होतसे अभिनव । अरुण उदयी करिती क्षीरापती सर्व । आरती गौरव पांडुरंगा ॥१४८॥ इकडे सावकारे धरिले कमाल पाय । तो तैसाचि कमाला वोढू जाय । वोढिता सर्वांग वोढिता होय । चाचपोनी पाहे तो शिर नाही ॥१४९॥ हाका मारिता चोहोकडूनि । मनुष्य जमले तये क्षणी । मशाली लाविल्या मनुष्यांनी । शिर ते क्षणी न दिसेचि ॥१५०॥ कोणी नोळखे नेले राजद्वारी । साहु म्हणे करिता चोरी । धरिले आमुचे घरामाझारी । परी मुद्दा चोरी नेले शिर नसे ॥१५१॥ काही नाही गेले माझे धन । परी सरंजाम नेलासे मोजून । सोळाजणांचा अधिक नसे रतिप्रमाण । अन्यथा जाण बोलेना ॥१५२॥ असो इतके जाहले वर्तमान । परी ते ज्ञानदेवा कळले अंतरी जाण । कबीरा घरी जाहले जे विंदाण । परी

कळो नेदी जाण कोणाते ॥१५३॥ मग कबीर-आज्ञा घेऊन सत्वरे । निघती सर्व वैष्णव वीरे । जाता सर्व राज्यद्वारा सामोरे । तेथे कबीरपुत्र असे ॥१५४॥ ते ज्ञानदेवे देखोनी म्हणितले । कोणी याचे शिरकमल नेले । रावो म्हणे त्यासीच विचारिता भले । तुम्ही उगले जाऊ नका ॥१५५॥ **श्लोक ॥ अंभोजिनीवननिवासविलासहंसस्यहंतिनितरां कुपितो विधाता । न त्वस्य दुग्धजलभेदविधौ प्रसिद्धां वैदग्ध्यकीर्तिमपहर्तुमसौ समर्थः ॥४॥** टीका॥ ज्ञानदेव म्हणे समस्तांसी । संतदर्शनी समाधान सकळांसी । ते तंव नसे वोडवले विघ्नासी । दुःखी जनांसी न राखावे ॥१५६॥ ज्ञानदेव नामयासी म्हणे । करा घोष नामसंकीर्तने । येईल जीवित्व नामस्मरणे । मग नामयाने वोढवला रंग ॥१५७॥ प्रेमे करुणापर साबडे । नाम गाइले पांडुरंगा बोबडे । जेणे भक्ताची अळुकी पुरे कोडे । ज्याने पुढे ठाके नारायण ॥१५८॥ **श्लोक ॥ पृथ्वीधृता सशंभुकटका कैलासकोणे वसन् । कैलासोऽपि दशाननेन तुलितांबघौप्यसौवालिनः वालिराघववेणुना विनीहतः विष्णुंसतांमानसे ॥ तस्माद्विष्णुपरात्परतरं नान्यस्ति लोकत्रयं ?॥६॥** टीका॥ विधी म्हणे नारदा ऐके सादर । वैष्णवाहूनी नसे कोणीही थोर । पृथ्वी शेषादी रावणही साचार । नसे रघुवीर वैष्णवा ऐसा ॥१५९॥ ज्या वैष्णवाच्या अंतरबाहे । श्रीराम खेळणे वेडा होय । शेखी कामारी शेले विणीत आहे । सांगू काय कोठवरी संता ॥१६०॥ असो भक्तमहिमा वर्णवेना । रावो कीर्तनी आला कुठे प्रेमपान्हा । अष्टभाव दाटोनी लागे चरणा । करी नामगर्जना पिटी टाळी ॥१६१॥ सर्व आनंदे डोलती नाचती । आनंद उचंबळे सर्वांप्रति । तेथे नवलावो जाहला ऐका श्रोती । टाळ्या वाजविती कमालप्रेत ॥१६२॥ संतचरणी राजा लागला । नामयासी म्हणे उठवा प्रेताला । तात्काळिक शिर आणोनी लाविले त्याला । कमाल उठला पिटी टाळी ॥१६३॥ कमाल गर्जे नामवाणी । समस्ताही आनंद जाहला तये क्षणी । मग कीर्तन समारंभ विसर्जोनी । राहे ते दिनी राहविले संतां ॥१६४॥ मोठा महोत्साह केला राये । काशीक्षेत्रीचे जन आणि जनसमुदाय । भोजन संतर्पणे द्रव्य वाटी राय । चारी वर्णां होय तृप्त करिता ॥१६५॥ काशी क्षेत्री सर्व हाक गाजिली । ज्ञानदेवादी सर्व संतमंडळी आली। तेथे कबीराने ख्याती केली । म्हणवोनी दाटी जाहली राजद्वारी ॥१६६॥ राजाश्रित राजमंडळी । संतां सत्कार करिती तये वेळी ।



वस्त्राभूषणांचे ढीग पडियेले जवळी । आणि द्रव्य सकळी अर्पिती ॥१६७॥ चारी दिवस होतसे सोहळा । मग तेथोनी निघती ते वेळा । राजा अर्ध राज्य लक्ष्मी देत कमालबाळा । परी ते नेघे संतमेळी निघाले ॥१६८॥ ज्ञानदेव म्हणे राजासी । द्रव्य लक्ष्मी कासया वैष्णवासी । धरा मराया समयासी । तुम्ही अहर्निशी नाम जपा ॥१६९॥ हेचि तुझे आम्हांसी देणे । सत्पात्री अन्न आणि द्रव्य वेचणे । सदा भगवत्सेवे सादर होणे । हेचि मागणे तुम्हांप्रती ॥१७९॥ ऐसे म्हणोनी द्रव्यादी सर्व वाटिले । कबीर कमालासह संत निघाले । मनकर्णिका तटाका पातले । तेथे भेटले मच्छिंद्रादी ॥१७१॥ मच्छिंद्र गोरक्ष आणि दत्त। ऐसे त्रिवर्ग उभे असती तेथ । निवृत्ति वोळखोनी पायां लागत । ज्ञानेश्वरादिक त्यांते नमस्कारिती ॥१७२॥ निवृत्तिने सांगोनी ज्ञानेश्वरासी । दर्शने करविली सकळिकांसी । मच्छिंद्र पाहोनी ज्ञानेश्वरासी । म्हणे माझे मनासी आवडले ॥१७३॥ बा तुझा अवतार जगदोद्धारा । ऐसे म्हणती ज्ञानेश्वरा । तुवा राहोनी अलंकापुरा । जगदोद्धारा पोव्हे घाली ॥१७४॥ कर्म संहारण नाही कोणाचे हाती । यास्तव तुझा अवतार या जगती । अनेक करोनी युक्ती परयुक्ती । जगा भक्ती लावावी ॥१७५॥

**- (क्रमशः)**

☐☐

# संत तुकाराम आणि संत कबीर ; चरित्र व वाङ्मय

**लेखांक : ११**

डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर

---

### (४) पादसेवन भक्ती

**संत तुकाराम :**

पादसेवनासाठी भगवंतांच्या बाह्य अथवा मानसिक मूर्तीची आवश्यकता असते. मूर्तिपूजा, गुरुपूजा आणि वैष्णवांची पूजा ही 'पादसेवन भक्ती'ची

प्रारंभिक अवस्था आहे. या सेवेमुळे भक्तामध्ये दैन्यभाव उत्पन्न होतो. शेवटी संसाराबद्दल त्याच्या मनात विरक्ती उत्पन्न होते.

संत तुकाराम महाराजांच्या मनात केवळ एकच इच्छा आहे की, आपल्या डोळ्यांसमोर सदैव भगवंतांची मनोहर मूर्ती असावी. त्यांच्या चरणांजवळ भक्तांना सर्व सुखे प्राप्त होतात. त्या समचरणांवर अंतःकरणाची प्रवृत्ती दृढ व्हावी असे त्यांना वाटते. संत तुकाराम महाराज म्हणतात;

**समचरणदृष्टी विटेवरी साजरी । तेथे माझी हरी वृत्ति राहो ॥**
**आणिक न लगे मायिक पदार्थ । तेथें माझे आर्त नको देवा ॥ तु.गा.१ ॥**

संत तुकाराम महाराजांना दृढ विश्वास आहे की, भगवंतांच्या चरणांवर नतमस्तक झालेल्या भक्तांची भगवंत कधीही उपेक्षा करीत नाहीत. पादसेवन भक्तीच्या सुखापुढे, सर्व सिद्धी आणि चारी मुक्ती तुच्छ आहेत. या सुखाच्या प्राप्तीसाठी ते वारंवार जन्म घेण्यास तयार आहेत.

**घेईन मी जन्म याजसाठी देवा । तुझी चरणसेवा साधावया ॥**
**हरिनामकीर्तन संतांचे पूजन । घालू लोटांगण महाद्वारीं ॥ तु.गा.१७९२ ॥**

एकदा प्रभुचरणांवर चित्त आसक्त झाले की, त्याला त्यापासून दूर करणे अत्यंत कठीण आहे. एका अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात की, ''जेव्हा तुझ्या सुंदर रूपावर दृष्टी खिळते, तेव्हा ती दृष्टी जरा सुद्धा विचलित होत नाही. माझे चित्त तुझ्या चरणांशी एकरूप होऊन जाते. एकदा का मीठ पाण्यात विरघळले, की मग त्याला पाण्यापासून निराळे काढता येईल का ? मी माझे चित्त प्रभुचरणांवर अर्पण केले आहे.''

**तुज पाहता सामोरी । दृष्टी न फिरे माघारी ।**
**माझें चित्त तुझ्या पाया । मिठी पडली पंढरीराया ॥ १ ॥**
**नव्हे सारितां निराळें । लवण मेळवितां जळें ।**
**तुका म्हणें बळी । जीव दिला पायांतळीं ॥ तु.गा.३८४३.२ ॥**

संत तुकाराम महाराज म्हणतात की, ''एकदा विठ्ठलाच्या चरणांवर मस्तक ठेवले की, मला इतर तीर्थयात्रा करण्याची आवश्यकता नाही. कारण विठ्ठलाच्या चरणांपाशीच सर्व तीर्थे असतात.''



**तुझे पाय माझी काशी । तुझे चरण तेचि गया ।**
**तुका म्हणे सकळ तीर्थे । तुझे पायी वसती येथें ॥ तु.गा.४१६३ ॥**

तुझे पाय आणि माझे मस्तक सदैव एकत्र राहू दे.

**तुझे पाय माझे भाळ । एकत्रता सर्वकाळ ॥ तु.गा.४४७६ ॥**

ते विठ्ठलाजवळ अखंड चरणसेवाच मागतात.

**तुज मागणे ते देवा । आम्हां तुझी चरणसेवा ॥ (तु.गा.७६१)**
**तुझा शरणागत । जन्मोजन्मीचा अंकित ॥ (तु.गा.७६२)**

संत तुकाराम महाराजांची 'पादसेवन भक्ती' जेव्हा पराकोटीला पोहोचते, तेव्हा त्यांना सर्वत्र विठ्ठलाचे चरणच दिसतात. म्हणून अन्यत्र कोठेही न जाता ते आपल्या मनोमंदिरातच विठ्ठलाची चरणवंदना करतात. ते म्हणतात की; ''द्वैताद्वैताची चर्चा भ्रामक आहे. कारण जगातील एकही कण असा नाही की, ज्यात विठ्ठल व्यापलेला नाही. तो अणुहूनही लहान व आकाशाहूनही मोठा आहे.''

**भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हा नको वाद त्याशी देऊ ।**
**तुका म्हणे अणु तुजविण नाही । नभाहूनि पाही वाड आहे ॥ तु.गा.३७ ॥**

संत तुकाराम शेवटी चित्तामध्ये विठ्ठलाचे समचरणच दृढ धरतात.

**जाणो नेणो काय । चित्ती धरू तुझे पाय ॥ तु.गा.३९६९ ॥**

**संत कबीर :**

संत कबीर निर्गुण निराकाराचे उपासक होते. निर्गुणाची चरणसेवा कशी शक्य आहे ? संत तुकाराम महाराज सगुणाकडून निर्गुणाकडे गेले होते. ते विठ्ठलाला अनन्यभावाने शरण गेले असल्यामुळे, त्यांच्या अभंगांत अनेक वेळा चरणसेवेचा उल्लेख आलेला आहे. संत कबीरांनी मानसिक स्तरावर त्या प्रभूशी अनेक संबंध प्रस्थापित केले आहेत. चरणवंदनाचा प्रकार हा सुद्धा अशाच मानसिक स्थितीचा द्योतक आहे. संत कबीर डोळ्यांनी प्रभूचे दर्शन घ्यावे, कानांनी त्याचे नाम ऐकावे, वाणीने नाम उच्चारावे आणि हृदयात त्याच्या चरणकमलांची स्थापना करावी अशाच प्रकारची नित्य इच्छा करतात.

**कबीर नैन निहारउ तुझ कउ स्रवन सुनउ तुझ नाम ।**
**बैण उचरउ तुझ नाम जी चरण कमल रिद ठाउ ॥सं.क.पृष्ठ २९०॥**

या चरणकमलांच्या दर्शनाचा अलौकिक आनंद त्यांना गुरुकृपेने मिळालेला आहे. तो आनंद शब्दांनी वर्णन करण्यापलीकडचा आहे.

**कहिबे कउ सोभा नहीं देखा ही परवानु ॥सं.क.पृष्ठ २६०॥**

प्रभूंच्या चरणसेवेचे आणि त्यापासून मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन संत कबीरांनी अनेक ठिकाणी केलेले आहे. उदाहरणार्थ;

**चरन कँवल की मौज में रहिस्यूं अंतिरू आदि ॥क.ग्रं. पृष्ठ ४२॥**
**चरननि लागि करौं बरिआई ॥क.ग्रं. पृष्ठ ६९॥**
**चरनकँवल चित लाइये राम नाम गुन गाइ ॥क.ग्रं. पृष्ठ ७०॥**
**कहै कबीर मेरी नाच उठावौ, तुम्हारे चरनकँवल दिखलावौ ॥क.ग्रं. पृष्ठ ८८॥**
**तजि विषिया भजि चरन मुरारि ॥क.ग्रं. पृष्ठ ९०॥**
**काम क्रोध अरु लोभ विवर्जित, हरिपद चीन्हैं सोई ॥क.ग्रं. पृष्ठ ११२॥**

संत कबीरांच्या दृष्टीने, चरणसेवा हे साधनेचे गौण अंग आहे. त्याचा संबंध शरणागतीशी आहे. काम-क्रोध-मोह इत्यादी विकारांच्या त्यागाशी चरणसेवेचा संबंध आहे. संत कबीरांचा असा विश्वास आहे की, आपल्या प्रेमपाशात परमेश्वराला बांधण्यासाठी त्याच्या पायांवर लोटांगण घालणे, त्याच्या गुणांचे वर्णन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भक्त सांसारिक बंधनातून मुक्त होतो आणि त्या हरिरसाचा, प्रेमरसाचा आस्वाद घेतो.

## (५) अर्चन भक्ती

### संत तुकाराम :

श्रद्धा व भक्तीने परमेश्वराच्या स्वरूपाची पूजा करण्यालाच 'अर्चन भक्ती' असे म्हणतात. या पूजेचे दोन प्रकार आहेत; बाह्य आणि मानसिक. स्थूल रूपाने बाह्य पूजेत अनेक उपकरणांची आवश्यकता असते. जसे; चंदन, फुले, धूप, दीप, नैवेद्य इत्यादी. परंतु मानसिक पूजेत परमेश्वराचे चिंतन आणि आत्मसमर्पण पुरेसे आहे.

संत तुकाराम महाराज हे मूर्तिपूजेचे समर्थक असून सुद्धा, त्यांनी



मानसपूजेवर अधिक भर दिलेला आहे. त्यांच्या दृष्टीने, मूर्ती ही चंचल मनाला स्थिर करण्याचे एक माध्यम आहे. वास्तविक पाहता, श्रद्धा ही महत्त्वाची असते. श्रद्धा नसेल तर त्या पूजेला काही अर्थ उरत नाही. काय मातीचे शिवलिंग (पशुपती) बनविल्यावर, त्याला देवत्व येते ? या प्रश्नाचे उत्तर तुकाराम महाराज असे देतात की, ''दगडाच्या मूर्तीची किंवा मातीच्या पशुपतीची श्रद्धेने पूजा केली, तर तो श्रद्धाभाव त्या देवतांना निश्चितपणे पोहोचतो. पण शेवटी माती ती मातीच राहते आणि पाषाण तो पाषाणच राहतो.''

संत तुकाराम महाराज म्हणतात;

**केला मातीचा पशुपती । परि मातीसि काय देव म्हणती ।**
**शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी समावे ॥**
**तैसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत ।**
**ज्याची पूजा तेणेंचि घेणें । आम्ही पाषाणरूप राहणे ॥तु.गा.२६२॥**

पूजेमध्ये संत तुकाराम महाराज भक्तीला महत्त्व देतात.

**भावचि कारण भावचि कारण । मोक्षाचे साधन बोलियेलो ॥तु.गा.२८२७॥**

ते म्हणतात की, ''स्वामीभक्ती, गुरुसेवा, पितृवचनाचे पालन आणि पतीची सेवा करणे ही खरी भगवान विष्णूंची पूजा आहे.''

**स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ।**
**तेचि विष्णूची महापूजा । अनुभव नाही दुजा ॥तु.गा.२२६१॥**

एका दगडाची पायरी केली आणि दुसऱ्या दगडाची मूर्ती बनविली. लोक पायरीवर पाय देतात आणि मूर्तीची पूजा करतात. दोन्ही दगडच असतात; पण भक्तांच्या भक्तीने दगडाच्या मूर्तीला 'देवपण' येते. म्हणून तुकाराम महाराजांच्या मते श्रद्धा महत्त्वाची आहे.

**पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥**
**सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव तेचि जाले ॥तु.गा.२२७०॥**

तात्पर्य असे आहे की, श्रद्धेने केलेली पूजा कशीही असली तरी, ती निश्चितच भगवंतांना प्राप्त होते.

संत तुकाराम महाराज म्हणतात की, ''निष्काम भावनेने भगवंतांची पूजा करावी. पार्थिव पूजेपेक्षा मानसपूजा सर्वोत्तम व श्रेष्ठ आहे. त्या पूजेत बाह्य उपकरणांची आवश्यकता नसते. अंतःकरणात परमेश्वराचे चिंतन व ध्यान करणे हीच खरी पूजा आहे.''

संत तुकाराम अशा सहज पूजेवर विश्वास ठेवतात. या पूजेत भक्त आपले सर्व सुखदुःखात्मक भोग परमेश्वराला अर्पण करतो. असा विदेही भक्त संसारातील सर्व भोग भोगून सुद्धा त्यांपासून अलिप्त राहतो. त्याला चराचरांत परमेश्वर दिसू लागतो. जल, चंदन, धूप, दीप, नैवेद्य सर्वांत त्याला परमेश्वर दिसू लागतो. संत तुकाराम महाराज या अवस्थेला पोहोचले होते. त्यांना सर्वत्र विठ्ठल दिसत होता. ते पूजा करायला बसले असताना त्यांच्या मनात असा विचार आला की; ''देवा, मी तुझी पूजा कशी करू ?''

**कासियाने पूजा करू केशिराजा । हाचि संदेह माझा फेडीं आता ॥१॥**
**उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेचे देवा ॥२॥**
**गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ॥३॥**
**फळ दाता तूंच तांबोल अक्षता । तरी काय आता नाहीं तुज ॥४॥**
**तुका म्हणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्ण हरि ॥तु.गा.१७२९.५॥**

**संत कबीर :**

श्रद्धायुक्त अंतःकरणाने परमेश्वराची पूजा करण्यालाच 'अर्चन भक्ती' म्हणतात. ही भक्ती सगुणोपासनेतच शक्य आहे. कारण या पूजेत परमेश्वराच्या मूर्तीची आवश्यकता असते. परंतु मानसिक पूजेत परमेश्वराचे ध्यान करणे व स्वतःला हीन-दीन समजून परमेश्वराच्या चरणांवर सर्वस्व समर्पण करणे पुरेसे असते. संत कबीरांनी तर मूर्तिपूजा व अवतारवादाचे स्पष्ट खंडन केलेले आहे. ते म्हणतात;

**पाँहण केरा पुतला, करी पूजै करतार ।**
**इही भरोसै जे रहै, ते बूड़े काली धार ॥क.ग्रं.पृष्ठ ३४॥**

ते अव्यक्त, असीम अशा निर्गुण निराकार ब्रह्माचे उपासक होते. त्या निराकार ब्रह्माचे त्यांनी वर्णन केले आहे.



**जाके मुँह माथा नहीं, नाही रूपक रूप ।**
**पहुँप बास थै पतला, ऐसा तत अनूप ॥क.ग्रं.पृ.४७॥**

अशा निर्गुण ब्रह्माची पूजा करण्यासाठी कोणत्याही देवळात जायची आवश्यकता नाही किंवा फल, फूल, जल इत्यादी पूजा-सामग्रीची देखील आवश्यकता नाही. ते आपल्या मनरूपी मंदिरात विराजमान असणाऱ्या अलक्ष्य ब्रह्माच्या पूजेअर्चेतच अखंड आनंदाचा अनुभव घेत होते.

## (६) वंदन भक्ती

**संत तुकाराम :**

भगवंतांचे माहात्म्य हृदयात धारण करून, नतमस्तक होऊन त्यांना नमस्कार करणे ही 'वंदन भक्ती' होय. ''प्रभो ! तुझा महिमा वर्णन करताना, **'नेति नेति'** असे म्हणून वेद सुद्धा मौनावले. मन-पवन पंगू झाले, सहस्रमुखांचा शेष थकून गेला. ऋषी-मुनी सुद्धा तुझे माहात्म्य वर्णन करण्यास असमर्थ ठरले; तेथे हा अल्पज्ञ तुका तुझे काय वर्णन करणार ?'' तुकाराम महाराज एवढेच म्हणतात की, ''मी तुझे बालक आहे आणि तू माझी माउली आहेस. तू आमच्यावर कृपेची सावली कर !''

**न कळे महिमा वेद मौनावले । जेथें पांगुळलें मन पवन ॥१॥**
**चंद्र सूर्य ज्याचे तेज वागविती । तेथे माझी मती कोणीकडे ॥२॥**
**काय म्या वाणावे तुझ्या थोरपणा । सहस्रवदना वर्णवेना ॥३॥**
**तुका म्हणे आम्ही बाळ तू माउली । कृपेची साउली करी देवा ॥४॥**

- तु.गा.४३६३

सर्वशक्तिमान, सर्वव्यापक, सर्वज्ञ, पतितपावन अशा मोक्षदात्या प्रभूला सोडून भक्त तुकाराम कोणापाशी काय मागणार ? आणि का मागणार ? भक्त तुकाराम हात जोडून प्रभूला प्रार्थना करतात की, ''मी तुला शरण आलो आहे. तू माझे रक्षण कर आणि तुझ्या चरणसेवेचे सुख मला दे.''

**दीनानाथ हे साक्ष तुझी जनासी । दिनें तारिलीं पातकीं थोर दोषी ।**
**तुका राहिला पायि तो राख देवा । असे मागतो तुझी चरणसेवा ॥**

- तु.गा.११०९

संत तुकाराम महाराजांचा दृढ विश्वास आहे की, प्रभूच्या चरणांचे वंदन करण्यामुळे आणि उच्छिष्ट पत्र-पुष्पांचे सेवन करण्यामुळे पूर्व जन्मींची कर्मे भस्म होतात आणि नामस्मरण व नामसंकीर्तनामुळे भक्ताला भवसागर पार करता येतो.

**वंदू चरणरज सेवू उष्टावळी । पूर्वकर्मा होळी करुनी सांडू ॥ २ ॥**
**अमुप हें गांठीं बांधू भांडवल । अनाथा विठ्ठल आम्हा जोग ॥ ३ ॥**
**अवघे होती लाभ एका या चिंतनें । नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥ ४ ॥**
**जन्ममरणांच्या खुंटतील खेपा । होईल हा सोपा सिद्धपंथ ॥ तु.गा. २५४३.५ ॥**

या वंदन भक्तीने भक्ताला अनेक लाभ होतात.

**संत कबीर :**

परमेश्वराचे माहात्म्य लक्षात घेऊन त्याची स्तुती करणे, त्याच्या अनंत वैभवापुढे स्वतःला तुच्छ समजून त्याला नम्रपणे प्रणाम करणे हीच 'वंदन भक्ती' आहे. संत कबीरांच्या काव्यात ज्या ठिकाणी परमेश्वराची प्रार्थना केलेली आहे, त्याची स्तुतिस्तोत्रे गायिली आहेत, त्याचा गुणगौरव केलेला आहे, तो भाग म्हणजे 'वंदन भक्ती'चेच उदाहरण आहे. संत कबीरांच्या मताप्रमाणे, अहंकाराचा संपूर्ण त्याग करून त्या दीनवत्सलाला शरण गेल्यानेच त्याची प्राप्ती होते.

**रोड़ा व्है रहौ बाट का, तजि पावँउ अभिमान ।**
**ऐसा जे जन व्है रहै, ताहि मिलै भगवान ॥**

''जे लोक अहंकार सोडून रस्त्यातील धूलिकणाप्रमाणे नम्र (तुच्छ) होतील, त्यांनाच परमेश्वराची प्राप्ती होईल.''

आणखी एका ठिकाणी, ते आपल्या अपराधांची क्षमा मागतात व परमेश्वराजवळ आपल्याला भवसागरातून पार करण्याची विनंती करतात.

**कबीर करत है बीनती, भौसागर मे ताँई ।**
**बंदे ऊपरि जोर होत है, जँम कूँ बरजि गुसाँई ॥ क.ग्रं. पृष्ठ ६७ ॥**

संत कबीर परमेश्वराला विनंती करतात की; ''मला भवसागरातून पार करव, या यमयातनांतून तू मला सोडव !''

संत कबीर हे निर्गुणोपासक असल्यामुळे, त्यांच्या काव्यात अर्चन व



वंदन भक्तीची उदाहरणे अत्यल्प प्रमाणात आढळतात. परंतु संत तुकाराम महाराज सगुणोपासक असल्यामुळे, त्यांच्या काव्यात अर्चन व वंदन भक्तीची उदाहरणे भरपूर आढळतात.

## (७) दास्य भक्ती

**संत तुकाराम :**

'दास्य भक्ती'मध्ये भगवंत आणि भक्त यांचे संबंध स्वामी-सेवकाचे असतात. भक्त भगवंतांना 'स्वामी' आणि स्वतःला 'सेवक' किंवा 'दास' समजतो. भगवंतांचे ऐश्वर्य आणि सामर्थ्य पाहून भक्त त्यांच्यापुढे नतमस्तक होतो, त्यांना शरण जातो. 'दास्य भक्ती'त शरणागतीची भावना अत्यंत प्रबळ असते. भक्त भगवंतांना वारंवार हेच सांगतो की, ''मी पापी, अपराधी कसाही असलो, तरी तुला शरण आलो आहे. आता कसेही करून तू माझा उद्धार कर !'' भक्त आपल्या पाप-पुण्याचे सर्व ओझे भगवंतांवर टाकून स्वतः निश्चिंत होतो. संत तुकाराम महाराजांच्या अनेक अभंगांतून या 'दास्य भक्ती'ची अभिव्यक्ती झालेली आहे.

संत तुकाराम महाराज सर्व सांसारिक प्रलोभनांचा त्याग करून भगवंतांना शरण जाऊन म्हणतात; ''पापी असणाऱ्या मला जन्म-मरणांच्या चक्रातून मुक्त कर.'' (तु.गा. १६४७). दुसऱ्या एक अभंगात ते म्हणतात की; ''मी बुद्धिहीन आहे, दीन आहे. म्हणून माझ्या मनातील व्याकुळता दूर करून, तू प्रेमपूर्वक माझे रक्षण कर. मला पूर्ण विश्वास आहे की, तू माझ्या सर्व अपराधांना क्षमा करशील !''

**क्रिया मति हीन । एक मी गा तुझें दीन ॥ १ ॥**
**देवा करावा सांभाळ । वारी माझी तळमळ ॥ २ ॥**
**नको माझें ठायीं । गुण दोष घालूं कांहीं ॥ ३ ॥**
**अपराधाच्या कोटी । तुका म्हणे घालीं पोटीं ॥ तु.गा.७६४.४ ॥**

तो सर्वनियंता परमेश्वर संत तुकाराम महाराजांचा भारवाही आहे आणि आपल्या भक्ताच्या हिताहिताची चिंता करणारा आहे. संत तुकाराम महाराजांसाठी अष्ट सिद्धी सुद्धा तुच्छ आहेत. ते पूर्णपणे परमेश्वराचा दास होऊन राहण्याची इच्छा करतात. कारण परमेश्वर सदैव आपल्या भक्तांचे रक्षण करतो; मग भक्ताला भय किंवा चिंता कशाची ? भक्तांना यमाची सुद्धा भीती नसते.

**सिद्धीचा दास नव्हें श्रुतीचा अंकिला । होईन विठ्ठला सर्व तुझा ॥ १ ॥**

**तुका म्हणे जालों तुझाचि अंकिला । न भियें मी विठ्ठला कळिकाळासी ॥ ६ ॥**

- तु.गा.३४५८

सेवा करणे हे सेवकाचे कर्तव्य आहे आणि त्याचे रक्षण करणे हा स्वामीचा धर्म आहे. (तु.गा.३१६०). ''सर्व लोक मला तुझा सेवक किंवा दास समजतात. तेव्हा तू आपल्या ब्रीदाची लाज राख. तू पतितपावन आहेस म्हणून मी पूर्णपणे निश्चिंत झालो आहे. तू एका क्षणात राईचा पर्वत बनवू शकतोस; मग माझ्यासारख्या पाप्याचा उद्धार करणार नाहीस का ?''

**तुझा दास मज म्हणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर ॥ १ ॥**

**हेंचि आतां लागे करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ॥ २ ॥**

**तुका म्हणे तुज काय ते आशंका । तारिता मशका मज दीना ॥ तु.गा.३३७९.५ ॥**

सेवकाच्या एकनिष्ठ सेवेमुळे, त्याला स्वामी माता-पित्यांप्रमाणे वाटतात. स्वामी पण सेवकावर पुत्रवत् प्रेम करतात. संत तुकाराम महाराजांना विश्वास आहे की, स्वामींच्या आज्ञेचे पालन करण्यामुळे, त्यांच्या प्रपंचाचे ओझे कमी होईल. ते म्हणतात की, ''माझ्या संसाराचे ओझे मी भगवंतांच्या खांद्यांवर ठेवले आहे !''

**तुका म्हणे माझी ये जातीची सेवा । घातलासे देवावरी भार ॥ तु.गा.३२२९ ॥**

भक्त भगवंताच्या अनंत ऐश्वर्याने चकित होतो. त्याच्या सामर्थ्याची प्रचिती आल्यामुळे तो निश्चिंत हातो. 'त्या सर्वशक्तिमान परमेश्वराचा मी सेवक आहे', या अनुभूतीमुळे त्याच्यात आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्या परमेश्वराला सोडून तो कोठेही जात नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात की, ''आम्ही विठ्ठलाचे समर्थ दास आहोत. आम्ही कळिकाळावरही मात केली आहे. काम-क्रोध इत्यादी शत्रूंना आम्ही नष्ट केले आहे. परमेश्वराशिवाय इतर सर्व काही आम्हांला तृणवत्-तुच्छ आहे.''

**बळिवंत आम्ही समर्थाचे दास । घातलिया कास कळिकाळासी ॥ १ ॥**

**संसाराचे बळि साधिलें निधान । मारिले दुर्जन षड्वर्ग ॥ ३ ॥**

**तुका म्हणे एक उरला धरिता ठाव । येर केले वाव तृणवत ॥ तु.गा.१७७७.४ ॥**

संत तुकाराम महाराजांच्या दास्य भक्तीतही एक प्रकारचे सामर्थ्य होते.



**संत कबीर :**

दास्य भक्तीमध्ये भक्त स्वतःला सेवक आणि भगवंताला स्वामी समजतो. आपल्या योगक्षेमाची चिंता संपूर्णपणे त्याच्यावर सोपवतो. भगवंताचे अनंत ऐश्वर्य आणि असीम सामर्थ्य पाहून तो हतबुद्ध होतो. भक्तिसाधनेच्या सुरुवातीच्या काळात, भक्त कबीर आपले दैन्य आणि क्षुद्रपणा यांचा विचार करून निराश होतात. त्यांच्या मनात विचार येतो की, भगवंत आपला स्वीकार करील की नाही ? (क.ग्रं. पृष्ठ ७६). परंतु आपल्या स्वामीची दयालुता, भक्तवत्सलता आणि दातृत्व लक्षात आल्यावर त्यांची निराशा दूर होते. मी एवढ्या महान स्वामीचा सेवक आहे, तर मला भीती कशाची ? या विचाराने त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो आणि ते स्वतःला स्वामीच्या चरणांवर पूर्णपणे समर्पित करतात. स्वामीच्या सामर्थ्याचा त्यांना इतका विश्वास वाटतो की, आपल्या 'रामा'ला सोडून ते कोणाचीही सेवा करू इच्छित नाहीत. हीच भक्तीची अनन्यता आहे. ज्याचा रामासारखा समर्थ स्वामी असेल, **'राम सरिखा साहिब'**, तो दुसऱ्या कोणाला कशाला शरण जाईल ? संत कबीरांची आपल्या स्वामीवर अनन्य श्रद्धा आहे. ते म्हणतात;

**तारण तिरण तिरण तू तारण, और न दूजा जानौं ।**

**कहे कबीर सरनाँई आयौ, आन देव नहीं मानौं ॥**

अन्यत्र ते म्हणतात;

**जब मोहि राम भरोसा तेरा, और कौन का करौ निहोरा ।**

**जाकै राम सरिखा साहिब साई, सो क्यों अनत पुकारन जाई ॥ क.ग्रं. पृष्ठ ९५ ॥**

सेवकाची ही निष्ठा अलौकिक आहे.

दास्य भक्तीमध्ये दासाची दीनता अधिक प्रबळ असते. संत कबीर सुद्धा आपली दीनता प्रकट करताना स्वतःला स्वामीचा (रामाचा) कुत्रा समजतात.

**कबीर कूता राम का, मुतिया मेरा नाऊँ ।**

**गलै राम की जेवड़ी, जित खैंचे तित जाऊँ ॥ क.ग्रं. पृष्ठ १५ ॥**

''मी माझ्या स्वामीचा रामाचा कुत्रा आहे. माझ्या गळ्यात 'रामनामा'ची साखळी बांधली आहे. तो जिकडे नेईल तिकडे मी जाईन !''

संत कबीरांचा हा अद्‌भुत स्वामी, सेवकाच्या चातुर्यावर नाही, तर निष्काम भावनेने केलेल्या त्याच्या भोळ्या भक्तीवर प्रसन्न होतो.

**स्वामी सेवक एक मत, मन ही मैं मिलि जाइ ।**
**चतुराई रीझै नहीं, रीझै मन कै भाई ॥क.ग्रं. पृष्ठ ५३॥**

म्हणूनच संत कबीर दीन भावनेने भक्ती करायला सांगतात. जो रामाला शरण गेला आहे, अशा भक्ताला धन्य मानतात. **'जे रहै राम की ओट। (क.ग्रं. पृष्ठ ३९)'**.

संत कबीरांच्या दास्य भक्तीची चरमसीमा, ही ते जेव्हा स्वतःला रामाचा गुलाम समजून आपले संपूर्ण जीवन त्याच्या चरणांवर समर्पण करतात त्यावेळी दिसून येते.

**मैं गुलाम मोहि बेचि गुसाईं, तन मन धन मेरा रामजी कै ताँई ॥**
**आनि कबीरा हाटि उतारा, सोई ग्राहक बेचनहारा ॥**
**बेचै राम तो राखै कौन, राखै राम तो बेचै कौन ॥**
**कहै कबीर मैं तन मन जाऱ्या, साहिब अपनाँ छिनन बिसाऱ्या ॥**

- क.ग्रं. पृष्ठ ९५

''मी रामाचा गुलाम आहे. रामाने मला खुशाल विकावे. कारण माझे तन-मन-धन त्याचेच आहे. या बाजारात विकणारा तोच आहे आणि खरेदी करणाराही तोच आहे. रामानेच विकून टाकले, (त्याग केला) तर कोण रक्षण करणार ? आणि राम जर रक्षण करणारा असेल, तर कोण विकणार ? मी त्याला सर्वस्व अर्पण केलेले आहे. एक क्षणभर सुद्धा मी त्याला विसरलेलो नाही !''

संत कबीरांच्या दास्य भक्तीत संपूर्ण समर्पण आहे. मनाने, वाचेने, कर्माने रामाचा सेवक बनण्यात त्यांना अद्‌भुत गौरव वाटतो. 'राम का कूता' बनण्यात जशी दैन्य भावना आहे, तशी एक विलक्षण श्रद्धा पण आहे, एक अनन्यभाव पण आहे.

**- (क्रमशः)**

□□



# कर्म : जीवनाचे मुख्य सूत्र

डॉ.सौ.सुनीता तांबे

**प्रारंभिक :**

मानवी जीवनाचा विकास हा कर्मनिष्ठेतूनच होत असतो. उपनिषद्‌-काळापासून सर्वच विचारवंतांनी कर्मनिष्ठेस महत्त्व दिलेले आहे. उपनिषदेही सांगतात; ''दीनवाणे न होता, लाचारीने दास्य न स्वीकारता, आनंदाने शंभर वर्षे जगण्याची गुरुकिल्ली म्हणजे कर्मयोग होय.''

**'नियतं कुरु कर्म'** ही श्रीमद् भगवद्गीतेची महत्त्वाची शिकवण आहे. ह्याच शिकवणुकीस अनुसरीत, संत ज्ञानेश्वरांनी दृढतेने कर्मयोगाचा पाया घातला. ते कर्मनिष्ठा पदोपदी गौरवितात. त्यांच्या दृष्टीने, 'कर्म' हा देहाचा स्थायीभाव असून, देह व कर्म यांचा नैसर्गिक घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळे स्वाभाविक कर्माविषयी उद्वेग दर्शविणे हे अज्ञानाचेच लक्षण म्हणायला हवे. (ज्ञाने.३.१४५). कोणत्याही व्यक्तीने कर्माविषयी कंटाळा वा उद्वेग व्यक्त करणे, याचा अर्थ घटाने मातीस विटण्याप्रमाणे अथवा वस्त्राने तंतुत्याग करण्याप्रमाणे आहे. दिव्याने प्रकाशाला दूर सारणे, पाण्याने आपला स्वाभाविक ओलावा सोडणे ह्या गोष्टी ज्याप्रमाणे अशक्यच, त्याप्रमाणे माणसाने कर्मत्यागाचा केवळ विचार करणेही मूर्खपणाचे असल्याचे ते सांगतात. (ज्ञाने.१८.२२२).

अर्थात् कर्माच्या बंधनात अडकायचे नसेल, तर स्वतः कर्मातीत होणे आवश्यकच असल्याचे त्यांनी सांगितले आहे. (भ.गी.३.४). परंतु 'कर्मातीत होणे म्हणजे कर्म सोडून देणे नव्हे' असाच भगवद्गीतेचा आग्रह आहे. कर्मातीततेसाठी कर्म करण्याचे कौशल्य अंगी असले पाहिजे. बंधनाचे मूळ कर्मात नसून कर्म करणाऱ्याच्या मनोवृत्तीतच असते. हे लक्षात घेतल्यास, कर्मरत राहूनच नैष्कर्म्यता प्राप्त करून घेता येईल, असे ज्ञानेश्वर माउली सांगतात.

खरे तर, 'कर्मयोग' हा सर्वांच्या उत्कर्षाचे सुलभ साधन आहे असे म्हणता

येते. **'जाणां नेणां सकळां । कर्मयोग कीर प्रांजळा । (ज्ञाने.५.१६)'** असे ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलेले आहे. **'जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । (ज्ञाने.३.५.५३)'** असे ते स्पष्टपणे सांगतात. वस्तुतः मनुष्याची सर्व कार्ये ही इंद्रियांच्या स्वाभाविक प्रवृत्तींना अनुसरूनच घडत असतात. ती सोडू म्हटले तरी सोडता येणार नाहीत. कान ऐकण्याचे, डोळे पाहण्याचे, नाक वास घेण्याचे, जीभ चव घेण्याचे आणि त्वचा ही स्पर्शज्ञानाचे कार्य सोडणार नाही की श्वासोच्छ्वास, मनोव्यापार तसेच शरीराची तहान-भूक देखील हरपणार नाही. देहधर्म लोपत नाहीत, इंद्रियव्यापारही थांबत नाहीत, तर मग सोडणार ते काय ? अर्थात् प्रकृतीच्या अधीन असणारी व्यक्ती कर्म सोडू शकत नाही हेच खरे ! ज्ञानेश्वर महाराज सांगतात;

**म्हणौनि संगु जंव प्रकृतीचा । तंव त्यागु न घडे कर्माचा ।**
**ऐसियाही करूं म्हणती तयांचा । आग्रहोचि उरे ।।ज्ञाने.३.५.६३।।**

ज्ञानेश्वर महाराजांच्या दृष्टीने, कर्माची नौका हातची सोडून पैलतीरीच्या नैष्कर्म्यावस्थेस पोहोचता येत नाही. जर शरीरयात्राही कर्मत्यागाने साध्य होत नाही, तर त्यामुळे नैष्कर्म्यता साध्य होईल असे समजणे हे अविवेकीपणाचेच होय.

**कीं प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि नैष्कर्म्य होईजे ।**
**हें अर्जुना वायां बोलिजे । मूर्खपणें ।।ज्ञाने.३.४.४६।।**

जाणत्यांनी सर्वांसमोर कर्मनिष्ठेचा आदर्श ठेवायला हवा. केवळ व्यक्तिसापेक्षच नव्हे, तर समाजासंदर्भातही कर्मयोगाचे मूलभूत महत्त्व आहे. जाणत्यांनी, कर्मास निकृष्ट समजून अविचाराने मनाला येईल तसे वागणे ज्ञानेश्वर महाराजांना अभिप्रेत नाही. त्यांच्या दृष्टीने तर, ज्ञानी व्यक्तींनी समाजाचा बुद्धिभेद होईल असे काहीही करता कामा नये. उलट समाजातील दुर्बलांसाठी, त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वतः आदर्श कर्माचरण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानायला हवे. श्रेष्ठ लोक समाजात वावरताना ज्याप्रमाणे आपले वर्तन ठेवतात, तेच आदर्श वर्तन समजून त्यानुसार सर्वसामान्यही वागू लागतात. त्यासाठीच जाणत्यांनी अधिकच जबाबदारीने वागणे आवश्यक असते. **'विशेषें आचरावें । लागे संतीं ।। ज्ञाने.३.२१.१५९ ।।'** असेच ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटलेले आहे.



ज्ञानेश्वर महाराज सांगतात;

**मार्गाधारें वर्तावे । विश्व हें मोहरे लावावें ।**
**अलौकिक नोहावें । लोकांप्रति ।।ज्ञाने.३.२५.१७१।।**

वैयक्तिक लाभासाठी नाही, तर सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी कर्तव्यनिष्ठा राखली पाहिजे. समाजव्यवस्था टिकून राहावी, यासाठी त्यांनी समाजापुढे स्वानुचरणाने योग्य तो आदर्शही राखायला हवा. विहित कर्माची महतीही समाजास पटवून द्यायला हवी. ज्ञानेश्वर महाराजांच्या दृष्टीने, **'हे सकल लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा । (ज्ञाने.३.२५.१७०)'** असल्याने, ज्ञानवंतांनी तर सदैव जागृतच राहायला हवे. कारण ते समाजाचे जबाबदार, जागरूक नागरीक असतात.

अर्धपोटी जनतेसमोर परमार्थाची महती गाणे म्हणजे त्यांच्यावर एका परीने अन्याय करण्यासारखेच असते. तेव्हा प्रथम त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करून द्यायला हवी. त्यानंतरच त्यांच्या जीवनास पुढे जरा स्वस्थता लाभली की, तेही आनंदाने परमार्थाकडे वळू शकतील. याचसाठी सुस्थिर जीवनाचा पाया असलेला 'कर्मयोग' प्रथम सर्वांनी आत्मसात करायला हवा. कारण ज्याला आपले विहित कर्म नीट आचरून योग्यरीत्या प्रपंचही करता येत नाही, तो परमार्थाचा विचार करेल हे असंभवनीयच ! **'जयां ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई । (ज्ञाने.४.३१.१५४)'** असेच ज्ञानेश्वर महाराज अशांच्या बाबतीत म्हणतात. त्यांच्या दृष्टीने, ज्ञानवंतांनी स्वानुचरणाने कर्मनिष्ठेचे महत्त्व समाजमनावर बिंबवायला हवे. कर्मनिष्ठेतूनच अंती यथावकाश सर्वंकष प्रगती साधली जाते.

ज्ञानेश्वर महाराजांनी वैयक्तिक प्रगतीसाठी तसेच सुस्थिर समाजव्यवस्थेसाठीही कर्मयोगाची कास धरणेच हितावह असल्याचे सांगितले आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार व ब्रह्मचर्यादी चार आश्रमांच्या व्यवस्थेनुसार प्राप्त होणारे कर्म म्हणजे विहित कर्म. हेच कर्म मानवी जीवनात जिव्हाळा, स्नेह निर्माण करू शकते. मात्र एकदा हे विहित कर्म स्वीकारले, की इतरांच्या कर्माशी त्याची तुलना करून, त्यातून श्रेष्ठ-कनिष्ठ भाव जोपासले जाता कामा नयेत. अध्ययन-संशोधन वा अध्यापनादी क्षेत्रांतील व्यक्तींनी, समाजातील

इतरांना कमी प्रतीचे समजून आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये. त्याचप्रमाणे इतरही व्यावसायिकांना होणारा अधिक आर्थिक लाभ बघून कोणी त्यांचा द्वेषही करू नये.

कर्मयोगाचे वैशिष्ट्य असे की, जर योग्यरीत्या तो आचरणात आणला गेला, तर ऐहिक प्रगतीबरोबरच आंतरिक उन्नतीही हळूहळू होत जाते. कर्मयोगाचे महत्त्व सांगताना ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे, **'ऐहिक तरी न नशे । आणि मोक्षु तो उरला असे । (ज्ञाने.२.२२३)'**

वास्तविक पाहता, आंतरिक समाधानास्तव व्रताचरणे, उपास-तापास, तीर्थयात्रा करीत देव-देवतांची दर्शने घेणे, जपतपादी अनुष्ठाने करणे, पूजाअर्चा करणे, ब्राह्मणभोजने घालणे, मंत्रतंत्रादी खटाटोप करणे इत्यादी विविध कर्मकांडांच्या मार्गाने जरी गेले, तरी त्यामुळे मनाला समाधान लाभेलच अशी खात्री नसते. तेव्हा या कशाचाही आधार न घेता, स्वधर्मरूपी देवतेची निष्ठापूर्वक आराधना करणेच महत्त्वाचे आहे. ज्ञानेश्वर महाराज सांगतात;

**तुम्हीं व्रत नियम न करावे । शरीरातें न पीडावें ।**
**दूरि केंही न वचावें । तीर्थासी गा ॥ज्ञाने.३.१०.८९॥**
**योगादिकें साधनें । साकांक्ष आराधनें ।**
**मंत्रतंत्रविधानें । झणीं करा ॥ज्ञाने.३.१०.९०॥**
**देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें ।**
**तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ॥ज्ञाने.३.१०.९१॥**
**म्हणोनि स्वधर्मे जें अर्जे । तें स्वधर्मेंचि विनियोगिजे ।**
**मग उरे तें भोगिजे । संतोषेंसीं ॥ज्ञाने.३.१३.१२५॥**

ज्ञानदेवांच्या दृष्टीने, 'स्वधर्माचरण' हाच आपल्या जीवनात प्रगती घडवून आणणारा यज्ञ आहे.

**संदर्भ :**

'ज्ञानेश्वरीचे भावविश्व'; लेखक : डॉ.मो.रा.गुण्ये

□□



# तयातें मी माथां मुकुट करीं

ह.भ.प.श्री.राजेंद्र गणपत दहिभाते

भगवान श्रीमहाविष्णूंनी दीनजनोद्धारार्थ अलंकापुरी येथे ज्ञानियांचा राजा श्रीज्ञानेश्वर माउलींच्या रूपाने अवतार धारण केला. सर्व जनांसाठी मोक्षाची बाजारपेठ खुली करून, वैष्णवांची मांदियाळी निर्माण केली. ज्ञानामृताची जान्हवी अशी ज्ञानेश्वरी रचून, भगवंतांच्या हृदयीचे गुह्य सर्वांसाठी प्रकट केले. ह्या ज्ञानसूर्याच्या दिव्य प्रकाशात, त्यांच्या समकालात आणि पुढेही अनेक संतमहात्मे प्रकाशमान झाले. श्रीज्ञानेश्वर माउलींच्या वाङ्मयाचा फार मोठा परिणाम पुढील संतांच्या जीवनावर व वाङ्मयावरही झालेला दिसून येतो. श्रीएकनाथ महाराजांच्या 'नाथ भागवता'वर आणि श्रीतुकाराम महाराजांच्या 'अभंग गाथे'वरही श्रीमाउलींच्या वाङ्मयाचा प्रभाव दिसून येतो.

श्रीज्ञानेश्वर माउलींनी भागवत भक्तिसंप्रदायाचा पाया रचला. श्रीनामदेव महाराज, श्रीएकनाथ महाराज इत्यादी संतांनी त्या पायावर भागवत मंदिराची भक्कम अशी उभारणी श्रीज्ञानेशांच्या आदेशानुसारच केली. ह्या मंदिराच्या कलशस्थानी विराजमान झाले ते जगद्गुरु संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज. म्हणूनच संत बहिणाबाई विनययुक्त आदराने श्रीमहाराजांविषयी म्हणतात;

**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥ब.गा.१४३.५॥**

धर्माचे पालन करणे हे संतांचे मुख्य कार्य. म्हणूनच श्रीतुकाराम महाराज म्हणतात; **'धर्माचे पाळण । करणे पाखांड खंडण ॥ हेंचि आम्हां करणे काम । बीज वाढवावे नाम ॥तु.गा.२०७६॥'** श्रीनामदेव महाराजांपासून ते श्रीतुकाराम महाराजांपर्यंत आणि पुढेही सर्व संतमहात्म्यांनी, श्रीज्ञानेश्वर माउलींचा आदर्श समोर ठेवून आपले अवतारकार्य पार पाडले. आदर्श भक्त, ज्ञानी, गुणातीत, स्थितप्रज्ञ कसा असावा ? याचे यथार्थ चित्रण श्रीज्ञानेश्वर माउलींनी ग्रंथराज ज्ञानेश्वरीत प्रकट केलेले आहे. तो आदर्श समोर ठेवूनच पुढील साधू-संतांनी तसे आचरण करून दाखविले. ज्ञानेश्वरीतील विचारांचा

फार मोठा प्रभाव श्रीसंत तुकाराम महाराजांच्या जीवनावर झालेला दिसून येतो. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या अभंगगाथेत दिसते. श्रीज्ञानेश्वर माउलीचरणी नतमस्तक होऊन अतीव विनयाने श्रीतुकाराम महाराज म्हणतात;

**ज्ञानियांचा गुरु राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें ।**

**मज पामरा हें काय थोरपण । पायींचीं वहाण पायीं बरी ।।तु.गा.३३९८।।**

ग्रंथराज ज्ञानेश्वरीत, श्रीगीतेच्या 'भक्तियोग' नामक बाराव्या अध्यायातील तेराव्या श्लोकावरील टीकेपासून, श्रीज्ञानेश्वर माउली पराभक्ती लाभलेल्या भक्ताची लक्षणे वर्णन करतात. ही सर्व लक्षणे श्रीतुकाराम महाराजांच्या अंगी बाणलेली त्यांच्या अभंगांतील स्वानुभवयुक्त उद्‌गारांतून दिसून येतात. सुमारे शंभर ओव्यांतून श्रीमाउलींनी या भगवद्‌भक्ताची लक्षणे वर्णिलेली आहेत.

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**

**निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ।।भ.गी.१२.१३।।**

प्रस्तुत श्लोकात श्रीभगवंत आपल्या प्रिय भक्ताविषयी म्हणतात; ''माझा भक्त कोणाही प्राण्याचा द्वेष न करणारा, सर्वांशी मित्रत्वाने वागणारा आणि दयाशील असतो. तसेच तो निःस्वार्थी, निरहंकारी, सुखदुःखांना समान लेखणारा आणि क्षमाशील असतो.''

भगवंतांच्या प्रेमभक्तीत रंगलेल्या ह्या भक्ताला, श्रीमाउली **'शांतीचा माजिवटा'** म्हणजे 'मूर्तिमंत शांतिस्वरूप' असे म्हणतात. ही शांती चित्ताच्या समत्वातून आलेली असते आणि हे समत्व सर्वांभूती भगवद्‌भाव राहिल्याने आलेले असते.

श्रीभगवंतांना श्रीमाउली **'सर्व सुखाचे आगर'** असे म्हणतात. **'तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख ।'** किंवा **'तुझे पायी सुख सर्व आहे ।'** अशी संत तुकाराम महाराज श्रीभगवंतांपुढे आपली भावनिष्ठा व्यक्त करतात. भगवान पांडुरंगच सर्वत्र व्यापलेले आहेत, ही तुकाराम महाराजांची दृढ धारणा होती. **'विठ्ठल विस्तारला जनी । सप्तही पाताळे भरोनि । विठ्ठल व्यापक त्रिभुवनी । विठ्ठल मनीमानसी ।।तु.गा.४०१५।।'** ही त्यांची भगवद् साक्षात्काराची व्यापक अनुभूती होती.



सर्वत्र आणि सर्वांमध्ये भगवंत व्यापून आहेत. घटाघटांमध्ये एकच परमात्मचैतन्य भरून ओसंडत आहे. चराचरामध्ये ते ओतप्रोत भरलेले व भारलेले आहे, असा अनुभव आल्यामुळे मी-तूपणा उरलाच नव्हता; तर मग द्वेष कोणाचा करायचा ? म्हणून तेव्हा तो भक्त **'अद्वेष्टा सर्वभूतानाम्'** असा होतो.

एकदा श्रीतुकाराम महाराज एका झाडाजवळ गेले असता, तेथे दाणे टिपत असलेला चिमण्यांचा घोळका, महाराज जवळ आलेले पाहताच भीतीने उडून गेला. ही एक साधी घटना; पण त्या घटनेने महाराजांचे अंतःकरण हेलावून गेले. ज्याअर्थी आपल्याला पाहून चिमण्या भिऊन उडून गेल्या, त्याअर्थी आपल्यातील द्वैतभाव व द्वेषभाव नाहीसा झालेला नाही असे समजून, त्याक्षणीच भगवान पांडुरंगांना श्रीमहाराज कळवळून म्हणाले;

**अवघी भूतें साम्या आलीं । देखिली म्यां कै होती ।।१।।**

**विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ।।२।।**

**माझी कोणी न धरू शंका । ऐसे हो का निर्द्वंद्व ।।३।।**

**तुका म्हणे जे जे भेटे । ते ते वाटे मी ऐसे ।।तु.गा.१०११.४।।**

**'जे जे भेटे, ते ते वाटे मी ऐसे ।।'** असा अनुभव येणे ही भगवान पांडुरंगांची कृपा समजावी, असा श्रीमहाराजांचा ठाम विश्वास होता. स्वार्थी प्रवृत्तीचे प्रतीक म्हणजे द्वेष. पण येथे कसला स्वार्थ नाहीच. कोणाकडून काही मिळवायचे सुद्धा नाही. माझे-तुझे असे भेदाचे बोलणे केव्हाच संपले आहे. त्यामुळे **'आणिक न लगे मायिक पदार्थ । तेथे माझे आर्त नको देवा ।।तु.गा.१।।'** अशी महाराजांची श्रीपांडुरंगांच्या चरणी मागणी. इतकेच काय; **'न लगे मुक्ती आणि संपदा । (तु.गा.२२२२)'** इतका पराकोटीचा निःस्वार्थ भाव श्रीमहाराजांच्या ठायी, तर मग तेथे स्वार्थ असेलच कसा ? तसेच स्वार्थसिद्धीच्या आड येऊ पाहणाऱ्या अडथळ्यांचा द्वेष मनात उद्‌भवण्याचा प्रश्नच नाही. कारण आप-परभाव महाराजांच्या ठायी उरलाच नव्हता. योगी-भक्ताची लक्षणे सांगताना म्हणूनच श्रीमाउली म्हणतात;

**सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेचि कंहीं ।**

**तयां आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ।।ज्ञाने.१२.१३.१४४।।**

उत्तमाला आधार द्यावा आणि अधमाला देऊ नये असे पृथ्वी कधीच करीत नाही. प्राणवायू इतका कृपाळू असतो की, तो राजदेहाचे चलनवलन चालू ठेवावे व दरिद्री पुरुषाच्या देहाला या क्रियेपासून दूर ठेवावे असे म्हणत नाही. **'ऐसी सर्व भूतमात्री । येकपणाची मैत्री । कृपेची धात्री । आपण जो ॥ज्ञाने.१२.१३.१४८॥'** 'अद्वेष्टा' या भूमिकेतून सिद्ध झालेला हा निःस्वार्थ मैत्रभाव आहे. तुकाराम महाराजांच्या ठायीचा तोच मैत्रभाव **'भूतीं देव म्हणोनि भेटतो या जना । नाही हे भावना नरनारी ॥तु.गा.१२३०॥'** या शब्दांत प्रकटतो.

आपल्यासारख्या सामन्य जनांमध्ये, कुठेतरी मैत्रभाव असतो म्हणजे बहुधा आणखी कुठेतरी शत्रुत्वभाव असण्याची शक्यता असते. अशा प्रकारचा हा सापेक्ष मैत्रभाव शाश्वत व सुखदायी नसतो. राग आणि द्वेष यांतून मित्र-शत्रू हे द्वैत निर्माण होते. समस्त भूतमात्रांविषयी महाराजांची राग-द्वेषरहित निःस्वार्थ प्रीती होती. एखाद्या व्यक्तीविषयी द्वेषयुक्त विधान जरी त्यांच्या मुखातून बाहेर पडलेले दिसत असले, तरी ''आम्ही त्या व्यक्तीची निंदा केली नसून, त्याच्यातील अवगुणांची निंदा केली आहे.'' असे श्रीमहाराज म्हणतात.

एकदा श्रीतुकाराम महाराज मंदिर-प्रदक्षिणा घालत असताना, एका किरकोळ कारणावरून मंबाजी गोसाव्याने महाराजांना बोराटीच्या काठीने झोडपून काढले. श्रीमहाराजांविषयी मंबाजीच्या मनात द्वेष खदखदत होता, पण महाराजांच्या मनी अपार शांती होती. अप्रतिकारपूर्वक त्यांनी ते दुःख सहन केले. तसेच मंबाजीचा त्यांनी कठोर शब्दांत निषेधही केला नाही. उलट ते पांडुरंगांनाच त्याप्रसंगी म्हणू लागले;

**बरवे बरवे । केले विठोबा बरवे ॥१॥**
**पाहोनि बा अंत क्षमा । अंगी काटीवरी मारविले ॥२॥**
**शिव्यागाळी नीत नाही । बहु फार विटंबिले ॥३॥**
**तुका म्हणे क्रोधा हाती । सोडवूनि घेतले रे ॥तु.गा.३४४८.४॥**

मंबाजीबद्दल थोडा देखील शत्रुत्वभाव मनात न बाळगता किंवा 'मला पीडा देणाऱ्या ह्या मंबाजीचे वाटोळे कर रे देवा !' अशीही देवांस तक्रार न करता, उलट देवांस ते म्हणतात; ''देवा, तुम्ही मला मंबाजीच्या माध्यमातून क्रोधाहातून



सोडविले.'' आपल्याला काठीने झोडपल्याने मंबाजीचे हात दुखत असतील, म्हणून तेल घेऊन मंबाजीचे हात चोळून देण्यासाठी महाराज मंबाजीकडे गेले.

या प्रसंगातून महाराजांच्या मनात वसणाऱ्या निरपेक्ष न निर्मत्सर मैत्र भावाचेच दर्शन घडते. सज्जनाविषयीचा मैत्रभाव एकवेळ ठीक आहे, पण दुर्जनाविषयीचा हा मैत्रभाव अलौकिकच म्हणावा लागेल. याचे कारण **'अद्वेष्टा सर्वभूतानाम्'** हे होय. **'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।'** असा हा भक्तियोग महाराजांच्या अंगी बाणला होता हेच यावरून सिद्ध होते.

सर्वांठायी भगवंतच वास करीत आहे, तर मग कोणास शत्रू मानावे ? व मित्र तरी कोणास म्हणावे ? या भूमिकेतूनच कारुण्याचा जन्म होतो. त्यामुळे कोणत्याही कारणावाचूनच कारुण्यभाव महाराजांच्या अंतःकरणातून ओसंडत होता. निर्मत्सर बुद्धीतून हे कारुण्य प्रवाहित होत होते. कारण सर्वांभूती असलेल्या सर्वेश्वराचे खरे पूजन निर्मत्सर भावातूनच होते. म्हणूनच महाराज म्हणतात;

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥ तु.गा.२१ ॥**
**न करावा द्वेष भूतांचा मत्सर। हा तंव विचार जाणतो आम्ही। (तु.गा.१६२४)**

एकदा भयंकर अशा दुष्काळात लोक देशोधडीला लागले असताना, महाराजांनी चारा-पाण्यावाचून तळमळणाऱ्या गाई-म्हशी आदी पशूंना चारा-पाण्याची व्यवस्था करून जगविले. तेव्हा **'भूतदया गाई पशूंचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥'** असे करुणावंत उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले. भूतदया हेच संतांचे खरे भांडवल आहे. काया-वाचा-मने कोणालाही दुखवायचे नाही, हा महाराजांचा आचारधर्म होता. आपले कोणी अहित केले तर आपल्याला जसे दुःख होते, तसेच आपल्याकडून कोणाचे अहित झाले तर त्यालाही दुःख होतेच. म्हणूनच पशुहत्या करून मांस भक्षण करणाऱ्यांना महाराज म्हणतात;

**मांस खाता हौस करी । जोडूनि वैरी ठेवियेला ॥१॥**
**कोण त्याची करील कीव । जीवे जीव नेणती ॥तु.गा.१६२५.२॥**

देव आणि संत दोघेही सारखेच असतात. देव करुणावंत म्हणून संतही करुणावंत असतात. किंबहुना देवाच्या कारुण्यापेक्षा संतांचे कारुण्य अधिक श्रेष्ठ असते. देव अवतार धारण करून दुष्टांचा नाश करून त्यांना आपल्यात मिळवून

घेतो. पण संत दुष्टांचा दुष्टपणा घालवून, त्यांच्यातील साधुत्व आणि देवत्व जागे करतात. देव पूर्णकाम तसे संतही पूर्णकाम असतात. दोघांनाही काही मिळवायचे व त्यासाठी काही करायचे नसते. तरीही स्वतः भवसागरातून तरून जाऊन भवसागरात गटांगळ्या खात असलेल्या अज्ञ जीवांना तारून नेण्याचे कार्य संत करतात. हे त्यांचे अकारण कारुण्यच असते. त्यामुळेच महाराज म्हणतात;

**मागे बहुतां जन्मी। हेचि करित आलों आम्हीं ।**

**भवतापश्रमी । दुःखे पीडिले निववू त्यां ॥तु.गा.२२१८॥**

संत स्वतः तरतात आणि लोकांनाही तारतात. याच भूमिकेतून महाराजांनी, आपल्या अमृतमय अभंगवाणीतून मेघवृष्टी-न्यायाने उपदेशामृताचे सिंचन करून सर्वांची मने निववली. त्यांच्या अभंगरूपी सेतूवरून कित्येक जन भवनदी ओलांडून पैलतीरावर पोहोचले. त्यांच्या अभंगरूपी भेषजाच्या सेवनाने कित्येकांचा भवरोग हटला व ते निरामय बनले. त्यांच्या अभंगअमृत-प्राशनाने कित्येकांना अमर आनंदाचा शाश्वत लाभ झाला. याकरिताच **'अनुभवे आले अंगा। ते या जगा देतसे ॥तु.गा.११६०॥'** हा महाराजांच्या उपदेशामागचा कारुण्यभाव आहे.

संतांचे अवतारकार्य हे ईश्वरी प्रेरणेनुसार होत असते. त्यात 'मी आणि माझेपणा' मुळीच नसतो. **'निर्ममो निरहंकारः'** असे ते सदैव असतात. 'मी आणि माझेपणा' यांतूनच दुःखाचा उद्‌भव होतो. पण भगवंतांच्या प्रेमरसात निमग्न झाल्यावर भक्ताचा वेगळा असा मीपणा उरत नाही. म्हणूनच महाराज भगवंतांपुढे भावनिवेदन करताना म्हणतात;

**लवण मेळवितां जळे । काय उरलें निराळे ॥१॥**

**तैसा समरस झालों । तुजमाजी हरपलो ॥तु.गा.२३७९.२॥**

मी स्वतः भगवद्रूप आहे व बाकी उरलेले सर्व जगतही माझ्यासहित भगवद्रूप आहे,' अशी 'मी'पणाची व्यापक अनुभूती तुकाराम महाराजांना आली होती. ह्या विश्वाला स्वतःचे घर मानून त्यात महाराजांची आत्मक्रीडा चालू होती. 'मी देवाचा आहे' या भावनेत त्यांचा 'मी' विरघळला होता आणि 'देव माझा आहे' या निष्ठेत त्यांचा 'अहं' विलीन झाला होता. अंतर्बाह्य एकमेव 'हरिचीच सत्ता' ते अनुभवत होते. ''आपण कोण ?'' असे



जर कोणी महाराजांना विचारले असते, तर महाराज तत्काळ उद्‌गारले असते; ''मी वासुदेव तत्त्वता !''

'मीपणा' जीवाला देवापासून दूर लोटतो. म्हणून ज्या ज्या कारणांमुळे 'मी'पणा पुष्ट होतो, त्या त्या कारणांचा निषेध व्यक्त करताना महाराज देवांना विनवितात;

**लोकमान देहसुख । संपत्ती उपभोग अनेक ।**

**विटंबना दुःख । तुझिया भेटीवाचूनी ॥१॥**

**तुजवाचूनी काही व्हावे । ऐसे नको माझिया जीवे ।**

**तुका म्हणे द्यावे । दरुषण पायांचे ॥तु.गा.१७८१.२॥**

अहंकार देवास मुळीच आवडत नाही. अहंकारी भक्त देवाला भारभूत वाटतो. अहंकार हेच भेदाचे मूळ आहे. अहंकारातून द्वेष, द्वेषातून शत्रुत्व, शत्रुत्वातून क्रूरता निर्माण होते. तर निरहंकारी वृत्तीतून अद्वेष, मैत्र व कारुण्य निर्माण होतात. याकरिताच भक्त आपला अभिमान भगवंतांच्या गुणानुवादात विसर्जित करतात. महाराज म्हणतात; **'अहंकार जातो गौरविता वाणी । सर्व गात्रां धणी हरिकथा ॥तु.गा.७७७॥'** अहंकार हा जीवास संकुचित करतो. जीवाला देहापाशीच सीमित करतो. स्वतःस देह मानणे हे कोटी ब्रह्महत्येचे पातक आहे. देहभावातून 'देहासंबंधी पसारा माझा आहे' असा खोटा अभिमान जागा होऊन, दुःखदायक भेद निर्माण होतो.

म्हणून मी-माझेपणा देवाच्या ठायी अर्पण करून, संत निर्मम, निरहंकारी बनून ह्या संसारात सुखाने विहार करतात. सुख येवो वा दुःख येवो, त्यांच्या चित्ताची साम्यदशा कधीच ढळत नाही. सुख-दुःखे ही द्वन्द्वे संतांना बाधत नाहीत. मनास जे अनुकूल वाटते ते सुख आणि प्रतिकूल वाटते ते दुःख. ही सुख-दुःखे मायावी प्रपंचास अधिष्ठान समजल्याने प्राप्त होतात. पण भगवंत जेव्हा अधिष्ठान असतात, तेव्हा एकमात्र आनंदाचाच अनुभव येतो. सुख-दुःखे ज्या मनास बाधतात, ते मनच भगवच्चिंतनात उन्मन झाल्यामुळे व देहभाव आत्मभावात विलीन होऊन गेल्याने ह्या अवस्थेत तुकाराम महाराज म्हणतात;

**ठाव नाही सुखदुःखा । नाचे तुका कौतुके ॥तु.गा.२४॥**

सुखाचे सुख असे श्रीहरीचे मुख पाहिले, त्यायोगे माझ्या नेत्रांना सुख झाले.

कानांनी भगवंतांची कीर्ती ऐकली तेव्हा माझे कान सुखावले. मुखाने भगवंतांचे गुण गाइले, तेव्हा त्या अवीट नामरसाने जिव्हा सुखावली. टाळी वाजवून देहभान विसरून भगवंतांच्या कीर्तनी नाचल्याने, माझ्या हातापायांस सुख झाले. अशा अनुभूतीतून महाराज म्हणतात; **'तुका म्हणे काही न मागे आणिक । तुझे पायी सुख सर्व आहे ॥तु.गा.१४॥'** म्हणूनच श्रीमाउली अशा भक्तांबाबत म्हणतात; **'सुख दुःख जाणणे । नाही जया ॥ज्ञाने.१२.१३.१४९॥'** कितीही दुःख वाट्याला आले तरी, त्याविषयी भक्तास भय राहात नाही. उलट तो त्या दुःखांना भगवत्कृपाच मानतो. महाराजांच्या अभंगांच्या वह्या पाण्यात बुडविल्या गेल्या, त्यांना मार देण्यात आला, गाढवावर बसवून धिंड काढण्यात आली, धंद्यात दिवाळे निघाले, दुष्काळात पत्नीचे निधन झाले, पण तरीही महाराज म्हणतात;

**बरे झाले देवा निघाले दिवाळे ।**
**बरी या दुष्काळे पीडा केली ॥तु.गा.७५९॥**

किंवा;

**बाईल मेली मुक्त झाली ।**
**देवे माया सोडविली ॥तु.गा.४१७॥**

यावरून **'सुखी संतोषा न यावे । दुःखी विषादा न भजावे । (ज्ञाने.२.३८.२२६)'** हे श्रीमाउलींचे उद्गार तुकाराम महाराजांच्या जीवनात पूर्णपणे यथार्थ ठरतात; हेच सिद्ध होते.

सुख-दुःखांत समत्व आले की, अंगी स्वाभाविक क्षमा बाणते. याचे कारण चित्त इतके शांत झालेले असते की, त्यावर बाह्य आघाताचा कोणताच परिणाम होत नाही. आत्मभावानेच सर्वत्र पाहण्याची दृष्टी लाभल्यामुळे, तेथे सज्जन-दुर्जन असा भेद उरलेला नसतो. पृथ्वी नांगरली, खोदली, तुडविली, तरीही क्रोध न करता ती क्षमाच करते. त्याप्रमाणे संतही क्षमाशील असतात. म्हणूनच त्यांच्या क्षमेविषयी श्रीमाउली म्हणतात; **'तेवीचि क्षमेलागी । पृथ्वीसि पवाडु अंगी । (ज्ञाने.१२.१३.१५०)'** असा क्षमाशील भक्तच कोणत्याही परिस्थितीत संतुष्ट राहू शकतो.

अशाप्रकारे श्रीज्ञानेश्वर माउलींनी वर्णिलेली भक्तलक्षणे, श्रीसंत तुकाराम महाराजांच्या अंगी वसलेली त्यांच्या अभंगांतील स्वानुभवाच्या उद्गारांतून



दिसून येतात. अशा भक्तांविषयी स्वयं भगवंत उद्गारतात; **'तयातें मी माथां मुकुट करीं ॥ज्ञाने.१२.१९.२१४॥'**

**संदर्भ :**

(१) श्रीतुकाराम महाराजांची अभंग गाथा, प्रकाशक - संत वाङ्मय प्रसारक मंडळ, कराड (महाराष्ट्र).
(२) सार्थ श्रीज्ञानेश्वरी, संपादक - श्री.सदानंद महाराज आळंदीकर.
(३) श्रीमद् भगवद्गीता, गीताप्रेस, गोरखपूर.
(४) संत बहिणाबाईंची गाथा, संपादिका- सौ.शालिनी जावडेकर.

□□

# भारत सावित्री

प्रा.माधव ना.आचार्य

---

### एक

व्यासशिष्य वैशंपायनाने सर्पसत्रप्रसंगी, जनमेजयाला त्याच्या पूर्वजांची हकिकत सांगितली. हीच हकिकत नंतर सौतीने नैमिषारण्यातील ऋषींना सांगितली. ती सांगून झाल्यानंतर, तो समारोपादाखल भारत-श्रवणाचे फल सांगतो. त्यामध्ये त्याने भारत-कथेचे जे सार सांगितले आहे, ते **'भारत सावित्री'** या नावाने प्रसिद्ध आहे. त्या सावित्रीचे चार श्लोक असे;

**मातृपितृ सहस्राणि पुत्रदारशतानि च ।**
**संसारेष्वनुभूतानि यान्ति चास्यन्ति चापरे ॥५.४७॥**
**हर्षस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च ।**
**दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ॥५.४८॥**
**ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति मे ।**
**धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥५.४९॥**
**न जातु कामान्न भयान्न लोभात् धर्मं त्यजेत् जीवितस्यापि हेतोः ।**
**नित्यो धर्मः सुखदुःखे त्वनित्ये जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥५.५०॥**

- महाभारत, स्वर्गारोहणपर्व

या श्लोकांचा भावार्थ असा;

जगात हजारो माता-पिता व शेकडो स्त्री-पुत्र यांच्या संयोग-वियोगाचा अनुभव येत राहिला आहे. अज्ञानी माणूस, आनंदाचे हजारो प्रसंग तसेच भयाचेही शेकडो प्रसंग अनुभवीत असतो. पंडिताच्या मनावर मात्र त्यांचा काहीही परिणाम होत नाही. (४७-४८).

हा मी दोन्ही हात वर करून उच्च रवाने सांगत आहे, पण माझे कुणीच ऐकत नाही. अर्थ-काम सिद्धीस जातात ते धर्मामुळे. तरीही लोक धर्माचे सेवन का करीत नाहीत ? (४९).

कामना, भय, लोभ इतकेच काय; पण प्राण वाचविण्यासाठीही धर्म सोडू नये. धर्म हा नित्य आहे. सुख-दुःखे अनित्य आहेत. त्याचप्रमाणे जीवात्मा नित्य आहे. त्याच्या बंधनाचा हेतू अनित्य आहे. (५०).

येथील **'भारत सावित्री'** हा शब्द व तिसऱ्या श्लोकात महर्षी व्यासांनी व्यक्त केलेली खंत यांचा विचार करता करता, मन भागवत धर्मीय संतांपर्यंत आले. या प्रवासाचा स्थूल वृत्तांत नोंदण्यापुरताच या लेखाचा प्रपंच मर्यादित आहे.

'सावित्री' हे विशेषनाम म्हणून आपल्या परिचयाचे आहे. महाभारताच्या वनपर्वात सत्यवान-सावित्रीची कथा येते. सावित्री ही राजा अश्वपतीची कन्या. या राजाला प्रथम अपत्य नव्हते. म्हणून त्याने दररोज अग्नीला 'सावित्री मंत्रा'ची आहुती देऊन सावित्रीदेवीची अठरा वर्षे उपासना केली. तिच्या कृपाप्रसादाने त्याला जी कन्या प्राप्त झाली तीच ही 'सावित्री'. (म.भा.वन.प.२७७.९).

येथे उल्लेख केलेला 'सावित्री मंत्र' म्हणजे आपल्या परिचयाचा प्रसिद्ध गायत्रीमंत्र होय. ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलात हा आला आहे. तो असा;

**ॐ तत्स॑वि॒तुर्वरे॑ण्यं॒ भर्गो॑ दे॒वस्य॑ धीमहि ।**

**धियो॒ यो नः॑ प्रचो॒दया॑त् ॥ऋ.३.६२.१०॥**

भावार्थ असा;

अखिल चराचराला प्रेरणा देणारा जो सविता देव, त्याचे जे सर्वश्रेष्ठ तेज आहे, त्याचे आम्ही ध्यान करतो. तो आमच्या बुद्धीला वा कर्माला प्रेरणा



देवो. (सायणाचार्यांनी, 'सवितुः' = 'सर्वान्तर्यामितया प्रेरकस्य जगत् स्रष्टुः परमेश्वरस्य' व 'धियः' = 'कर्माणि' असे स्पष्टीकरण दिलेले आहे.)

'सविता' म्हणजे सूर्य, हा अर्थही रूढ आहे. त्यालाही ऋग्वेदामध्ये आधार आहे. (ऋ.४.१४.२ व १०.३६.१४). त्यामुळेच हा मंत्र 'सूर्योपासनेचा मंत्र' म्हणून प्रसिद्ध आहे.

या मंत्राला 'गायत्री' म्हणण्याचे कारण असे की, हा गायत्री नामक छंदामध्ये आहे. हा चोवीस अक्षरी अनुष्टुभ्. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी आपल्या विभूती सांगताना, **'गायत्री छंदसामहम् । (भ.गी.१०.३५)'** असे म्हटलेले आहे. या मंत्राची देवता सविता; म्हणून हा सावित्री मंत्र. मंत्राच्या नामकरणाची ही वैदिक पद्धती आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्ये याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

प्राणांनाच 'गय' असे म्हणतात. त्यांचे रक्षण करते म्हणून ही गायत्री. गुरु शिष्याला ज्या सावित्री मंत्राचा उपदेश करतात, ती हीच गायत्री होय. (बृह.५.१४.५)

येथे 'गय' व 'त्र' (रक्षण करणारी) असे दोन भाग करून स्पष्टीकरण दिलेले आहे. 'गायन्तम् त्रायते' (गाणाऱ्याचे रक्षण करते) ही व्युत्पत्तीही रूढ आहे.

उपनयनविधीमध्ये गुरु शिष्याला याच गायत्री मंत्राचा उपदेश करतात. या विधीमुळे शिष्याचा जणू दुसरा जन्मच होतो. माणसाचा गर्भजन्म हा मरणशील आहे. परंतु या गुरूपदेशामुळे त्याला जो ब्रह्मजन्म लाभतो, तो अजरामर करणारा व सत्यजन्म आहे. मनुस्मृती सांगते;

**आचार्यस्त्वस्य यां जातिं विधिवद्वेदपारगः ।**

**उत्पादयति सावित्र्या सा सत्या साऽजरामरा ॥मनु.२.१४८॥**

('जाति' म्हणजे जन्म. वेदपारंगत आचार्य सावित्री मंत्राने जो जन्म देतात, तोच सत्य व अजरामर आहे.)

येथेही गायत्री मंत्राला 'सावित्री मंत्र' असेच म्हटलेले आहे.

मत्स्य पुराणामध्ये, सावित्रीचा उल्लेख 'ब्रह्मदेवाच्या शरीरापासून निर्माण

झालेली त्याची अर्धांगिनी देवता' असा केलेला आहे. (मत्स्य.३.३१). स्कंद पुराणात ब्रह्मा व सावित्री यांच्या पूजेचा आचार येतो. तेथे वैधव्य येऊ नये म्हणून, सावित्रीची केली जाणारी प्रार्थना पुढीलप्रमाणे दिलेली आहे;

**ओंकारपूर्विके देवि वीणापुस्तकधारिणि ।**
**वेदाम्बिके नमस्तुभ्यं अवैधव्यं प्रयच्छ मे ॥स्कंद.प्रभासखंड.१६६.९०॥**

येथील '**ओंकारपूर्विका**' व '**वेदाम्बिका**' ही सावित्रीला लावलेली विशेषणे लक्षणीय आहेत.

ग्राह्यांश इतकाच की, 'सावित्री मंत्र' हे वेदांचे सार आहे. यावरूनच 'सावित्री' या शब्दाला 'सारार्थ' असा अर्थ रूढ झाला असावा.

तेव्हा 'भारत सावित्री' म्हणजे महाभारताचे सार. (पं.वासुदेवशरण अग्रवाल यांनी म्हणूनच महाभारताची कथा सारांशरूपाने सांगणाऱ्या आपल्या ग्रंथाला 'भारत सावित्री' असे यथार्थ नाव दिलेले आहे. या नावाचे ग्रंथनामाखालीच दिलेले स्पष्टीकरण असे; 'महाभारत का एक नवीन एवं **सारगर्भित** अध्ययन').

आता पुन्हा व्यासोक्तीकडे वळण्यास हरकत नाही.

'**धर्मात् अर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥**' असा त्यांचा प्रश्न आहे. येथील 'धर्मात्' ही पंचमी अपादानार्थी नाही, गुणाधिक्यबोधकही नाही; तर ती उघडच कारणसूचक आहे.

**अपादान व कारण :**

**भयात् रणात् उपरतं मंस्यंते त्वां महारथाः । (भ.गी.२.३५)**

**भयात् - कारणबोधक, रणात् - अपादानार्थी**

**गुणाधिक्य :**

**श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्...। (भ.गी.३.३५)**

**परधर्मात् - गुणाधिक्यबोधक**

म्हणून धर्मात् = धर्मामुळे.

अर्थ व काम हे पुरुषार्थ खरे; परंतु त्यांना सार्थकत्व लाभते ते धर्मामुळेच.

[येथे चार पुरुषार्थांपैकी फक्त तीनांचाच उल्लेख आहे. कारण 'मोक्ष' हा



पुरुषार्थ साध्यस्थानी आहे किंवा 'धर्म' या संकल्पनेतच अंतर्भूत आहे. शिवाय या श्लोकांच्या आधीच्या एका श्लोकात चारही पुरुषार्थांचा उल्लेख आहे. (श्लोक क्र. ३८)]

अर्थ-काम हे भौतिक सुख-दुःखे देणारे. परंतु ती अनित्य असतात. शाश्वत असतो तो धर्म. म्हणूनच कामना, भय, लोभ एवढेच काय; परंतु प्राण वाचविण्यासाठीही धर्म सोडू नये असे व्यास महर्षी सांगतात.

येथे 'पुरुषार्थ' ही संकल्पना नीट समजावून घेऊ.

पुरुष = (शरीरस्थ आत्मा) कोणतीही स्त्री-पुरुष व्यक्ती.

अर्थ = (इष्ट वस्तू) जीवनात मिळवावयाची गोष्ट.

वेदवाङ्मयात पुरुषार्थांचा उल्लेख नाही. तो प्रथम आपस्तंभ धर्मसूत्रांत आढळतो. (धर्मसूत्रांचा काळ स्थूलपणे इसवी सन पूर्व ६०० ते इसवी सन ३०० या दरम्यानचा.) इतिहासकाव्यांमध्ये व पुराणांमध्ये पुरुषार्थांचा उल्लेख सर्वत्र आढळतो. या चार पुरुषार्थांचा निर्देश 'चतुर्वर्ग' असाही केला जातो.

('साहित्यदर्पण'कार विश्वनाथाने '**चतुर्वर्गफलप्राप्तिः सुखादल्पधियामपि । काव्यादेव ...॥**' असा काव्यप्रयोजनांचा उल्लेख केला आहे.) या चारांपैकी मोक्षाचा अंतर्भाव प्रथम धर्मातच केला जात असे. पुढे धर्माचेच प्रवृत्तिपर व निवृत्तिपर असे विभाग झाले. त्यांपैकी निवृत्तिपर धर्माला 'मोक्ष' हे स्वतंत्र नाव मिळाले.

'धर्म' म्हणजे शास्त्रविहित कर्माचे आचरण व तदनुसारी नीतितत्त्वांचे पालन. 'अर्थ' म्हणजे जीवनोपयोगी द्रव्य, भूमी, पशू, धान्य इत्यादी साधने. 'काम' म्हणजे इंद्रियविषयांचा उपभोग. 'मोक्ष' हे अंतिम साध्य. त्यामध्ये आत्मा व परमात्मा यांच्या एकत्वाचा प्रत्यय येतो.

अर्थ व काम हे पुरुषार्थ खरे; परंतु त्यांना धर्माची मर्यादा हवी, नाही तर माणसाचे जीवन स्वैर व अनैतिक बनण्याचा संभव असतो. त्यामुळे मग अवघ्या समाजाचेच स्वास्थ्य बिघडते. म्हणून भगवान श्रीकृष्णांनी सृष्टीचे सूत्र म्हणून आपल्या ईश्वरत्वाचा उल्लेख करताना, '**धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ । (भ.गी.७.११)**' असे म्हटलेले आहे.

कौटिल्यानेही ‘अर्थशास्त्रा’त ‘अर्थ’ प्रधान मानतानाही, **‘धर्मार्थाविरोधेन कामं सेवेत । (अर्थ.१.७)’** असेच म्हटलेले आहे.

म्हणूनच व्यास महर्षी धर्मालाच सर्वाधिक महत्त्व देतात. तेव्हा आता पुढच्या विभागात व्यास महर्षींना अभिप्रेत असणारे धर्मस्वरूप पाहू.

**दोन**

‘धर्म’ हा शब्द ‘धृ’ = धारण करणे, या धातूपासून व्युत्पादिला जातो. त्याची व्याख्या पुढीप्रमाणे करण्यात येते; **‘धरति लोकान् ध्रियते पुण्यात्माभिः इति वा ।’** म्हणजे जो लोकांना आधार देतो किंवा पुण्यवान पुरुषांकडून आचरला जातो, तो ‘धर्म’.

‘धर्म’ ही संकल्पना विकसित होत आलेली आहे. त्या वाटेवर तीमध्ये अनेक गोष्टींचा संग्रह होत आला आहे. कालमानाप्रमाणे हे जे बदल होत गेले, त्यांच्या तपशिलात जाण्याची येथे आवश्यकता नाही. कारण आपल्याला स्वारस्य आहे ते व्यासोक्त संकल्पनेमध्ये.

मात्र ती लक्षात घेण्यापूर्वी दोन प्रसिद्ध धर्मलक्षणांचा परिचय करून घेऊ. यांपैकी एक जैमिनींचे तर दुसरे कणादांचे आहे. जैमिनी (पूर्वमीमांसा) व कणाद (वैशेषिक) हे सहा दर्शनकारांपैकी. परंतु त्यांची आज उपलब्ध असणारी सूत्रे महाभारतानंतरची आहेत, असा भारताचार्य वैद्यांचा निष्कर्ष आहे. (महाभारताचा उपसंहार, पृष्ठ ४९).

ही दोन लक्षणे आपण तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विवेचनाधारे समजावून घेऊ. (हिंदुधर्माची समीक्षा, पृष्ठ ६३-६४ व ७५-७६).

**‘चोदनालक्षणोऽर्थः धर्मः ।’** हे लक्षण जैमिनींचे. ‘चोदना’ या शब्दाचा धात्वर्थ ‘प्रेरणा’ असा आहे. त्यावरूनच त्या शब्दाला उपदेश, आज्ञा, विधी इत्यादी अर्थ आले. ही प्रेरणा दोन प्रकारची असते. ‘शाब्दी भावना’ व ‘आर्थी भावना’. ‘शाब्दी’ म्हणजे शब्दाच्या पाठीशी असणारी आज्ञापक शक्ती. ‘अमुक एक क्रिया तू केलीच पाहिजेस वा करता कामा नये’, असे कुठली तरी लौकिक वा अलौकिक वाणी सांगत असते. आपणांपेक्षा श्रेष्ठ अशी ही वाणी असते. ती वाणी अनिष्ट-निवारणाचे व श्रेय-प्राप्तीचे आश्वासन देते. त्याचबरोबर आज्ञाभंग



झाल्यास दंडाचे भयही दाखविते. जैमिनींच्या मते, अशी धर्माची आज्ञापक वाणी म्हणजे वेदच. ते अपौरुषेय, स्वयंभू, शाश्वत अतएव प्रश्न न विचारता आचरण्याजोगे. ‘आर्थी’ भावना म्हणजे ‘मी अमुक एक क्रिया केलीच पाहिजे’, कारण त्यामध्येच माझे कल्याण आहे; या भावनेतून निर्माण होणारी कर्तव्योन्मुखता. धार्मिक पुरुषांच्या ठायी ही आर्थी भावना असते.

जैमिनींचे हे धर्मलक्षण, मानवाच्या बुद्धीने केलेल्या निवडीला दुय्यम समजते. केवळ वेदांचा दैवी उपदेशच श्रेयस्कर असे मानणारे हे लक्षण शब्दप्रामाण्याधिष्ठित आहे, असा तर्कतीर्थांचा निष्कर्ष आहे.

वैशेषिक दर्शनकार कणादांचे धर्मलक्षणही प्रसिद्ध आहे. ते असे; **‘यतः अभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ।’** अभ्युदय म्हणजे ऐहिक वा पारलौकिक आनंद व तो मिळविण्याची साधने. ज्या स्थितीत अनिष्टापेक्षा इष्टच अधिक असते, अशी स्थिती म्हणजे ‘अभ्युदय’. ‘निःश्रेयस’ म्हणजे मोक्ष. हे शाश्वतचे अंतिम साध्य. या स्थितीत कशाचीच अपेक्षा राहत नाही. त्यामुळे केवळ संपूर्ण समाधान प्राप्त होते. अशी ही दोन साध्ये ज्या साधनांनी प्राप्त होतात तो ‘धर्म’.

वैशेषिकांच्या मते, ‘धर्म’ म्हणजे प्रत्यक्ष आचरण वा क्रिया नव्हे, तर त्या आचरणाचा कर्त्याच्या आत्म्यावर होणारा अदृष्ट असा शुभ म्हणजे पुण्यरूप संस्कार. या उलट ‘अधर्म’ म्हणजे असदाचरणाचा पापरूप अशुभ संस्कार. या मतामध्ये पुण्य वा पाप ह्या अदृष्ट संकल्पनांना महत्त्व दिलेले आहे. म्हणजे हा विषय मानवी बुद्धीच्या कक्षेत येत नाही.

खरे म्हणजे, वैशेषिकांनी विश्वाच्या स्वभावाची व कार्यकारण भावाची बौद्धिक उपपत्ती अत्यंत व्यापक रीतीने मांडलेली आहे. परंतु प्रत्यक्ष धर्मचर्चा करताना, त्यांनी अदृष्टाचा त्याग न केल्यामुळे त्यांची धर्मकल्पना मानवी बुद्धीस अगम्य अशा क्षेत्रात गेली.

अशा या दोन महत्त्वाच्या धर्मलक्षणांच्या पार्श्वभूमीवर आता महर्षी व्यासांचे मत लक्षात घेऊ.

महाभारतामध्ये ‘धर्म’ या संकल्पनेची चर्चा अनेक ठिकाणी विविध स्तरांवर आलेली आहे. त्यामध्ये शांति व अनुशासन या पर्वांतील भीष्मोक्त

चर्चा विविधांगी आहे. व्यास महर्षींनी भीष्मांप्रमाणेच भगवान श्रीकृष्णांच्या मुखानेही अनेक धर्मविचार जागोजागी व्यक्त केले आहेत. विदुरही धर्मज्ञ आहे. युधिष्ठिर हा तर प्रत्यक्ष धर्माचाच अवतार. तोही अनेक प्रसंगी धर्माची छाननी करताना आढळतो.

मात्र या चारही जणांच्या धर्मचर्चांमध्ये प्रेरणा, प्रवृत्ती व परिणाम या दृष्टींनी अनेक भेद आहेत. भीष्मांची धर्मचर्चा कितीही व्यापक असली तरी, जीवनातील आणीबाणीच्या अनेक प्रसंगी ती कृतिशून्यतेमुळे केवळ शाब्दिक ठरते. याउलट श्रीकृष्णांनी व्यक्त केलेले धर्मविचार हे प्रसंगोचित व सुयोग्य कृतींचे रूप घेतात. श्रीकृष्णांनी भगवद्‌गीता केवळ सांगितली नाही, तर ते ती जगलेले आहेत. या दृष्टीने श्रीकृष्ण-चरित्राची छाननी करणे, हा एक वेगळा विषय आहे. विदुराचे धर्मप्रवचन प्रायः अंधळ्या धृतराष्ट्रासमोर असल्यामुळे फुकट जाते. युधिष्ठिर धर्मनिष्ठ आहे, परंतु अनेक वेळा क्षात्रधर्म सुटल्यामुळे त्याचे वर्तन त्याच्या भावांनाही टीकार्ह वाटते. [परंतु त्याच्या धर्मज्ञानामुळे काही प्रसंगी त्याचे व त्याच्या भावांचे मृत्युपासूनही रक्षण झाले आहे. उदाहरणार्थ; वनपर्वांतर्गत 'आजगरपर्व' (अ.१७८) व यक्षप्रश्न प्रकरण (अ.२९७-२९८). तो शेवटपर्यंत आपली धर्मनिष्ठा सोडीत नाही. श्वानरूप धर्मासह तो एकटाच स्वर्गापर्यंत जातो, तेव्हाही तो त्याला सोडायला तयार नसतो.]

(ही सर्वच माणसे धर्मनिष्ठ असूनही हा भेद का निर्माण झाला असावा ? याचे एक उत्तर असे की, महर्षी व्यासांनी या व्यक्तींना एका कलात्मक कथाव्यूहामध्ये गुंफून टाकले आहे. या कथाव्यूहाची चिकित्सा करणे हा पुन्हा एक वेगळा विषय आहे. दुसरे असे की, धर्मभावना ही सुटी नसते. ती जेव्हा निखळ सत्त्वगुणाश्रयी असते, तेव्हा ती 'श्रीकृष्ण' होते. आणीबाणीच्या प्रसंगी रजोगुणप्रभावामुळे ती 'कुंठित भीष्म' होते. तमोगुणी व्यक्तीचा आश्रय न सोडल्यामुळे ती केवळ 'प्रवचननिष्ठ विदुर' होते, तर क्वचित् कामक्रोधांच्या आहारी गेल्यामुळे ती 'टीकार्ह युधिष्ठिर' होते.)

या सर्वच धर्मचर्चांच्या तपशिलात जाणे शक्य नाही व ते आवश्यकही नाही. व्यासांना अभिप्रेत असलेले धर्मलक्षण त्याच्या मर्यादांसह नोंदणे एवढेच आपले प्रस्तुत आहे. त्या दृष्टीने काही महत्त्वाची स्थळे पाहू.



शांतिपर्वामध्ये एके ठिकाणी, युधिष्ठिराने धर्मनिष्ठ राहू इच्छिणाऱ्या माणसाच्या आचाराविषयी भीष्मांना प्रश्न विचारलेला आहे. त्याला भीष्मांनी जे विस्तृत उत्तर दिले आहे, त्यातील महत्त्वाचा भाग असा;

**प्रभावार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।**
**यत् स्यादहिंसासंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥११०.१०॥**
**धारणाद् धर्म इत्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः ।**
**यत् स्याद् धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥११०.११॥**
**श्रुतिधर्म इति ह्येके नेत्याहुरपरे जनाः ।**
**न तत् प्रत्यसूयामो न हि सर्वं विधीयते ॥११०.१२॥**

- महाभारत, शांतिपर्व

या श्लोकांचा भावार्थ असा;

धर्माची तत्त्वे सांगितली जातात ती लोकांच्या अभ्युदयासाठी. जो धर्म अहिंसेने युक्त असतो तोच खरा धर्म; असा निर्णय आहे. धारण करतो (= आधार देतो, संरक्षण करतो, स्थिर ठेवतो) तो धर्म, असे म्हणतात. म्हणून धारणेने युक्त तो धर्म, असा निर्णय आहे. वेदांमध्ये जो सांगितला आहे तोच धर्म; असे काहींचे मत आहे. आम्हांला या बाबतीत कोणताच पक्षाभिनिवेश नाही. परंतु वेदांमध्ये सर्वच काही सांगणे शक्य नसते.

यालाच संवादी असा विचार यापूर्वीही आला आहे. तो असा;

**भवत्यधर्मो धर्मो हि धर्माधर्मावुभावपि ।**
**कारणाद् देशकालस्य देशकालः स तादृशः ॥७९.३१॥**

- महाभारत, शांतिपर्व

देशकालामुळे अधर्म हा धर्म तर धर्म हा अधर्म होतो. म्हणून धर्माचे नियम हे अपरिवर्तनशील नसतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, माणसाने आपली विवेकबुद्धी वापरून धर्मनिर्णय केला पाहिजे. कारण शेवटी **'लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः । (शांति.२५१.४)'** लोकजीवन नीट चालावे यासाठी धर्माचे नियम केले जातात. धर्माची ही व्यासोक्त मर्यादा

महत्त्वाची आहे. श्रीकृष्णमुखानेही हेच तत्त्व सांगितले जाते. 'मी लोकसंग्रहार्थ कर्म करतो' (भ.गी.३.२०) या वचनामागे हीच भूमिका आहे.

भगवान श्रीकृष्णांचा उल्लेख आलाच आहे, तेव्हा त्यांनी निभावून नेलेला एक प्रसंग पाहू. उपरोक्त शांति.११०.१० ते १२ हे श्लोक थोड्या फार क्रमभेदाने व पाठभेदाने कर्णपर्वात (कर्ण.४९.४८ ते ५०) श्रीकृष्णमुखी आलेले आहेत. त्यांना एका धर्माधर्म-निर्णयाचा संदर्भ असल्यामुळे, तेथे ते अधिक प्रत्ययकारी वाटतात. प्रसंग असा आहे;

कर्णाशी लढताना युधिष्ठिर घायाळ झाला. त्यामुळे दुःखी होऊन तो रणभूमी सोडून आपल्या शिबिरात जाऊन बसला. इकडे युधिष्ठिर कोठे दिसेना म्हणून अर्जुनाला काळजी वाटू लागली. तेव्हा भीमाने त्याला वस्तुस्थिती सांगून, युधिष्ठिराच्या सांत्वनासाठी जाण्यास सांगितले. तदनुसार अर्जुन रणभूमी सोडून श्रीकृष्णांसह युधिष्ठिराच्या शिबिरात गेला. त्याला पाहून युधिष्ठिराला वाटले की, कर्णाला मारूनच अर्जुन आला आहे. म्हणून तो अर्जुनाची स्तुती करून लागला. परंतु नंतर वस्तुस्थिती कळताच तो संतापला. आपली नेहमीची शांत, सौम्य वृत्ती सोडून, त्याने अत्यंत कठोर शब्दांत अर्जुनाची त्याच्या गांडीव धनुष्यासह निर्भर्त्सना केली. त्यामुळे अर्जुन संतापला. विशेषत्वाने त्याच्या गांडीव धनुष्याचा धिक्कार केल्यामुळे, तो क्रोधाच्या अधीन झाला. कारण 'जो कुणी आपल्या धनुष्याचा धिक्कार करील त्याचा वध करीन' अशी त्याने प्रतिज्ञा केली होती. तदनुसार तलवार उपसून तो युधिष्ठिराला मारण्यास धावला. तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी त्याला आवरले. सत्याची मर्यादा स्पष्ट करीत ते म्हणाले; ''सत्यवचन चांगलेच; परंतु जर त्यामुळे अनिष्ट घडत असेल तर सत्य बोलूच नये.'' (कर्ण.४९.२७-२८).

अर्जुन जर आपल्या प्रतिज्ञेला अनुसरून युधिष्ठिराचा वध करता, तर कौरवांचे काम आयतेच झाले असते. म्हणून श्रीकृष्णांनी येथे सत्यासारख्या श्रेष्ठ धर्माचीही व्यावहारिक मर्यादा स्पष्ट केली आहे. त्यावेळी 'ज्येष्ठ व्यक्तीची निंदा करणे हे तिचा वध करण्यासारखेच आहे' असे सांगून, भगवंतांनी अर्जुनाला युधिष्ठिराची खरडपट्टी काढण्यास सांगितले. त्याप्रमाणे अर्जुन युधिष्ठिराला वाटेल ते बोलला. परंतु नंतर आपल्या मोठ्या भावाला बोल



लावल्याचे पातक आपल्या हातून घडले, या जाणिवेने खंती होऊन स्वतःचा वध करण्यास प्रवृत्त झाला. तेव्हा पुन्हा भगवान श्रीकृष्णांनी 'आत्मस्तुती करणे हे आत्मवधासमान आहे' असा आपद्धर्म सांगून त्याला परावृत्त केले.

सत्याच्या अतिरेकामुळे, भीष्मांना कुरुकुळाचा नाश पाहून शेवटी बाणांच्या शय्येवर पडून कृतिशून्य धर्मचर्चा करीत राहावे लागले. उलट श्रीकृष्णांनी सत्याची मर्यादा पटवून देऊन फार मोठे कार्य साधले.

जैमिनींचे धर्मलक्षण शब्दप्रामाण्याधिष्ठित असल्याची नोंद आपण केलीच आहे. वैशेषिकांचे लक्षणही मानवी बुद्धीला महत्त्व देत नाही. या उलट महर्षी व्यासांच्या धर्मलक्षणांमध्ये माणसाच्या विवेकबुद्धीला महत्त्व दिलेले दिसते. तर्कतीर्थांनी म्हटल्याप्रमाणे, महर्षी व्यासांचे विचार हे श्रौत-स्मार्त परंपरेवर विश्वास कमी होऊन, नव्या धर्मविचारांच्या उदयकाळी प्रकट झालेले आहेत. (पूर्वोक्त पृष्ठ ६५).

महर्षी व्यासांनी वारंवार, धर्माच्या अर्थहीन आचारापेक्षा शुद्ध नैतिक तत्त्वांना अधिक महत्त्व दिलेले आहे. **'सर्वभूतहितं मैत्रम् ।'** हे त्यांनी शाश्वतचे धर्मतत्त्व मानले आहे. (शांति.२५४.५).

शांतिपर्वाच्या अध्याय १५४ ते १५६ मध्ये सद्गुणांचे, तर त्यापुढील अध्याय १५७ मध्ये दुर्गुणांचे विस्तृत विवेचन येते. येथेही युधिष्ठिराचा प्रश्न धर्मजिज्ञासेचाच आहे. त्याचे उत्तर देताना भीष्मांनी दम, तप व सत्य या त्रिगुणांची सविस्तर चर्चा केलेली आहे. यांपैकी प्रत्येक गुणामध्ये भीष्म अन्य अनेक सद्गुणांचा समावेश करतात. उदाहरणार्थ; दम म्हणजे इंद्रियदमन. परंतु त्यामध्ये भीष्म क्षमा, धृती, अहिंसा, समबुद्धी, सत्य, ऋजुता, इंद्रियविजय, दक्षता, मार्दव, लज्जा (विनय), अचापल्य, अकार्पण्य (दीनतेचा अभाव), असंरंभ (प्रक्षुब्धतेचा अभाव), संतोष, प्रिय भाषण, मत्सरहीनता, गुरुपूजा, प्राणिमात्रांबद्दल दया, दुसऱ्यांची निंदा न करणे, अवमान न करणे, वासनारहितता, सुखदुःखातीत असणे, सर्व प्राण्यांशी मैत्र, शीलसंपन्नता, सर्वभूतसमत्व अशा अनेक गुणांचा समावेश करतात. अशाच गुणसमुच्चयाचा उल्लेख तप व सत्य या तत्त्वांच्या चर्चेतही येतो.

‘धर्म’ म्हणून सांगितलेल्या या गुणसमुच्चयाचे श्रीमद् भगवद्‌गीतेतील दैवी संपत्तीशी असणारे नाते सहज लक्षात येणारे आहे. (भ.गी.१६.१ ते ३). भगवद्‌गीतेच्या तेराव्या अध्यायात जी ज्ञानलक्षणे सांगितलेली आहेत, (भ.गी.१३.७ ते ११) तीही दैवी संपदाच आहे. अशा प्रकारे महर्षी व्यासांनी भीष्म व भगवान श्रीकृष्ण यांच्या तोंडून ‘धर्म’ या संकल्पनेच्या अंतर्गत असणारा अवघा सद्‌गुणप्रपंचच उभा केलेला आहे.

व्यक्ती जेव्हा या सद्‌गुणप्रपंचाची घटक असते, तेव्हाच खऱ्या अर्थाने अर्थ व काम हे पुरुषार्थ सार्थ ठरतात. एरव्ही धर्माच्या अभावी अर्थ-काम ही स्वैराचाराकडे नेणारी आसुरी संपत्ती ठरते.

या आसुरी संपत्तीचा तपशील भगवद्गीता अ.१६.४ मध्ये व उपरोक्त शांतिपर्व अ.१५७ मध्ये विस्ताराने आलेला आहे.

अर्थ-काम हे जीवनाला आवश्यकच आहेत. त्यांच्या अभावी जीवितयात्रा चालणे अशक्य. ती मानवी जीवनाची प्रकृतीच आहे. धर्मसंमित सद्‌गुणांमुळे ही प्रकृतीच माणसाची श्रेष्ठ संस्कृती ठरते. उलट त्यांच्या अभावी तेथे केवळ विकृती उरते. **‘धर्मात् अर्थश्च कामश्च ।’** हे व्यासवचन हाच अर्थ सुचविते.

शांतिपर्वातील उपरोक्त गुणसमुच्चयालाच पुढे भक्तीची जोड मिळते. या पर्वाच्या अखेरीस नारायणीय आख्यान येते. (अ.३२१ ते ३३९). त्यामध्ये ‘भगवन् नारायणच सर्व काही आहे’ या ज्ञानावर भर आहे. हा नारायण म्हणजेच सर्वांचा आश्रय असलेला विष्णू. सर्व प्राणिमात्रांच्या ठायी असल्यामुळेच, याला ‘वासुदेव’ म्हणतात. (शांति.३३५.७४ ते ८७). या नारायणाची एकनिष्ठ भक्ती करणाऱ्यांनाच तो नेहमी आनंद देतो. हे एकांतिक भक्त त्या वासुदेवाच्या श्रेष्ठ पदाला पोहोचतात. (शांति.३३६.१ ते ३). हा नारायणीय धर्मच नंतरच्या भागवत धर्माचा मूलस्रोत समजला जातो.

**- (क्रमशः)**

□□



# स्वानंदसुखाची ठेव : ‘श्रीज्ञानेश्वरी’

डॉ.शरद दामोदर महाजन

श्रीमद् भगवद्गीतेच्या भाष्याच्या निमित्ताने, ज्ञानदेवांनी मुळातल्या सातशे तत्त्वज्ञानगर्भ श्लोकांवर नऊ हजार ओव्यांतून मराठीत भाष्य लिहून, तेराव्या शतकात जी वैचारिक व भावनिक क्रांती केली ती अभूतपूर्व, अद्वितीय ठरली. जागतिक वाङ्मयातील चमत्कार ठरावा अशी अपूर्वता त्यांच्या या ‘भावार्थदीपिके’ला प्राप्त झाली. कारण हे भावार्थाचे भावोत्कट प्रकटन करणारा चिंतक, हा अवघा सोळा वर्षांचा कोवळा तरुण दर्शनकार आहे. त्याची वृत्ती विलक्षण विनम्र आणि समग्र मानवतेवर मायेची पाखर घालणारी आहे. बोलीत अद्‌भुत मार्दव, हृदयस्पर्शी आर्जव, आणि अवीट माधुर्य आहे, आश्वासक आत्मविश्वास आहे. **‘माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परी अमृतातेंही पैजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ज्ञाने.६.०.१४॥’** अशा अभिनव आत्मविश्वासाने जेव्हा ज्ञानदेव बोलू लागतात, तेव्हा श्रोते-वाचकांच्या मनांत चैतन्याचा उत्प्रेरक मंत्रजागरच सुरू होतो, जो अक्षय आनंदाचा कल्लोळ-निर्माणकर्ता ठरतो.

ग्रंथाचे प्रयोजन सांगताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की; **‘हे गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचें मथित । आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ॥ज्ञाने.१८.६३.१३२३॥’**. असे अनमोल रत्न हाती देताना त्यांची भूमिका कशी आहे ? हेही ते स्पष्टपणे सांगतात. **‘ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्ता । अनन्यजीवना माता । बाळका जैसी ॥ज्ञाने.१८.६८.१५१२॥’** हा मातेचा ममताळूपणा त्यांच्या साऱ्या उद्‌बोधनाचा व्यवच्छेदक पैलू ठरतो. आपली कृति-उक्ती ही **‘तैसा वाग्विलास विस्तारू । गीतार्थेंसीं विश्व भरूं । आनंदाचा आवारू । मांडूं जगा ॥ज्ञाने.१३.३४.११६१॥’** या तोडीची राहील हे जेव्हा ज्ञानदेव ठामपणे सांगतात, तेव्हा त्याला एक आगळावेगळा आयाम प्राप्त होतो.

**'तेणेंकारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन । अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियांकरवीं ॥ज्ञाने.६.०.३६ ॥'** ही त्यांची प्रतिज्ञा संजीवक ठरते. आपले समग्र कथ्य हे **'अभिनव उद्यान विवेक तरूंचे ।'** असा निर्वाळा देत, ज्ञानदेव **'नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्‌पथा । जे शृंगाराच्या माथां । पाय ठेवी ॥ज्ञाने.१३.३४.११५७॥'** असा आपल्याला भरवसा देतात. **'ना तरी सर्व सुखाची आदि । जे प्रमेयमहानिधी । नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ॥ज्ञाने.१.०.२९॥'** अशी काव्यात्मक मधुरतेची ग्वाही देत ते म्हणतात की, हा अनुभव म्हणजे **'ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनांचें जिव्हार । लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ज्ञाने.१.०.३१॥'** शारदेच्या या लावण्य-रत्न भांडारामुळे **'एथ चातुर्य शाहणें झालें । प्रमेय रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥ज्ञाने.१.०.३५॥'** याचा निश्चितच प्रत्यय येईल. कारण येथे **'माधुर्यीं मधुरता । शृंगारीं सुरेखता । रूढपणा उचितां । दिसलें भलें ॥ज्ञाने.१.०.३६॥'** साकार झाली आहे.

आपले सारे कथन हे गुरुकृपांकित आहे याची पदोपदी जाणीव करून देत, **'पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ज्ञाने.१३.०७.२६३॥'** ही गुरुकृपांकितता श्रोत्यांनी कोणत्या पातळीवरून अनुभवावी ? याचीही विनम्र जाणीव ते करून देतात. **'हे शब्देंवीण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ॥ज्ञाने.१.०.५८॥'** किंवा **'जैसे शारदीचिये चंद्रकळे- । माजि अमृतकण कोंवळे । ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगे ॥ज्ञाने.१.०.५६॥' 'तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ॥ज्ञाने.१.०.५७॥'** अशा हळुवारपणाने आणि आत्मीयतेने ही शांतिकथा ऐकली तर, **'हे स्वानंदभोगाची सेल । भलतयासीचि देईल । सर्वेंद्रियां पोषवील । श्रवणांकरवी ॥ज्ञाने.१८.७८.१७४८॥' 'म्हणौनि मनें कायें वाचा । जो सेवकु होईल इयेचा । तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ॥ज्ञाने.१८.७८.१६६८॥'** ही फलश्रुती प्राप्त होईल. असे निःसंदिग्ध आश्वासन देणारी ज्ञानदेवांची वाणी अलौकिक दृष्टी देते, आत्मभान जागवते, आत्मविश्वासाचे जयगान करते, जीवनाला महन्मंगलतेचे तोरण लावते.



## 'स्वानंदसुख' म्हणजे काय ? :

ज्ञानेश्वरी आपणाला स्वानंदसुख-साम्राज्याचे चक्रवर्ती करणार हे तर निश्चितच. त्यासाठी आपली मनोभूमिकाही सिद्ध व्हायला नको का ? त्यामुळे 'सुख' म्हणजे काय ? 'स्वानंद' म्हणजे काय ? या दोन्ही गोष्टींची सुस्पष्ट जाणीव निर्माण होणे अपरिहार्य ठरते. सुख म्हणजे समाधान, संतुष्टी, केवळ आनंदानुभूती. सुख दोन प्रकारचे असते. एक ऐंद्रिय सुख तर दुसरे आत्मिक सुख. ऐंद्रिय सुख हे शरीरजन्य तर आत्मिक सुख हे मानसिक-बौद्धिक आणि आत्मिक पातळीवरचे असते. उदात्त स्वरूपाचे असते. दोन्ही सुखे ही ईश्वर-निर्मितच असली तरी, त्यांच्या अनुभवण्याच्या पातळ्या या भिन्न असतात.

ऐंद्रिय सुखाचे अनुभव हे विषय-विकारांशी निगडित असतात. त्यामुळे त्यात दुसऱ्याची साथ, दुसऱ्याचे अस्तित्व, विषयवस्तूची निकड अपरिहार्य असते. सृष्टिरचनेचा खेळ, संसाराचे रहाटगाडगे सातत्याने चालू राहावे, यासाठी ऐंद्रिय सुखाची परिपाठी चालू राहणे हे स्वाभाविक, निसर्गदत्त कार्य असते. पण तेच एकमेव सुख, एकमेव प्राप्तव्य, एकमेव ध्येय आहे असे मानले गेल्यास, मोठा घोटाळा होतो. कारण ही सारी सुखे अक्षरशः 'जर तारी' असतात. जर इंद्रिये साथ देतील, जर विषयवस्तू उपलब्ध असतील, देश-काल-परिस्थितीची अनुकूलता असेल, तरच ही सुखानुभूती प्राप्त होते. तसे नसेल तर दुःखच दुःख हे ठरलेलेच आहे. पण आत्मिक सुखाचे तसे नाही. आत्मिक सुख हे आत्म्याच्या अंतरंग अलौकिक सौंदर्यानुभवाने, अंतरंग रसार्णवतेने, अंतरध्वनीने, अंतरदृष्टी व कल्पनेने, बौद्धिक झेपेने, आत्मानुभूतीने प्रत्ययाला येते. त्यामुळे आत्मिक सुखानुभव हा जास्त स्वतंत्र, स्वयंभू, स्वयंप्रेरित, स्वयंपूर्ण असतो. सामान्य संसारी माणसाला, हे दोन्ही प्रकारचे अनुभव घेत जीवन जगावे लागते. ते अधिक सुसंस्कृततेने आणि संपन्नतेने कसे जगावे ? हे सांगणारे शास्त्र गीता-ज्ञानेश्वरी आपणांला देते, विवेकाची उद्याने फुलवण्याचे दर्शन आपणांला घडवते.

## पाश्चात्त्य व पौर्वात्य दृष्टिकोन :

पाश्चात्त्य दृष्टिकोन हा बव्हंशी दृश्यजात जगालाच सत्य मानणारा असल्याने, पूर्णतः भौतिकवादी म्हणजे ऐंद्रिय-सुखप्रधान आहे. त्यामुळे स्वाभाविकच भोगवादी संस्कृतीत नैतिक-अनैतिकतेची चाड राहात नाही.

या उलट चित्र आपल्याला पौर्वात्य संस्कृतीत दिसून येते. पौर्वात्य संस्कृतीने इंद्रियजन्य भोगविलास नाकारले नाहीत; पण त्यांना संयम, विवेक, धार्मिक नीति-नियमांचे वेसण घालून, ब्रह्मानंद-प्राप्तीचा ध्येयमार्ग मनुष्यमात्राला दाखवून दिला आहे. विषय-वस्तूंचे उदात्तीकरण आणि भोग्यवस्तूंचे विभूतीकरण हे तिचे वैशिष्ट्य. 'भोग हा भगवंतांचा प्रसाद होय', असे समजून वागल्यास त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. त्याबद्दल मनात पावित्र्य-भावना व पूज्यभाव वाढतो; जो आपल्याला संयम-विवेकाकडे घेऊन जातो. भोगाबरोबर त्यागाची, सेवेची, सहकार्याची, समानतेची, सहनशीलतेची, शांती-समाधानाची व ईश्वरशरण्यतेची जाणीव जी वाढवते, ती 'संस्कृती' असते. केवळ वखवखलेली स्वार्थमूलक भोगलालसा ही विकृती असते. भारतीय वैदिक संस्कृती ही त्यागाची प्रवृत्ती निर्माण करणारी, देहीच विदेहीपण भोगायला प्रवृत्त करणारी, **'आनंदाचा आवारू। मांडूं जगा ॥ ज्ञाने.१३.३४.११६१ ॥'** असे म्हणणारी संस्कृती आहे. आनंद हा विषय-वस्तुनिष्ठ नाही, हे जाणवून देणारी म्हणजे शाश्वत आत्मसुखाचे भान करून देणारी ही संस्कृती आहे. स्वानंदसुख म्हणजेच हे आत्मसुख होय; याचे बीजारोपण करणारी ही संस्कृती आहे.

## आनंदमूर्ती 'मी' :

जगाच्या अवाढव्य पसाऱ्यात 'मी' कोण ? माझे कर्तव्य काय ? साध्य काय ? मार्ग काय ? मार्गक्रमणाची पद्धत काय ? जीवनाची फलश्रुती काय ? या सर्वांचा सखोल, सविस्तर, तर्कसंगत विचार वैदिक संस्कृतीने, गीता-ज्ञानेश्वरीने मांडला आहे. आजचे शरीरविज्ञान हे मानवी शरीराच्या अवयवांची निर्मिती, स्थान, प्रक्रिया व परिणाम यांची माहिती देते किंवा डागडुजीची व्यवस्था स्पष्ट करते. पण भारतीय अध्यात्मज्ञान हे थेट आत्म्याच्या जन्मकथेशी, त्याच्या विकसनाशी व मुक्तीशी आपणांला निगडित करते.

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या व चौदाव्या अध्यायांतून हा विषय विस्ताराने आपल्यापर्यंत पोहोचवला गेला आहे. मी आनंदमूर्ती आहे, कारण मी त्या जगन्नियंत्या ईश्वरीशक्तीचा चिद्विलास आहे. मी एक चैतन्यमूर्ती आहे. मी ॲडम आणि ईव्हच्या पाप-फळाची देणगी नव्हे, तर परब्रह्म परमेश्वराच्या अंतःकरणात उठलेला आनंदतरंग आहे. ज्याप्रमाणे परमेश्वर नित्य, नवनवोन्मेषशाली, प्रकाशमय, चैतन्यमय आहे, त्याप्रमाणे देहाकार धारण केलेला मीही पुण्यात्मा



आहे. देहप्राप्तीबरोबर त्रिगुणात्मकतेने व पंचमहाभूतांच्या साह्याने सुरू झालेल्या या जीवनक्रमात, समन्वित बुद्धीने व भक्तीने दुःखांवर मात करण्याची जीवनविद्या आम्हांला धर्माने, अध्यात्मशास्त्राने दिलेली आहे. 'ज्ञानेश्वरी'सारखे अक्षर-वाङ्मय आपणांला त्रिगुणांची, सत्त्व-रज-तम प्रवृत्तींची माहिती सांगत, सत्त्वगुणाच्या वाढीला प्रवृत्त करते. त्या योगेच समस्त मानवमात्रांचे कल्याण साधणे शक्य आहे हे दाखवून देते. त्याकरिता निष्काम कर्मयोग व स्वधर्माचरणाची वहिवाट घालून देते.

## स्वधर्माचरणाची प्रेरणा :

सुखप्राप्तीचा मार्ग हा कर्मप्रधान आहे, याची रोखठोक जाणीव गीता-ज्ञानेश्वरी करून देतात. **'कर्माचे डोळे ज्ञान ।'** अशी ज्ञानाची महती ज्ञानदेव आपणाला करून देतात. असंख्य डोळे पिसाऱ्यावर मिरवणारा मोर, ते दृष्टीहीन वैभव मिरवत असतो. डोळ्यांना खरीखुरी 'ज्ञानदृष्टी' ज्ञानदेव देतात. ज्ञानानेच उत्तम पुरुषत्व, आदर्श व्यक्तिमत्त्व घडू शकते असे ज्ञानदेव सांगतात. ज्ञानयुक्त कर्म करण्याची ते प्रेरणा देतात. यासाठी स्वधर्माचरण हे अपरिहार्य असल्याचे ते दाखवून देतात. स्वधर्म म्हणजे स्वकर्तव्य. स्वकर्तव्य-कर्म अनुसरले तर, त्याला चिकटूनच यथोचित फलप्राप्तीही होतेच. त्यामुळे फलाची चिंता वा चिंतन न करता, मनापासून अहंभावविरहित होत कर्तव्यकर्म करण्यावर त्यांनी भर दिला आहे. स्वकर्म हे ईश्वरार्पण बुद्धीने 'ओम्-तत्-सत्' या जाणिवेसह केल्यास त्याच्या परिणामांचे दायित्वही आपल्याकडे येत नाही. परिणामतः, आपण अलिप्तपणे कर्तव्यपूर्तीचा आनंद अनुभवू शकतो. यासाठी अहंकाररहितता साध्य करण्याचा मार्गही ज्ञानदेवांनी सांगितलेला आहे. **'तुम्हां वर्णविशेषवशें। आम्हीं हा स्वधर्म विहिला असे । यातें उपासा मग आपैसे। पुरती काम ॥ ज्ञाने.३.१०.८८ ॥'** हा ठाम सिद्धांत ते स्पष्ट करतात.

भगवान श्रीकृष्णांचे हे म्हणणे म्हणजे स्वतःला प्राप्त गुणधर्मांप्रमाणे कर्माचरण करणे. आपले गुणधर्म जाणून त्याप्रमाणे वागल्याने, आपल्या साऱ्या इच्छा-आकांक्षा या फलद्रूप होतात. हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात; **'या स्वधर्मपूजा पूजिता । देवतागणां समस्तां। योगक्षेम निश्चिता । करिती तुमचा ॥ज्ञाने.३.११.९६॥'** हे भरीव, ठोस आश्वासन देणारा हा भगवंतांचा सांगावा वैयक्तिक नैराश्याला, दुःखाला, अभावाला जागाच ठेवत नाही.

कर्माचा प्रेरक-कर्ता हा ईश्वरच, तसा फलदाताही ईश्वरच. त्यामुळे कर्माच्या कर्तृपदाचा अहंभाव शिल्लक राहात नाही. अहंकाररहित कर्म हे अनाक्रम, अक्रोधकारक, अशोककारक होते. त्यामुळे निर्भेळ सुख आपल्याला प्राप्त होते, हे लक्षात घेणे महत्त्वाचे होय.

**ज्ञानोपासना महत्त्वाची :**

गीता-ज्ञानेश्वरी हे आत्मज्ञान आलोकित करणारे ग्रंथराज होत. 'ज्ञानावाचून माणसाला माणूसपण प्राप्त होत नाही' असे ते स्पष्ट करतात. **'शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह । तेसें जीवित तें संमोह । ज्ञानहीन ॥ज्ञाने.४.४०.१९४॥'** अशी अवस्था येऊ नये म्हणून, ज्ञानोपासनाही ते अनिवार्य ठरवतात. अज्ञान, संशय, संमोह, भय, अकर्मण्यता, आळस हे जीवनाचे शत्रू मानवी जीवन दुःखमय करतात. म्हणून ज्ञानदेव म्हणतात; **'तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखटें । निखळ हा निवटे । मग निःशेष खता फिटे । मानसीचीं ॥ज्ञाने.४.४१.२०८॥'** तसे झाले म्हणजे, **'तैसे राग द्वेष जरी निमाले । तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ॥ज्ञाने.३.४३.२७१॥'** अशी स्थिती प्राप्त होते. मग **'मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचें बोलपण ठेलें । जयामाजि सापडलें । ज्ञेय दिसे ॥ज्ञाने.४.३३.१६३॥'** असे होते. असे ज्ञेय दिसू लागताच, **'आनंदाचे डोही आनंद तरंग ।'** अशी अवस्था प्राप्त होतेच होते.

ज्ञानाचे अनन्य महत्त्व सांगताना, ज्ञानदेव अज्ञानावर कडाडून कोरडे ओढताना दिसतात. **'तैसें धर्माधर्माचे टवाळ । दावी अज्ञान जें कां मूळ । तें त्यजुन त्यजीं सकळ । धर्मजात ॥ज्ञाने.१८.६६.१३९५॥'** या प्रखर उक्तीसह ते भेदाभेद, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, श्रेष्ठ-कनिष्ठ, शुभ-अशुभ, शुद्ध-अशुद्ध अशा सर्व भ्रांत कल्पनांना नाकारतात. **'तैसी दुर्लभ सद्‌बुद्धि । जिये परमात्माचि अवधि । (ज्ञाने.२.४१.२४१)'** किंवा **'तैसें ईश्वरावांचुनि कांहीं । जिये आणिक लाणी नाहीं । (ज्ञाने.२.४१.२४२)'** अशी यथार्थ जाणीव करून देतात. अशा प्रकारे आपल्या लक्षात येते की, 'ज्ञानोत्तर भक्तियुक्त कर्मयोग' ही ज्ञानेश्वरीची महत्त्वपूर्ण प्रेरणा आहे. **'संसार जिणते शास्त्र'** ज्ञानेश्वरी सांगते. बुद्धावस्थेपासून सिद्धावस्थेकडे, बद्धावस्थेपासून मुक्तावस्थेकडे नेणारे अद्वितीय



शास्त्र ज्ञानेश्वरी सांगते. दुर्गुणांचा त्याग व श्रद्धेच्या पायावर सद्‌गुणांचे संवर्धन हे तिचे ध्येय आहे. मानवी मोह, संघर्षांवर मात करून बहुजन समाजाला मोक्षाचे वाटेकरी होण्यासाठी परमार्थाच्या नामी वाटेवर नेण्यात ज्ञानेश्वरी व ज्ञानदेव यांनी देदीप्यमान कार्य केलेले आहे.

**विश्वात्मक देवोपासना :**

'अधर्म अज्ञानाचे टवाळ' समूळ निखंदून टाकण्याचा सल्ला देत, ज्ञानदेव आपल्याला विश्वाचे स्वरूप व त्यात आपली भूमिका नेमकेपणाने दिग्दर्शित करतात. **'अनादिसिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें । तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ज्ञाने.२.११.१००॥'** असा प्रश्न उपस्थित करून, ते प्रखर वैज्ञानिक सत्य सांगतात की, **'हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे । येऱ्हवीं तत्त्वतां वस्तु जें असे । तें अविनाशचि ॥ज्ञाने.२.१२.१०५॥'** अशा अविनाशी आशावंत ईश्वरीशक्तीची उपासना आपण सतत करायलाच हवी. कारण ती धगधगता प्रकाशपुंज आहे. आपण सारे त्या तेजस्वी शक्तीचे तेजस्वी वारस आहोत. त्यामुळे तेजाच्या तेजस्वी रूपांशांनी एकमेकांत समत्व-ममत्व-भ्रातृत्व पाहिले पाहिजे. **'सुखीं संतोषा न यावें । दुःखीं विषादा न भजावें । आणि लाभालाभ न धरावे । मनामाजी ॥ज्ञाने.२.३८.२२६॥'** अशी अवस्था त्यामुळे साध्य होते आणि स्वानंदसुखाचा परमानंद प्राप्त होतो.

सरते शेवटी, ज्ञानदेव विश्वात्मकदेवाची प्रार्थना करतात व स्वानुभवाचा प्रसाद सर्वांना वाटतात. 'खळांची व्यंकटी सांडावी; सत्कर्मी रति वाढावी, आणि जो जे वांच्छील तो ते लाहो अशी स्थिती प्राप्त व्हावी' अशी महदिच्छा ते प्रकट करतात. तसे झाले तर, ज्ञानदेवांनी केलेली 'स्वानंद साम्राज्याचे चक्रवर्ती' होण्याची प्रतिज्ञा साकार होते. ती साकारल्याचा स्वानुभव नोंदवताना, ते **'येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥ज्ञाने.१८.७८.१८०२॥'** अशी समाधानाची ग्वाहीही देतात. हा मार्ग कोणता ? तर तो असा होय;

**मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरे लावावें ।**
**अलौकिक नोहावें । लोकांप्रति ॥ज्ञाने.३.२५.१७१॥**

□□

# अमृतानुभवातील भावसौंदर्य

डॉ.यशवंत साधु

---

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या 'भावार्थदीपिके'तील काव्यसौंदर्य, आजपर्यंत अनेक रसिक-समीक्षकांनी विविध प्रकारे प्रकाशात आणलेले आहे. तरीदेखील या ग्रंथाचे वाङ्मयीन सौंदर्य एखाद्या चिरतरुण लावण्यखाणी स्त्रीप्रमाणे आजही काव्यरसिकांना आव्हान देत असते. अशा या नित्यनूतन सुंदर वाङ्मयीन कलाकृतीला मराठीत दुसरी जोड नाही. ज्ञानदेवांच्या अभंगवाणीतील भावसौंदर्य अनेक समीक्षकांनी उलगडून दाखविलेले आहे; तथापि ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'बद्दल मात्र काव्यरसिकांनी मौन पाळलेले दिसते.

'अनुभवामृत' म्हणजेच 'अमृतानुभव' या ग्रंथातील तत्त्वज्ञानाची चिकित्सा अनेकांनी केलेली आहे. डॉ.वा.दा.गोखले, श्री.नारायण पैकाजी पंडित, वै.जोग महाराज, वै.साखरे महाराज, श्री.प्रह्लाद सीताराम सुबंध, श्री.भा.पं.बहिरट, श्री.पु.य.देशपांडे, श्री.भैय्यासाहेब किबे, श्री.नरहरशास्त्री खटशीकर, श्री.विंदा करंदीकर इत्यादी मान्यवर टीकाकारांनी अमृतानुभवावर टीका, भाष्ये, अनुवाद यांसारखी रचना केली आहे. 'अमृतानुभवा'वर श्रीज्ञानेश्वर महाराजांच्याच बोधपरंपरेतील शिवकल्याण नावाच्या कवीने, **'नित्यानंदैक्यदीपिका'** नावाची ओवीबद्ध टीका लिहिली आहे. अमृतानुभवावरची सर्वांत प्रथम लिहिलेली टीका शिवकल्याण यांची आहे.

परंतु अमृतानुभवातील काव्यसौंदर्याबद्दल समीक्षकांनी व टीकाकारांनी फारसे चांगले अभिप्राय दिलेले नाहीत. ज्ञानेश्वरीतील काव्यसौंदर्यावर भाळलेल्या रसिकांना अमृतानुभवातील भावसौंदर्य क्वचितच जाणवलेले आहे. उलट अमृतानुभव हा निखळ तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे, त्यात कोणत्याही प्रकारचे काव्यसौंदर्य नाही, अशीच समीक्षकांची समजूत आहे. 'ज्ञानेश्वरी'प्रमाणेच 'अमृतानुभव' हा ग्रंथ देखील एका कविमनाचा आविष्कार आहे, हे कुणी फारसे लक्षात घेतलेले दिसत नाही. फार फार तर, अमृतानुभवातील पहिल्या



प्रकरणात आलेल्या 'शिव-शक्ती' यावरचे पति-पत्नींचे रूपक काही रसिकांनी उलगडून दाखविले आहे. मात्र अशा काही मोजक्या सौंदर्यस्थळांपलीकडे मराठी रसिकांची मजल गेलेली नाही.

पण जो कोणी अमृतानुभवातील प्रत्येक प्रकरणातील प्रत्येक ओवीचे चिंतन करील, त्यास त्यातील शब्दांचे व अर्थांचे सौंदर्य मोहित केल्याशिवाय राहणार नाही. 'अमृतानुभव' हा अद्वैत तत्त्वज्ञानाचा ग्रंथ असला तरी, अद्वैत ही ज्ञानदेवांची अनुभूती आहे. जेव्हा एखादा कवी आपली एखादी अनुभूती व्यक्त करतो, तेव्हा तो अनुभव सौंदर्यरूप धारण करूनच व्यक्त होतो. 'अमृतानुभवा'त ज्ञानदेवांनी तत्त्वज्ञानाची खडबडीत चिकित्सा केलेली नाही, तर ज्यास 'परमात्मतत्त्व' म्हणतात त्या तत्त्वाचा व्यापक, विशाल, सर्वस्पर्शी अनुभव ज्ञानदेव येथे व्यक्त करतात. येथे ज्ञानदेवांची भूमिका शास्त्रकाराची नसून एका कलावंताची आहे. ज्ञानेश्वरी असो की अमृतानुभव असो; ज्ञानदेव जेव्हा एखादा भाव व्यक्त करतात, तेव्हा तो भाव स्वतःचे असे एक सुंदर रूप धारण करूनच व्यक्त होतो. ज्ञानदेवांच्या अभंगांत तर अशा भाव-भावनांचे अनेक सुंदर तरंग निर्माण होतात. 'अमृतानुभवातील भावसौंदर्य' हे प्रस्तुतच्या एका छोट्याशा लेखात सामावणे शक्य नाही. तथापि, या सौंदर्याचे काही पैलू उलगडून दाखविण्याचा प्रयत्न या लेखात केलेला आहे.

## लौकिक व अलौकिक भाव :

अमृतानुभवातील भाव हे अलौकिक स्वरूपाचे आहेत. सामान्यतः काव्य, नाटक, कथा, कादंबरी, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मयप्रकारांतील वर्ण्य विषय हे लौकिक स्वरूपाचे असतात. त्यांतील स्त्रिया, पुरुष यांच्या भाव-भावनांचे स्वरूप लौकिक असते. त्यांतील संघर्षाचे स्वरूपही लौकिक व सांसारिक असते. त्यांतील सुख-दुःखांना या जगातील वास्तवाची पार्श्वभूमी असते. जीवनातील कठोर वास्तवांना सामोरे जाताना करावा लागणारा दुर्दम्य संघर्ष वाङ्मयातून सातत्याने व्यक्त होत असतो. अशा अर्थाने, वाङ्मयातील भाव हे लौकिक स्वरूपाचे असतात असे म्हटले जाते. पण अमृतानुभवातील अनुभवाचे स्वरूप, लौकिक अनुभवाच्या पलीकडचे आहे. सुख-दुःखांच्या पलीकडचा हा अनुभव असतो. अमृतानुभवातील अनुभवाला स्थल-काल-

व्यक्तीची मर्यादा नाही. हा अनुभव एकाचवेळी ज्ञानात्मक, केवलात्मक व परिपूर्ण चैतन्यस्वरूप असतो.

सामान्यतः, जगातील अनुभव हा एक तर सुखात्मक तरी असतो किंवा दुःखात्मक तरी असतो. अमृतानुभवातील अनुभव मात्र पूर्ण आनंदात्मक, धन्यतेचा, कृतार्थतेचा असतो. जगातील सर्व अनुभव सर्वसाधारणपणे इंद्रियगम्य असतात. डोळे, कान, जिव्हा, त्वचा, घ्राणेंद्रिय या इंद्रियांना जगातल्या प्रत्येक अनुभवाची संवेदना होते. ही संवेदना मनाला पुलकित करते. पण त्यालाही मर्यादा आहे. डोळ्यांना येणारा रूपाचा अनुभव कानांनी ग्रहण करता येत नाही किंवा कानाला गोड वाटणारे संगीत जिव्हेने ग्रहण करता येत नाही. जिव्हेला गोड वाटणारी जिलबी कानाला बांधून चालत नाही. प्रत्येक इंद्रियांच्या आनंदाचे विषय ठरलेले आहेत.

पण अनुभवामृतातील अनुभवाचे मात्र तसे नाही. यातील अनुभव शब्दातीत व इंद्रियातीत असूनही, एकाचवेळी मनासह सर्व इंद्रियांना स्पर्श करतो. मनात हा अनुभव ओतप्रोत भरून इंद्रियांतून पाझरतो. असा हा अनुभव केवल प्रकाशाचा, केवल ज्ञानाचा, केवल सत्याचा आहे. देश, काल, दिशा, अवकाश यांना भेदून जाणारा हा अनुभव, सर्वसामान्य जगातील लौकिक व सांसारिक अनुभवांपेक्षा कितीतरी निराळा आहे हे लक्षात घेतले, तरच अमृतानुभवातील भावसौंदर्य आपल्या मनाला मोहित करू शकेल. संसारातील अनुभव हे अपूर्ण अनुभव असतात. त्या अनुभवांत अभाव लपलेला आहे. अमृतानुभवातील अनुभव हा ‘पूर्णत्वाचा अनुभव’ आहे. अभाव, अज्ञान, भेद, जडता व दुःख यांपासून हा अनुभव कितीतरी दूर आहे. हे समजावून घेतले, तरच आपणांस अमृतानुभवातील भावसौंदर्याचा काही प्रमाणात अंदाज बांधता येतो.

दिसणारे हे सर्व जग सर्वांसाठी एकसारखेच आहे; पण त्याकडे पाहण्याची जीवन्मुक्ताची दृष्टी आणि सर्वसामान्य माणसाची दृष्टी यांत मूलभूत फरक आहे. सर्वसामान्य माणूस जगातल्या प्रत्येक पदार्थाकडे एक भोग्य वस्तू म्हणून पाहतो. निरंतर भोक्त्याच्या भूमिकेतून त्याचा व्यवहार चालतो. त्याचे ज्ञान, कर्म, उपासना हेही भोक्त्याच्या भूमिकेतूनच चालतात. पण जीवन्मुक्तांची भूमिका फार वेगळी असते. ते जगाकडे पाहतात; पण त्यांना हे



सर्व जग परमात्मरूप, ब्रह्मरूप दिसते. भोक्ता, भोग्य, भोग या त्रिपुटीचे उल्लंघन करून, जीवन्मुक्त या जगाकडे परमात्म्याचा व प्रकृतीचा विलास म्हणून पाहतो. तो जगातील सुख-दुःखांत अडकून पडत नाही, तर साक्षीरूपाने या जगाकडे पाहतो. जीवन्मुक्तही सर्व व्यवहार करतो, पण त्याचा कर्तेपणा त्याला स्पर्श करीत नाही. तोही काव्य लिहितो; पण त्या काव्यातील अनुभव एका ‘साक्षी’चे व जीवन्मुक्ताचे अनुभव असतात. त्या अनुभवालाच ‘अमृतानुभवा’त अमृतरूप प्राप्त झालेले आहे. या अर्थाने, ‘अमृतानुभव’ म्हणजे एका जीवन्मुक्त कविमनाचा आविष्कार आहे. या अमूर्त, अरूप, अशब्द अनुभवाला मूर्त रूप प्राप्त करून देण्यासाठी, या जगातील सर्व वस्तू प्रतिमारूप धारण करून येतात. त्या प्रतिमांचे सौंदर्य हा अमृतानुभवाच्या आस्वादाचा एक मधुर विषय आहे.

थोडक्यात; ज्ञानदेव एक जीवन्मुक्त, ज्ञानी, संत, योगी पुरुष असले, तरी ते एक महाकवी आहेत. महाकवी जो अनुभव आपल्या काव्यातून वर्णन करतो, त्या अनुभवाला सुंदर रूप देण्यासाठी या जगातील अनेक घटना, दृश्ये, पदार्थ, चराचर वस्तू, व्यक्ती या महाकवीसमोर उत्सुकतेने उभ्या असतात. कवी सुद्धा आपल्या काव्यात या जगातील अनेक वस्तू, व्यक्ती, पदार्थांना स्वतःचे असे वेगळे शरीर, मन देतो आणि त्यांच्या माध्यमातून आपला अनुभव व्यक्त करतो. असे हे लौकिक व अलौकिकाचे आगळेवेगळे नाते अमृतानुभवात पाहावयास मिळते.

### भावसौंदर्याची विविध रूपे :

‘अद्वैत’ ही एकच अनुभूती; पण ज्ञानदेवांच्या अमृतानुभवाच्या दहा प्रकरणांत ती विविध सुंदर रूपे धारण करून अवतीर्ण होते. ‘अद्वैत’ हा एकच भाव; पण तो सजीव सुंदर रूपे धारण करून सगुण साकार होतो. ज्ञानेश्वरीप्रमाणे अमृतानुभव हा ग्रंथ काही एखाद्या ग्रंथावरचे भाष्य नाही. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरी हे श्रीमद् भगवद्गीतेवरील भाष्य आहे, त्याप्रमाणे अमृतानुभव हा काही भाष्यग्रंथ नाही. ज्ञानदेवांच्या अमृतरूप अनुभवाला येथे उत्स्फूर्त शब्दरूप प्राप्त झालेले आहे. यातील भाव हा मुख्यत्वे अद्वैताचा व अभेदाचा असला तरी, तो कधी शिव-शक्तीच्या रूपाने सुंदर मिथुनरूप धारण करून पहिल्या प्रकरणात व्यक्त होतो. हे

जग म्हणजे शिव-शक्तीचा अपूर्व, अखंड विलास आहे; हा भाव ज्ञानदेवांनी पति-पत्नींच्या एका सुंदर युगलरूपातून व्यक्त केला आहे. हाच अद्वैताचा भाव, ज्ञानदेव गुरु-शिष्यांच्या सामरस्यातून दुसऱ्या प्रकरणात व्यक्त करतात. गुरु व शिष्य हे जगाच्या दृष्टीने द्वैत (दोन) दिसत असले तरी, श्रीगुरूच दोन्ही उपाधींतून व्यक्त होतात. हा एकात्मभाव ज्ञानदेवांनी सद्गुरु निवृत्तिनाथांना अभिवादन करताना व्यक्त केला आहे. नुरलेपणाची एक अद्भुत जाणीव ज्ञानदेवांच्या अमृतानुभवात विविध रूपे धारण करते.

अमृतानुभवाच्या तिसऱ्या प्रकरणात, श्रीगुरूंकडून वाणीने जो उपदेश मिळाला त्या उपदेशाने अज्ञान नष्ट झाले व अज्ञानाची जागा ज्ञानाने घेतली. परंतु ज्ञानदेवांना या ज्ञानाचेही ओझे वाटते. हे ज्ञान म्हणजे देखील त्यांना एकप्रकारचा बंध आहे असे वाटते. या बंधातून मुक्त होण्यासाठी, ते चारही वाणींचा चार प्रकारच्या देहांत लय घडवून आणतात आणि श्रीगुरूंच्या स्वरूपाशी एकरूप होतात. सद्गुरूंच्या कृपेतून ऋणमुक्त होण्याचा एक आगळा-वेगळा भाव अमृतानुभवाच्या तिसऱ्या प्रकरणातून व्यक्त होतो.

'ज्ञान' ही संकल्पना नेमकी काय आहे ? याबद्दल अनेक मतमतांतरे आढळतील. पण अमृतानुभवात 'ज्ञान' या संकल्पनेची बौद्धिक पातळीवर चर्चा केली गेली नसून, खरोखरच परमात्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान अनुभवाच्या पातळीवर कोणता परिणाम घडवून आणते ? हे ज्ञानदेवांनी चौथ्या प्रकरणापासून पुढील दहाव्या प्रकरणापर्यंत विविध संवेदनाचित्रांच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. ज्ञानाचा खरा अनुभव माणसाला निरभिमानी, निरपेक्ष, ज्ञातृ-ज्ञेयविहीन बनवितो. त्या स्थितीत अज्ञान जसे नष्ट होते तसेच ज्ञानही लयाला जाते. केवळ स्वसंवेद्य अशा स्थितीचा अनुभव उरतो, हे ज्ञानदेवांनी अमृतानुभवाच्या चौथ्या प्रकरणात विविध, सुंदर प्रतिमानांनी व्यक्त केले आहे.

परमात्म्याचे वर्णन करताना, 'तो सच्चिदानंदरूप आहे' असे उपनिषदांपासून ते भगवद्गीतेपर्यंत व संतवाणीतूनही कथन केलेले आढळते. पण ज्ञानदेवांना सत्-चित्-आनंद ही पदे परमात्म-वर्णनासाठी अपुरी वाटतात. कारण अद्वैताच्या पातळीवर ही पदे केव्हाच लयाला जातात. जीव-ब्रह्मैक्याचा बोध होईपर्यंतच या पदांना महत्त्व असते. ते अद्वैत प्राप्त होताच, ही पदे वृत्तीला सोडून जातात. हा



शब्दातीत अनुभव ज्ञानदेव अमृतानुभवाच्या पाचव्या प्रकरणात निरनिराळ्या अनुभव-माध्यमांतून व्यक्त करतात.

शब्दाचे सामर्थ्य कवीशिवाय कोणाला समजणार ? शब्दामुळेच अनेक गोष्टींचे ज्ञान होते. शब्दातूनच अनेक वस्तूंचे सौंदर्य व्यक्त होते. सद्गुरूंच्या मुखातील शब्दाने साधक जीवन्मुक्त होतो. हे शब्दाचे सामर्थ्य ज्ञानदेवांनी केव्हाच मान्य केले आहे. तथापि; स्वयंप्रकाश आत्मानुभूतीच्या प्रकाशात शब्द अस्तित्वशून्य बनतो. एकदा निःशब्द स्थितीत गेले की, तेथे शब्द बापुडे व्यर्थ ठरतात. ज्या अज्ञानाच्या नाशासाठी शब्द उपयुक्त ठरतात, त्या ज्ञानात्मक अनुभवाच्या पातळीवर, त्या अनिर्वाच्य स्थितीत शब्द लयाला जातात. हे शब्दांचे नुरलेपण ज्ञानदेवांनी अमृतानुभवाच्या सहाव्या प्रकरणात विविध अपरिचित संवेदनाचित्रांनी व्यक्त केले आहे.

ज्ञानदेवांच्या अपूर्व कल्पनाविलासाचा अनुभव अमृतानुभवाच्या सातव्या प्रकरणात येतो. आत्मस्वरूपाचा अनुभव भोगताना, 'अज्ञान' नावाची कोणती वस्तू अस्तित्वातच नसते. किंबहुना 'अज्ञान' या संकल्पनेला स्वयंप्रकाश सत्तास्फूर्तीपुढे काहीही स्थान नाही, हे ज्ञानदेवांनी अनेक असंभवनीय वाटणाऱ्या कल्पनाचित्रांच्या द्वारे व्यक्त केले आहे.

सद्गुरु निवृत्तिनाथ यांच्या कृपेने प्राप्त झालेल्या ब्रह्मस्थितीचे गुणगायन म्हणजे अमृतानुभवाचे आठवे प्रकरण. अवघ्या एकोणीस ओव्यांची एक सुंदर कविता म्हणजे अमृतानुभवाचे आठवे प्रकरण होय. या उच्च कोटीच्या स्वानंदस्थितीतही ज्ञानदेवांना भक्तीचा विसर पडलेला नाही.

जीवन्मुक्तीचा आनंद भोगण्याकरिता भक्तीसारखे श्रेष्ठ माध्यम नाही, हे ज्ञानदेवांनी अमृतानुभवाच्या नवव्या प्रकरणात विविध ऐंद्रिय संवेदनाचित्रांनी रेखाटले आहे. वरवर पाहता भक्तीत द्वैत दिसत असले तरी, त्या भक्तीचे अधिष्ठान अद्वैतातच असते, या अनुभवाच्या अनेक अपूर्व संवेदनाकृती चित्रित करण्यात ज्ञानदेवांचे कौशल्य दिसून येते.

दहाव्या व शेवटच्या प्रकरणात पुन्हा एकदा सद्गुरु निवृत्तिनाथांच्या कृपेविषयी ज्ञानदेवांनी कृतज्ञतेचे उद्गार काढले आहेत. 'त्यांच्या कृपेने आपण अमृतानुभवात जे बोललो, ते आपले बोलणे म्हणजे पाण्यावर मकरीचे चित्र

रेखाटल्यासारखे आहे' या ज्ञानदेवांच्या उद्गारात नुरलेपणाची एक कृतज्ञ, नम्र जाणीव व्यक्त होते. ही अमृताची अनुभूती एखाद्या गोड पक्वान्नाप्रमाणे सर्वांना सेवन करण्यासाठी मी बनवली आहे. तो अमृतरस सेवन करून, सर्व जीवांनी अक्षरब्रह्माच्या गाभाऱ्यात प्रवेश करावा, सर्व विश्वात व्यापलेल्या एका अद्वितीय आनंदाचा भोग घ्यावा, असा उदार प्रेमभाव व्यक्त करून, ज्ञानदेवांनी अमृतानुभवाचा समारोप केला आहे.

थोडक्यात, अमृतानुभवाची दहा प्रकरणे वरवर पाहता भिन्न भिन्न विषयांचे निरूपण करणारी वाटत असली तरी, त्या सर्व प्रकरणांतून एकच व्यापक ब्रह्मभाव प्रवाहित झालेला आहे. अनेक पातळींवरचे अद्वैत, अभेदत्व, सुंदर सुंदर कल्पनाचित्रांनी ज्ञानदेव येथे व्यक्त करतात. येथे सर्वच सौंदर्यस्थळांचा परामर्श घेणे अशक्य आहे; तरी पण प्रकर्षाने लक्ष वेधून घेणाऱ्या काही सौंदर्यस्थळांचा आस्वाद पुढील विवेचनातून घेतलेला आहे.

### कल्पनाचित्रांचे सौंदर्य :

'अद्वैत' हा अमृतानुभवाचा केवळ प्रतिपाद्य विषय नाही, तर ती श्रीज्ञानेश्वर महाराजांची अनुभूती आहे. या अनुभूतीचे स्वरूपही अलौकिक, गूढ, अनिर्वाच्य असते. नेहमीच्या भौतिक अनुभवात, अनुभवाचा भोक्ता वेगळा असतो आणि भोग वेगळे असतात. जसे आपण कानाने संगीत ऐकतो, तेव्हा संगीत ऐकणारे कान वेगळे असतात आणि संगीत वेगळे असते. तसेच सुंदर स्त्रीचे रूप व तिला पाहणारा भिन्न असतो. पण ज्ञानदेवांना आलेला अमृतरूपी अनुभव भोग, भोक्ता, भोग्य या त्रिपुटीच्या पलीकडचा असतो. येथे दृश्य, द्रष्टा, दर्शन ही त्रिपुटी लयाला गेलेली असते. अशा एका मुक्त स्थितीचे चित्रण ज्ञानदेव पुढील कल्पनाचित्रांच्या माध्यमातून व्यक्त करतात;

**आता आमोद सुनास जाले । श्रुतीसि श्रवण रिगाले ।**
**आरिसे उठिले । लोचनासी ॥अमृ.९.१॥**

**आपुलेनि समीरपणे । वेल्हावती विंजणे ।**
**की माथेचि चाफेपणे । बहकताती ॥अमृ.९.२॥**

**जिव्हा लोधली रसे । कमळ सूर्यपणे विकाशे ।**
**चकोरेचि जैसे । चंद्रमा जाली ॥अमृ.९.३॥**



**फुलेचि जाली भ्रमर । तरुणीच जाले नर ।**
**जाले आपुले शेजार । निद्राळूचि ॥अमृ.९.४॥**

येथे सर्व भोगच भोक्ते झाले आहेत. सुगंधच घ्राणेंद्रिय झाला आहे, शब्दातच श्रवणेंद्रियाने प्रवेश केला आहे. आरसेच डोळ्याला पाहण्यास उत्सुक झाले आहेत. वाऱ्यानेच पंख्याचे रूप धारण केले आहे व तो वारा शरीराला सुखावतो आहे. जिव्हा विविध रसांनी रसमय झाली आहे. कमळच सूर्याच्या आकाराने विकसित झाले आहे. किंबहुना चकोरपक्षीच चंद्र झाले आहेत. फुलेच येथे भ्रमर झाली आहेत किंवा तरुण स्त्रीच पुरुष झाली व दोघांत सामरस्य निर्माण झाले आहे. शय्येनेच गाढ झोपलेल्या माणसाला आपल्यात सामावून घेतले आहे. अशा अद्भुत कल्पनाचित्रांतून ज्ञानदेवांनी भोग व भोक्ता या दोन्हींत एकच स्वयंप्रकाश आत्मा प्रवाहित झाला आहे, असे दाखवून दिले आहे.

जगाकडे केवळ भोग्य दृष्टीने पाहणाऱ्या जीवास हे वस्तुमात्र आपल्या भोगासाठी आहे आणि आपण त्याचे भोक्ते आहोत असे वाटते. पण सद्गुरुकृपेने स्वात्मस्थिती प्राप्त झालेल्या जीवन्मुक्तास, सर्वत्र एकाच चैतन्याचा विलास अनुभवास येतो. जीवन्मुक्ताचा भोग्य पदार्थाशी होणारा व्यवहार अद्वैताच्या भूमिकेतून कसा होतो ? हे ज्ञानदेवांनी विविध संवेदनाक्षेत्रांतील कल्पनाचित्रांच्या द्वारे येथे व्यक्त केले आहे. चंद्र-चकोर, कमळ-सूर्य, भ्रमर-फूल, नर-तरुणी या युगुलातील मीलनाची, सामरस्याची, उत्कटतेची तरीपण अलिप्ततेची, अभेदत्वाची, अभिन्नत्वाची सुंदर कल्पनाचित्रे रेखाटून ज्ञानदेव आपला भाव सुंदर बनवतात.

अमृतानुभवाचे नववे प्रकरण म्हणजे जीवन्मुक्ताचे गाणेच आहे. कैवल्यपदावर आरूढ झालेला, स्वानंदसाम्राज्याचा चक्रवर्ती या जगात राहतो तरी कसा ? याचे काव्यात्म चित्रण ज्ञानदेवांनी येथे केले आहे. जीवन्मुक्ताची इंद्रिये देखील विषय-ग्रहणासाठी सरसावतात. पण त्याची प्रतीती विषयसुख अशी नसून सर्वत्र चैतन्य अशीच असते. हे ज्ञानदेवांनी एका सुंदर कल्पनाचित्रातून व्यक्त केले आहे;

**वेचूनि आणू कल्लोळ । म्हणोनि घापे करतळ ।**
**तेथे तरी निखळ । पाणीच फावे ॥अमृ.९.१२॥**

कोण्या एका माणसाला वाटले की, सर्व लोक नदीचे पाणी आणतात. आपण पाणी आणण्यापेक्षा पाण्यावरच्या लाटा आणल्या तर काय बहार होईल ! या विचाराने तो निघाला व नदीकाठी आला. पाण्यावरील लाटा वेचण्याच्या निमित्ताने त्याने पाण्यात हात घातला. काय झाले असेल ? अर्थात् लाटांऐवजी त्याच्या हाताला पाणीच लागले. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाचा भोग्य पदार्थाशी संयोग घडतो; पण तो नाममात्र असतो. **'वेचूनि आणू कल्लोळ ।'** असे म्हणणाऱ्या माणसाच्या मनाच्या व शरीराच्या हालचालीचे एक सुंदर चित्रण ज्ञानदेवांनी येथे साधले आहे.

असाच एक मनुष्य झोपला असताना त्याला स्वप्न पडले. स्वप्नात आपण अनेक तऱ्हांचे विलास भोगत आहोत असे त्यास दिसले. हेच भोगविलास आपण जागृतीतल्या संसारात नेऊन भोगावेत अशा कल्पनेने तो उठला. पण कसचे काय ? सर्व भोगविलास अदृश्य होऊन तो एकटाच उरला.

**स्वप्नीचिया विलासा । भेटईन या आशा ।**
**उठिला तव जैसा । तोचि मा तो ॥अमृ.९.२४॥**

स्वप्नातील विलासांना जागेपणी कवटाळण्याची माणसाची अभिलाषा व मनोवृत्ती आणि त्यातून घडणाऱ्या सहज हालचाली यांचे कल्पनाचित्र रेखाटून, जीवन्मुक्ताची नुरलेपणाची जाणीव येथे व्यक्त केली आहे.

सहस्रबाहू सूर्य कधी अंधाराला उचलून कडेवर घेत असतो काय ? पण अमृतानुभवात सूर्य आपले हजारो किरणरूपी बाहू पसरून अंधाराला उचलून घेण्यास प्रवृत्त होतो आणि त्या प्रयत्नात एक सूर्यच अवशिष्ट राहतो, असे गंमतीशीर कल्पनाचित्र ज्ञानदेवांनी रेखाटले आहे. (अमृ.९.२३). चंद्र कधी चांदणे वेचण्यासाठी जाईल काय ? पण ज्ञानदेवांच्या कल्पनासृष्टीत एकदा चंद्र आपले चांदणे वेचण्यासाठी गेला. पण झाले काय ? तेथे कोणीच कोणाला वेचू शकले नाही. (अमृ.९.२६).

शुद्ध अद्वैत स्थितीत ज्ञाता, कर्ता, भोक्ता या भूमिका संपूनच जातात. सारे विश्व म्हणजे एक भगवत्प्रकाशच असतो. मिठाची मासोळी कुठे असते काय ? पण एकाने मिठाची मासोळी बनवली. एका योगी पुरुषाने त्या मासळीला जिवंत केले. आता प्रश्न असा निर्माण झाला की, मासळी म्हणून



तिला पाण्यात सोडावे तर ती मिठाची म्हणून विरघळून जाणार. आणि मासळी असल्यामुळे पाण्याबाहेर राहू शकणार नाही. (अमृ.७.३६). तसे अज्ञान हे प्रकाशविरोधी आहे, म्हणून स्वयंप्रकाश आत्म्याच्या ठिकाणी राहत नाही आणि अध्यस्त असल्यामुळे आत्म्याहून भिन्न राहू शकत नाही. अज्ञान-खंडनासाठी ज्ञानदेवांनी 'लवणाच्या मासोळी'चे मार्मिक कल्पनाचित्र रेखाटून, अज्ञानाला कुठेच कसा आश्रय नाही हे सिद्ध केले आहे.

अमृतानुभवाच्या पहिल्या प्रकरणात शिव-शक्तींचे ऐक्य वर्णन करताना, ज्ञानेश्वर महाराजांनी उभयतांवर पतिपत्नींच्या सामरस्याचे रूपक केले आहे. हे रूपक म्हणजे पतिपत्नींच्या संबंधांतील सुंदर संवेदनाचित्रच आहे. शिव व शक्ती हे म्हणण्यासाठी दोन आहेत. पण या दोघांत अनादी ऐक्य आहे. स्त्री व पुरुष हा भेद येथे नावापुरताच आहे. दोन टिपऱ्यांतून एकच नाद निर्माण व्हावा, दोन फुलांतून एकच सुगंध, दोन दिव्यांतून एक प्रकाश, दोन ओठांतून एक शब्द निर्माण व्हावा (अमृ.१.१८-१९), त्याप्रमाणे या दोघांच्या संयोगातून हे जग निर्माण झाले आहे. या उभयतांत प्रियकर-प्रेयसीचे नाते आहे. प्रियकर-प्रेयसीस जसे परस्परांना सोडून राहणे अशक्य व्हावे, वियोग असह्य व्हावा, तशातलीच गत शिव-शक्तींची पण आहे. मीलनाच्या क्षणी तर;

**कैशी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपण मिळूनि एकी ।**
**नेदेतीच कवतुकी । एकपण फुटो ॥अमृ.१.५॥**

जगाएवढे बाळ प्रसवून सुद्धा त्यांचे उभयतांतील प्रेम कमी होत नाही. चराचर संसाराला आपल्याच ठिकाणी निर्माण करून सुद्धा, या उभयतांत तिसरेपणा निर्माण होत नाही. अशा जगावेगळ्या पति-पत्नींचे एक कल्पनाचित्र रेखाटून, शिव-शक्तींचे अद्वैत ज्ञानदेवांनी मूर्तरूपाला आणले आहे. मीलनाच्या वेळी स्त्री-पुरुषात न उरणारे द्वैत, लज्जा, संकोच यांची संपूर्ण निवृत्ती, परस्परांच्या संगमातील अवीट गोडी या कल्पनांचे सुंदर साहचर्य ज्ञानदेवांनी साधून, शिव-शक्तींतील अतूट नाते वर्णन केले आहे.

पती (शिव) निर्गुण निराकार असा जगावेगळा असल्यामुळे, ही पत्नी (शक्ती) लज्जित झाली आहे. अशा निर्गुण निरवयव पतीला कसे शृंगारावे ? असा स्त्रीसुलभ प्रश्न तिच्यासमोर उभा आहे. मग स्वतःच्या स्वरूपापासून

निर्माण झालेल्या जगालाच ती सजवते, नटवते. त्याला नाम-रूपांची लेणी लेववित. स्त्रीला बाळाविषयी वाटणारे प्रेम म्हणजे एकप्रकारे सुप्त पतिप्रेमाचाच आविष्कार असतो, ही मानवसहज कल्पना येथे डोकावल्यावाचून राहत नाही.

**पतीचेनि अरूपपणे । लाजोनि अंगाचे मिरवणे ।**
**केले जगाएवढे लेणे । नामरूपाचे ॥अमृ.१.३०॥**

स्त्री प्रसंगोपात्त स्वशरीराचा संकोच करून पुरुषाला प्रसन्न करते आणि एका उत्कटबिंदूच्या ठिकाणी पुरुष सुद्धा तिला तशीच दाद देतो; हे मीलनातील कल्पनासाहचर्य शिव-शक्तींच्या ऐक्यासाठी योजून, ज्ञानदेवांनी अपूर्व रसिकता प्रकट केली आहे. (अमृ.१.३२). संसारात कधी पतीला बायकोची भीड बाळगावी लागते. कधी पत्नीला सुद्धा पतीची मर्जी सांभाळावी लागते. एखाद्या वेळी, रागावून झोपलेल्या पतीला झोपेतून उठवून 'रससोय' खाऊ घालावी लागते. (अमृ.१.३४-३५). संसारातील ऊन-सावल्यांचे हे खेळ स्त्री-पुरुषांच्या जीवनात नित्यच चालू असतात. या संसारचित्रांचा उपयोग करून, ज्ञानदेवांनी शिव-शक्तींच्या जगत्निर्मितीचे रहस्य कुशलतेने सूचित केले आहे.

**- (क्रमशः)**

□□

# संतसाहित्याची फलश्रुती

प्रा.म.अ.कुलकर्णी (स्वामी प्रज्ञानंद)

---

संतसाहित्य हा आपणां सर्वांच्या जिव्हाळ्याचा, चिंतनाचा आणि अभ्यासाचा विषय आहे. ज्यांचा सार्थ अभिमान बाळगावा, ज्यांना सदैव आदर्श मानावे अशा तोलामोलाचे थोर संत या महाराष्ट्रात झाले. आजही आहेत आणि उद्याही ते येथेच प्रकट होतील, अशी श्रद्धा आपणां सर्वांच्या अंतर्यामी पिढ्यान् पिढ्या दृढ आहे. समर्थ रामदासांनी ही श्रद्धा जनमानसात दृढ केली. ते सांगतात;



**धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।**
**जाले आहेत, पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥दा.बो.१८.६.२०॥**

भारत आणि त्यातही महाराष्ट्र हा ईश्वरकृपांकित देश आहे. महाराष्ट्र हा 'संतांची भूमी' म्हणूनच सर्वत्र ओळखला जातो. गेल्या हजार एक वर्षांचा इतिहास पाहिला तर, सर्वप्रथम एक गोष्ट ध्यानात येते की सर्वकल्याणकारी, सर्वहितकारी असे विचार-तत्त्वज्ञान सांगणारी संतांची एक अखंड मालिका या महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. तीत सातत्य आहे. ही परंपरा अत्यंत उदार असून समाजाचे सामर्थ्य वाढविणारी आहे. सुसंवाद साधणे हाच या परंपरेचा उल्लेखनीय विशेष आहे. समाजातील सर्व लोकांचे पोषण, संवर्धन, उन्नयन घडविण्यात ती सतत यशस्वी होत आलेली आहे. सामान्य-असामान्य, विद्वान-अविद्वान, लहान-थोर सर्वांना बरोबर घेऊन प्रगतीच्याच दिशेने नेणारे असे एक अद्भुत रसायन या परंपरेने सांभाळलेले आहे.

'संतसाहित्य' हे संतांच्या तपःपूत जीवनातून उगम पावते. 'जीवनाबरोबर सतत, नित्य, निरंतर सोबत करते ते साहित्य' अशी व्यापक आणि मार्मिक व्याख्या आचार्य विनोबाजी भावे यांनी केलेली आहे. महाराष्ट्रातील संतसाहित्य या व्याख्येच्या कसोटीवर उतरते. ते सर्वांच्या जीवनाला प्रकाश देते, प्रेरणाही देते. व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि विश्व घडविण्याचे सामर्थ्य त्यात आहे. संतसाहित्य हे चैतन्यशील, सर्वात्मक तसेच सार्वकालिकही आहे.

**ज्ञानी निवति परमार्थबोधे । पंडित निवति पदबंधे ।**
**लोक निवति कथा विनोदे । ग्रंथसंबंधे जग निवे ॥**

असे संतश्रेष्ठ एकनाथ महाराज सांगतात. याही कसोटीवर संतसाहित्य उतरते. सर्वांवर उत्तमोत्तम संस्कार करण्याची क्षमता त्यात आहे. कालानुरूप, नव्या नव्या अभ्यासकांना ज्ञानानंद आणि काव्यानंद दोन्ही एकत्र देण्याचे सामर्थ्य याच साहित्यात आहे. म्हणूनच शतकानुशतके संतसाहित्याचा अभ्यास, आकलन, परिशीलन येथे होत राहिले आहे. निष्कर्ष असा की, या साहित्याने आपल्याला धर्म दिला, सांगितला, शिकविला. त्याने संस्कृती दिली, साहित्य दिले. जीवनाचे प्रयोजन दिले. श्रद्धा दिल्या, सद्भाव जोपासले. जे अज्ञात त्याचा शोध घेण्यास प्रवृत्त केले. जे शाश्वत, चिरंतन

त्याच्या प्राप्तीचा ध्यास घेऊन जीवनात धन्यता, कृतार्थता कशी प्राप्त करून घ्यावी ? याचा मार्ग सांगितला.

## (१) संत ज्ञानदेव :

संत ज्ञानदेव हे या कुलाचे मुकुटमणी आहेत. सत्य, शिव आणि सुंदराचा अपूर्व आविष्कार म्हणजे ज्ञानदेव आहेत. लौकिक अर्थाने सर्व तऱ्हेचे प्रतिकूल जीवन जगत असतानाही ते समर्थपणे, संपन्नतेने आणि सुंदरतेने कसे जगावे ? याचे मार्गदर्शन ज्ञानदेवांनी 'भावार्थदीपिके'द्वारे केलेले आहे.

**दिसो परतत्त्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा ।**
**रिघो महाबोध सुकाळा- । माजी विश्व ॥ज्ञाने.१३.३४.११६३॥**

हा ज्ञानदेवांचा ध्यास होता. **'द्विजी वाळिले । जगी सांडियले । शेखी उपेक्षिले । आप्त वर्गी ॥'** असेच जीवन त्यांच्या वाट्याला आले होते. तरीही, 'सर्वांभूती समभाव पाहा' असाच धर्म त्यांनी सांगितला, शिकवला. **'मग आर्ताचेनि वोरसे । गीतार्थ ग्रंथनमिसे । वर्षला शांत रसे । तो हा ग्रंथु ॥ज्ञाने.१८.७८.१७६२॥'** हे वर्णन ज्ञानेश्वरीला जसे लागू पडते, तसेच ते ज्ञानदेवांच्या समग्र विचार-तत्त्वज्ञानाला, जीवनालाही लागू पडते. कारण **'जे धर्मजात आघवें । युगायुगीं मियाचि रक्षावें । ऐसा ओघु हा स्वभावें । आद्यु असे ॥ज्ञाने.४.१७.४९॥'** ही भगवंतांची प्रेरणा घेऊनच ज्ञानदेवही जन्माला आले होते. भगवंतांप्रमाणे त्यांनाही धर्मसंस्थापनाच करावयाची होती. त्यासाठी ज्ञानेश्वरीच्या रूपाने त्यांनी 'धर्मकीर्तन' सिद्ध केले. विशाल, व्यापक, विश्वकल्याणकारी धर्म त्यांनी लोकांना सांगितला, मुख्यतः तो आचरून दाखविला. विनोबाजी भावे यांनी ज्ञानदेवांच्या कार्याचे मोठे मार्मिक आलोडन केलेले आहे. ते सांगतात; ''ज्ञानाचा महिमा यत्किंचितही कमी न करता, कर्मयोगाला सुव्यवस्थित स्थान देऊन, स्वधर्माचा महिमा वाढवीत, वैराग्याचा उत्तम आधार घेऊन, योगाला जेथे कोपऱ्यात बसवायचे होते तेथे नीट बसवून, भक्तीचे परमामृत पाजीत त्यांनी हे 'धर्मकीर्तन' केलेले आहे.''

विनोबाजी याही पुढे जाऊन आग्रहाने सांगतात; '' 'धर्मग्रंथ' या नात्याने ज्ञानेश्वरीकडे बघाल तरच ज्ञानेश्वरीचे मर्म कळेल. ज्ञानेश्वरी हा उच्चतर जीवन



जगण्याची प्रेरणा देणारा ग्रंथ आहे.'' संतश्रेष्ठ नामदेव महाराज सांगतात; ''ज्ञानदेवांनी आपल्या अमोघ वाणीने अध्यात्मविद्येचे खरे रूप प्रकट केले आहे. त्यामुळे चैतन्याचा दीप उजळला गेला.'' संत जनाबाई सांगतात; ''ज्ञानाबाई आई होऊन, माझ्या मनीचे आर्त जाणून धावत आली. ही कळवळ्याची जाती काही वेगळीच आहे.'' तर संत रामाजनार्दन आपल्या आरतीमध्ये ज्ञानदेवांचा असा गौरव करतात की, **'लोपले ज्ञान जगी । हित नेणती कोणी । अवतार पांडुरंग । नाम ठेविले ज्ञानी ॥'** ज्ञानदेवांनी कोणती किमया केली ? तर **'प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केले ।'**. संत एकनाथ, संत तुकाराम यांसारख्या सर्व अधिकारसंपन्न संतांनीही ज्ञानदेवांबद्दल कृतज्ञता आणि कृतज्ञताच व्यक्त केलेली आहे.

ज्ञानदेवांनी केलेल्या 'धर्मकीर्तना'मुळे, त्यांनी दिलेल्या प्रेरणेमुळे संत चोखामेळा, संत सांवतामाळी, संत गोरा कुंभार अशा महान संतांची मांदियाळी महाराष्ट्रात उभी राहिली. सामान्यांतल्या सामान्य माणसाला एक नवी ऊर्जा प्राप्त झाली. प्रबळ आत्मविश्वास प्राप्त झाला. संतप्त झालेले सारे समाजमन शांत, तृप्त, समाधानी होऊन गेले. **'सबाह्य अभ्यंतरी स्वरूप कोंदले । चैतन्य चैतन्या मिळाले । अरूप रूप ठेले । आपणांमाजि ॥'** असा दिव्य अनुभव नामदेवादी संत घेऊ लागले. सर्व जाती-धर्मांतील संत-सत्पुरुषांच्या अंतर्यामी बोधदीप उजळून राहिले. चंद्रभागेच्या तीरावर पांडुरंगाच्या साक्षीने ही धर्मक्रांती घडू लागली. आजही ती घडते आहे. विश्वात्मक देवाजवळ ज्ञानदेवांनी मागितलेले 'पसायदान' हा नव्या युगाकरिता सांगितलेला धर्मविचारच आहे. ते संतधर्माचे महन्मंगल गुणगानच आहे. तमोगुणाकडून सत्त्वगुणाकडे, सत्त्वगुणाकडून स्वधर्माचरणाकडे, स्वधर्म-स्वीकाराने सर्वसुखप्राप्तीकडे आणि सर्वसुखलाभ करून घेऊन पूर्णतेकडे. म्हणजेच विश्वात्मक होऊन विश्वात्मक देवाचा भक्त होण्याकडे साधकाचा प्रवास झाला पाहिजे, असे ज्ञानदेवांचे मागणे आहे. **'हा होईल दानपसावो ।'** असा आशीर्वाद त्या सोज्ज्वळ परब्रह्माने दिलेला आहे. समदृष्टीने, वात्सल्याने, करुणाई होऊन ज्ञानेश्वर माउलीने साऱ्या विश्वावर जी मायेची पाखर घातली आहे, तिला जगाच्या धर्मविचारात तोड नाही.

## (२) संत एकनाथ महाराज :

ज्ञानदेवांनंतरच्या काळात, सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे प्रवर्तक म्हणून संत एकनाथ महाराजांना वंदन करावे लागते. सोळाव्या शतकामध्ये खऱ्या अर्थाने संतधर्म जागविण्याचे काम संत एकनाथ महाराजांनी केलेले आहे.

ज्ञानदेवांना पाहावा लागला, सोसावा लागला त्यापेक्षा अत्यंत बिकट काळ एकनाथ महाराजांना पाहावा, सोसावा लागला. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत परकीय सत्तेने प्रचंड उलथापालथ करून टाकली होती. राज्यकर्ते अत्यंत क्रूर, अन्यायी, जुलमी होते. त्यांच्या क्रूरपणाची प्रचंड दहशत जनतेच्या मनावर होती. मंदिरे उद्ध्वस्त करावीत, देवदेवतांच्या मूर्ती फोडाव्यात, जुलमाने धर्मांतर करवावे, स्त्रिया आणि संपत्ती लुटून न्यावी असे सारे प्रकार राजरोस चालत होते. सर्वसामान्य जनतेला कोणी त्राताच नव्हता. चोहोबाजूंनी आकाश फाटावे अशी दुर्दशा हिंदू समाजाच्या वाट्याला आलेली होती.

शूर-वीरांचे प्रतिनिधित्व करणारा जो क्षत्रिय समाज, तोच गुलामगिरीचे जीवन जगत होता. त्याचा आत्मविश्वास, पराक्रम लयाला गेला होता. स्वकीयांशी लढण्यात आणि परकीयांची चाकरी करण्यात त्याला धन्यता वाटत होती. ज्ञानी, विचारी, शहाणा म्हणविणारा वर्ग तोही अंधश्रद्धा, रूढी, परंपरा जपण्यात मशगूल होता. पढिक-पंडित शास्त्रे, पुराणे घोकत राहिले होते आणि सामान्य माणसे जडमूढ बनून पशुतुल्य जीवन जगत होती. अस्मिता विसरलेल्या, स्वाभिमानशून्य बनलेल्या या अगतिक समाजाला धीर देऊन टिकवून ठेवणे, हे सुद्धा मोठे अवघड काम झाले होते. त्यांची धर्मभावना सोज्ज्वळ, सात्त्विक बनवणे, तिला सत्याश्रयी करणे हे त्याहून अवघड कार्य होते. पण एकनाथ महाराजांनी हे अवघड कार्य मोठ्या धैर्याने स्वीकारले. जड जीवांचा उद्धार करण्याचे हे व्रत स्वीकारूनच ते या लोकी अवतरले होते.

**धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।**
**तैं आम्हां येणें घडे । संसारस्थिती ॥१॥**
**आम्हां कां संसारा येणें । हरिभक्ती नामस्मरणें ।**
**जड जीव उद्धरणें । नामस्मरणें करूनी ॥२॥**



**नाना मतें पाषांड । कर्मठता अति बंड ।**
**तयाचें ठेचणें तोंड । हरिभजने करोनी ॥४॥**
**एका जनार्दनीं । धरिती भेद मनीं ।**
**दुऱ्हावलें येथुनी । निंदक जाण ॥स.सं.ए.१७९०.६॥**

सर्व संतकार्याची रूपरेखा श्रीएकनाथ महाराजांच्या या अभंगात आलेली आहे.

प्रचंड आध्यात्मिक सामर्थ्य असलेले महापुरुष म्हणून नाथांच्या जीवनकार्याचा विचार करावा लागतो. तेही धर्मसंस्थापनेच्या कार्यासाठी देह धारण करून आले होते. नामस्मरणाचा उपाय सांगून जड जीवांचा उद्धार करावा, हे त्यांचे अवतार-प्रयोजन होते. स्वधर्माला आलेली ग्लानी दूर करावी, गुलामगिरीमुळे निःसत्त्व झालेल्या समाजाला पुन्हा सत्त्वसंपन्न करावे, समाजमनातील धर्मभावना तेजस्वी, बलवान करावी हा त्यांना लागलेला ध्यास होता. सौजन्य, सत्य आणि दया यांवर आधारित धर्मभावना त्यांनी प्रज्वलित केली. ज्ञानदेवांनी सांगितलेला धर्मविचार, एकनाथांनी सगुण-साकार करून आचरून दाखवला. **'दया तेथे धर्मु । धर्मु तेथे सुखागमु । सुखी पुरुषोत्तमु । असे जैसा ॥ज्ञाने.१८.७८.१६३५॥'** या ज्ञानदेवांच्या धर्मविचाराचा परमोत्कर्ष संत एकनाथांच्या जीवनचरित्रात, तत्त्वज्ञानात झालेला पाहावयास मिळतो. परमार्थ करावयाचा म्हणजेच शुद्ध धर्माचरण करायचे.

**कां फेडित पाप ताप । पोखित तीरींचे पादप ।**
**समुद्रा जाये आप । गंगेचे जैसे ॥ज्ञाने.१६.०३.१९९॥**
**कां जगाचें आंध्य फेडित । श्रियेचीं राउळे उघडित ।**
**निघे जैसा भास्वत । प्रदक्षिणे ॥ज्ञाने.१६.०३.२००॥**

गंगा नदी जशी जगाचे पाप-ताप नाहीसे करीत वाहते आणि त्याच वेळी काठावरच्या झाडांचे पोषण करीत पुढे जाते. किंवा सूर्य जसा अंधार नाहीसा करतो व त्याच वेळी तो जगाला ऐश्वर्य आणि प्रकाश देत, सहज सकल जनांचा उद्धार करीत जीवनशक्ती देत प्रवास करीत असतो. त्याप्रमाणे कर्तव्यनिष्ठेला प्राधान्य देऊन, दैवी संपत्तीचा आश्रय करीत जीवन जगावे, असा आचारधर्म

ज्ञानदेवांनी शिकविला होता. अशा वर्तनाने भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही प्रकारची उन्नती होत जाते. व्यापकता आणि उदारता या दोन्ही गोष्टी आपोआप साध्य होतात. भूतदया, परोपकार यांवर खरा धर्म आधारलेला आहे. परमार्थ करायचा म्हणजे सर्वथा द्वेष, मत्सर, कुटिलता, स्वार्थ बाजूला करून शुद्धातिशुद्ध मनाने जीवन जगायचे. अशा भाविकाला मग देव आपणहून भेटतो असा सिद्धांत सारेच संत सांगतात. हा विचार एकनाथ महाराजांनी सामान्य जनांपर्यंत तळमळीने पोहोचविला. एकनाथी भागवताच्या नवव्या अध्यायात ते परखडपणे लिहितात;

**गृहाश्रमु न सांडितां । कर्मलेखा नोलांडितां ।**
**निजव्यापारीं वर्ततां । बोधु सर्वथा न मैळे ॥ए.भा.९.३१.४३५॥**

गृहस्थाश्रमात जरूर राहा, तो पत्करा, तो आनंदाने करा. प्रारब्धाप्रमाणे प्राप्त होणारी सुख-दुःखे, तीही शांतपणे स्वीकारा. पण स्वधर्माचरण प्रामाणिकपणे करा. आपण परमार्थ साधण्याकरिता या जगात आलो आहोत हा बोध विसरू नका. **‘परमार्थे साधे सहज संसार । येथ येरझार नाही जना।’** आणि **‘सहज संसारे घडे परमार्थ । लौकिक विपरीत अपवाद ॥’** असा अनुभवसिद्ध तत्त्वविचार ते लोकांना सांगतात. प्रपंच वेगळा आणि परमार्थ वेगळा अशी विभागणीच चुकीची आहे. येथे अट्टहास सोडा. अविवेक दूर करा. शुद्ध अंतःकरणाने जीवन जगा. वासनांच्या आहारी जाऊ नका. मद्यमद, धनमद, स्त्रीमद यांच्या प्रभावात सापडू नका, अडकू नका. अभिमान, ताठा सोडून द्या. निर्वैर व्हा. गुरुकृपा आणि सत्संग साधा. मग प्रपंच आणि परमार्थ एकरूप होऊन जातील.

संत एकनाथ महाराज ज्ञानी असून भक्त होते. विद्वान पंडित असून साधे-भोळे वारकरीही होते. कर्मनिष्ठ तर होतेच, पण समाजसुधारकही होते. लोकसंग्रही असून अनाग्रही, अनिंदक होते. साहित्यिक असून निर्मत्सरी होते. गृहस्थ असून सद्गुणांचा महामेरू होते. सर्वार्थाने ते आदर्श संत होते. माणसाचे श्रेष्ठपण त्याचा मतांपेक्षा आचरणावर अवलंबून असते. माणसाच्या अंतर्यामी दुष्टता, कुटिलता असते. ती नाहीशी झाली पाहिजे. **‘मन शुद्ध जालिया गृहीच देव असे । भाविकासी दिसे बैसल्या ठायी ॥’** हा



श्रीजनार्दनस्वामींनी एकनाथ महाराजांना केलेला बोध होता. तो एकनाथांनी सर्वार्थाने आचरून दाखविला.

एकनाथ महाराजांनी संत-गौरव आणि सद्गुरु-गौरव अगदी मुक्तकंठाने केलेला आहे. गुरुकृपा साधा व सत्संग सांभाळा; असाही श्रीएकनाथ महाराजांचा आग्रह आहे. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, असंख्य अभंग यांतून तो जागोजागी प्रकट झालेला आहे. संतांचे श्रेष्ठत्व सिद्ध करताना ते सांगतात;

**संत आधीं देव मग । हाचि उगम आणा मनी ॥१॥**
**देव निर्गुण संत सगुण । म्हणोनि महिमान देवासी ॥२॥**
**नाम रूप अचिंत्य जाण । संतीं सगुण वर्णिलें ॥३॥**
**मुळीं अलक्ष लक्षा न ये । संतीं सोय दाविली ॥४॥**
**एका जनार्दनीं संत थोर । देव निर्धारे धाकुला ॥स.सं.ए.१४९०.५॥**

देव निर्गुण निराकार आहे, त्याचे नाम-रूप अचिंत्य आहे, तो सर्वार्थाने अलक्ष्य आहे. संत हेच सगुण भगवंताचे रूप आहे. त्यांनी देवाला देवत्व दिले. त्याचा महिमा तुम्हां-आम्हांला समजावून दिला. तो परमात्मा संतांचा अंकित आहे, म्हणून संतच श्रेष्ठ ठरतात. देव तुलनेने त्यांच्यापेक्षा छोटाच आहे. आणि सद्गुरूंचा गौरव करताना एकनाथ महाराज उत्कटतेने सद्गुरुमहती आणि त्यांचे कार्य कथन करतात;

**ओंकार स्वरूपा सद्गुरु समर्था । अनाथाच्या नाथा तुज नमो ॥१॥**
**गुरुराव स्वामी असे स्वयंप्रकाश । ज्यापुढे उदास चंद्र रवी ॥५॥**
**वेदां पडलें मौन शास्त्रें वेडावलीं । वाचा हे निमाली ते श्रीगुरु ॥७॥**
**श्रीगुरु जयासी पाहे कृपादृष्टी । तयासी हे सृष्टी पांडुरंग ॥८॥**
**प्रभुराज माझा स्वामी गुरुराव । देतो मज भाव शुद्ध भूमी ॥१८॥**
**भूमी शुद्ध करी ज्ञानबीज पेरी । अद्वैत हें धरी मी-तूं नेणें ॥१९॥**
**मजलागीं माझी सद्गुरु माउली । करी कृपा साउली वर्णू काय ॥२६॥**
**एका जनार्दनीं गुरु परब्रह्म । तयाचें पैं नाम सदा मुखी ॥स.सं.ए.१७९२.२९॥**

परमार्थ क्षेत्रातील संतमहिमा आणि सद्गुरुमहिमा श्रीएकनाथ महाराजांनी परोपरीने सर्वांना समजावून दिलेला आहे. **'एका जनार्दन'** ही त्यांची नाममुद्राच अतिशय बोलकी आहे. सद्गुरु जनार्दनांच्या कृपेमुळे एकनाथांना 'नाथपणा' प्राप्त झाला. त्या सामर्थ्यावर जनतेमधला जनार्दन एकनाथ महाराज पाहू शकले, अनुभवू शकले. एकनाथ महाराजांची गुरुपरंपरा ही श्रीदत्तउपासनेची. मलंगाच्या वेशात श्रीदत्तगुरूंची व एकनाथ महाराजांची भेट झालेली होती; पण मनात कसलाही विकल्प न ठेवता एकनाथ महाराज पंढरीची वारी करीत होते. भागवत धर्माची पताका त्यांनी हाती घेतली होती. 'एकनाथी भागवत', 'भावार्थ रामायण', 'रुक्मिणी स्वयंवर', 'असंख्य अभंग आणि भारुडे' यांद्वारे त्यांनी जनता जनार्दनाशी सलोकता, समीपता, सायुज्यता साधली. संत ज्ञानदेव महाराजांनी भक्तीचे वर्म सांगताना ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात सांगून ठेवले आहे;

**म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे ।**
**जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ ज्ञाने.९.२५.३७८॥**

भगवंतांच्या मुखातून प्रकटलेले हे भक्तीचे व भगवत्प्राप्तीचे रहस्य खऱ्या अर्थाने आचरून दाखविले ते एकनाथ महाराजांनी. एकनाथ महाराजांचे क्रांतिकारित्व आणखी एका आचरणात आहे. ज्या पैठणच्या विद्वान पंडितांनी ज्ञानदेव महाराजांचा पूर्ण अव्हेर केला होता, त्या ज्ञानदेव महाराजांचा एकनाथ महाराज त्या पैठण नगरीतच राहून मुक्त कंठाने गौरव करतात.

**कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर । तया नमस्कार वारंवार ॥ १ ॥**
**न पाहे यातिकुळींचा विचार । भक्त करुणाकर ज्ञानाबाई॥ स.सं.ए.३५१४.२॥**

किंवा;

**श्रीविष्णूचा अवतार । स्वामी माझा ज्ञानेश्वर ॥ स.सं.ए.३५२७.२॥**

श्रीज्ञानदेवांचा असा गौरव त्या आधी संत नामदेव महाराजांनी केला होता. त्या नामदेव महाराजांच्या मांदियाळीमध्ये एकनाथ महाराज स्वतःहोऊन सामील झाले. त्यांनी ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार केली. आळंदी येथील ज्ञानदेव महाराजांच्या समाधीचा शोध घेतला. हे सारे त्यांनी केलेले समाज-जागरण आहे. समाजाला सन्मार्ग दाखविणे आहे. लोभरहित, क्षोभरहित,



शोकरहित आणि दुःखरहित जीवन प्रपंचात राहूनही कसे जगायचे ? याचा आदर्श एकनाथ महाराजांनी आपल्या आचरणाने समाजापुढे ठेवला.

एकनाथ महाराजांपासून प्रेरणा आणि स्फूर्ती घेऊन, पुढे तुकाराम महाराज व समर्थ रामदास स्वामी परमार्थाच्या क्षेत्रात अवतीर्ण झाले.

### (३) संत तुकाराम महाराज :

महाराष्ट्र संतमंडळात सर्वांत अधिक लोकप्रिय व जनमानसावर प्रभाव असलेले संत म्हणजे तुकाराम महाराज होत. दोघा श्रेष्ठ धर्मपंडितांनी तुकाराम महाराजांबद्दल मांडलेली मते प्रथम सांगतो.

''अनन्यभक्ती व पारमार्थिक समता यांच्या मुशीत भागवत धर्माने ओतलेली सरस अशी सुवर्णमूर्ती म्हणजे तुकाराम महाराज होत. भागवत धर्माच्या हजारो वर्षांच्या परंपरेची पूर्ण परिणती तुकाराम महाराजांत झालेली होती'', असे तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात. तर, ''तुलसीदासांना जो आदर हिंदी भाषेच्या मुलखामध्ये दिला जातो, तोच मराठी मुलखामध्ये तुकाराम महाराजांना दिला जातो. तुलसीदासांची वचने उत्तरेत जशी घरोघरी पोहोचली आहेत, तसेच तुकाराम महाराज महाराष्ट्रातल्या घरोघरी सहज पोहोचले आहेत'', असे आचार्य विनोबा भावे सांगतात.

या दोन मान्यवरांनी मांडलेल्या विचारांतून तुकोबारायांची महती आपल्या पूर्ण लक्षात येते. हे दोघे विद्वान पंडित आहेत, प्रज्ञावंत आहेत. भारतीय धर्म-संस्कृती-परंपरा यांचा सर्वांगीण अभ्यास त्यांनी केला आहे. महाराष्ट्रीय विद्वत्तेची ही दोन उन्नत आणि उदात्त शिखरे आहेत. त्यांच्या विचारांत सारे काही आलेले आहे.

तुकाराम महाराज हे देहूच्या विश्वंभर बाबांच्या कुळात जन्माला आले. या कुळातील परंपरेने, प्रत्येक पिढीतील सत्पुरुषामार्फत वारकरी संप्रदाय तुकोबांपर्यंत चालत आला. पंढरीची वारी, भजन-कीर्तन, पारायण, संतसेवा या सर्व गोष्टींचे संस्कार तुकाराम महाराजांच्या बालमनावर झालेले होते. तो समृद्ध वारसाच तुकोबांच्या अंतर्यामी एकांती-लोकांती त्यांचे संरक्षण करीत होता. त्यामुळे आपण कोण आहोत ? कशासाठी या भूतलावर आलो आहोत ?

आपले कार्य-प्रयोजन कोणते ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे ते शोधीत राहिले होते. मनुष्य जन्माला येऊन आपण आत्महित साध्य केले पाहिजे, उद्धार करून घेतला पाहिजे हे भान त्यांना सतत देवसत्तेकडे, संतकार्याकडे आकृष्ट करीत होते. तुकोबारायांना या सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे सापडल्यावर ते गर्जना करून सांगतात;

**आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।**
**बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥१॥**
**झाडूं संतांचें मारग । आडरानें भरलें जग ।**
**उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ॥२॥**
**अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।**
**विषयलोभीं मनें । साधन हें बुडविलें ॥३॥**
**पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।**
**तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ॥तु.गा.३३८२.४॥**

या एकाच अभंगात सर्व संतांच्या अवतारकार्याचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. '**धर्माचे पाळण । करणे पाषांड खंडण । हेचि आम्हा करणे काम। बीज वाढवावे नाम ॥**' हे त्यांचे सहजस्फूर्त आत्मविश्वासाने भरलेले उद्गार संतधर्माचे परमोदात्त स्वरूप स्पष्ट करतात. तुकाराम महाराज त्याही पुढे जाऊन अधिक स्पष्टीकरण देतात;

**मागें बहुतां जन्मीं । हेंचि करीत आलों आम्ही ।**
**भवतापश्रमीं । दुःखें पीडिले निववूं त्यां ॥तु.गा.२१०४.१॥**

संतांची उत्तरे पाठ करता करता, आपल्याच मनाशी वाद-संवाद करता करता, अंतरीच्या दिव्य प्रेरणेने तुकाराम महाराजांना दिलेली ही उत्तरे आहेत.

तुकाराम महाराजांच्या काळात, सर्वत्र तथाकथित संत-महंतांचा सुळसुळाट झाला होता. तुकोबाराय सावध होते. येथेही खरे-खोटे पारखूनच घेतले पाहिजे हे भान त्यांना होते. म्हणून परखडपणे ते सांगतात;

**नव्हती ते संत करितां कवित्व । संतांचे ते आप्त नव्हती संत ॥१॥**
**येथें नाहीं वेश सरत आडनाव । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥२॥**



**नव्हती ते संत धरितां भोपळा । करितां वाकळा प्रावरणासी ॥३॥**
**नव्हती ते संत करतां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥४॥**
**नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥५॥**
**नव्हती ते संत करितां तप तीर्थाटन । सेविलिया वन नव्हती संत ॥६॥**
**नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्म उधळणें नव्हती संत ॥७॥**
**तुका म्हणे नाहीं निरसला देह । तोवरी आघवे संसारिक ॥तु.गा.२२९७.८॥**

श्रीसंत तुकाराम महाराज विचारतात; ''पोटावर चिरगुटे बांधून गर्भार असल्याचे सोंग करता येईल व डोहाळे लागल्याचे नाटकही करता येईल, पण स्तनांत दूध आणि पोटात पोर कसे आणता येईल ?'' लोकांना भुलविणारे, चमत्कार करणारे ते संत नव्हेत ! मठपती म्हणून मिरवणारे, केवळ शिष्यशाखा वाढविणारे, जडीबुटी देणारे ते संत नव्हेत. वादविवादांत पारंगत असलेले, भूत-भविष्य सांगणारे, डोईवर भणदी घेऊन हिंडणारे, देवीचा उदो उदो म्हणून गजर करणारे ते संत नव्हेत. तुकाराम महाराज निक्षून सांगतात की; ''हा सारा वेडाचार आहे. यांच्याबरोबर राहणे म्हणजे नरकातच राहण्यासारखे आहे.'' तुकोबाराय वैतागाने म्हणतात;

**जेथें जातों तेथें पडतों मतोळा । न दिसे डोळां लाभ कांहीं ॥ तु.गा.१५१९॥**

कारण तुकाराम महाराजांनी कुशाग्र बुद्धिमत्तेने, सर्वंकष विचार-मननाने, सूक्ष्म अवलोकनाने संतत्व म्हणजे नेमके काय असते ? कसे असावे लागते ? त्याचेही उत्तर प्राप्त केलेले होते. ते आकाशी हात उंचावून सांगतात;

**जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥१॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥२॥**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥३॥**
**ज्यासि अपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥४॥**
**दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥५॥**
**तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥तु.गा.२२०६.६॥**

ज्याच्याजवळ पाप-पुण्य, सुख-दुःख, लाभ-हानी, आपला-परका अशा भेदभावांना थाराच नाही तो संत ! ज्याने सांसारिक कामना, वासना

समूळ नष्ट केल्या आहेत तो संत ! सत्य-असत्य, जन-वन, चेतन-अचेतन या सर्व भेदांच्या पलीकडे जो गेला तोच संत ! असे संतपण बाजारात विकत मिळत नाही, धनाच्या राशी देऊन ते प्राप्त होत नाही, रानावनात राहून ते सापडत नाही, तर आपला जीवभाव ईश्वराच्या चरणी समर्पित करण्यानेच ते लाभते. समर्पण, शरणागतीच ईश्वराची प्राप्ती करून देते. **'शरणागत झालों । तेणें मीपणा मुकलों ॥तु.गा.३९३६.१॥'** असा तुकोबारायांचा स्वतःचाच अनुभव होता.

देव हा भक्तांकरिता नेहमीच दयाळू, कृपाळू आहे. तो माउलीहून मायाळ, स्नेहाळ आहे. त्याने सकळांचा भार घेतलेला आहे. तो सर्वांची चिंता वाहतो. नामस्मरणाने तो कोणालाही प्राप्त होऊ शकतो. संतकृपा-सत्संग त्यासाठी अधिक साहाय्यक होतो. तो साधावा. तुकाराम महाराजांसह सर्व संतांचे यावर एकमत आहे.

लौकिक जीवनात मोह, माया, ममता, स्वार्थ यांचा पगडा अधिक असतो. तो सोडला पाहिजे. भोग कितीही भोगले, तरी तेथे तृप्ती नाही. म्हणून सामान्याचे आकर्षण सोडून द्यावे व जे असामान्य, अलौकिक आहे त्याचा ध्यास घ्यावा, असे संतांचे सांगणे आहे. **'संसाराच्या नांवें घालूनियां शून्य । वाढता हा पुण्य धर्म केला ॥तु.गा.२१४०.१॥'** ही तुकोबारायांची अनुभूती आहे. **'सर्वस्वासी मुकावें तेणें हरिसी जिंकावें। (तु.गा.२७१३.१)'** हे तुकाराम महाराजांचेही सांगणे आहे. जीवनाचे परमसाध्य कोणते ? ते निश्चित झाले की, त्या प्राप्तीसाठी जे सामान्य आहे, ते सद्विचारी माणसाने टाकूनच दिले पाहिजे ही त्यांची भूमिका आहे. संतसेवेने, संतकृपेने आपला उद्धार झाला हे तुकोबाराय प्रांजळपणे पुनःपुन्हा सांगतात.

**संतांनीं सरता केलों तैशापरी। चंदनीं ते बोरी व्यापियेली॥तु.गा.२२६९.१॥**

हे संत-उपकार मान्य करण्यात तुकोबांना कमीपणा वाटत नाही. सकल मंगलाचा वर्षाव करणाऱ्या संतांनी आपल्याला सांभाळले. त्यांनी अंगीकार केला म्हणूनच तो देवदेवोत्तम पांडुरंग आपल्याला भेटला. आपले कल्याण झाले. आपण आनंदनिर्भर झालो. अंतरीचे सर्व भय संपून गेले, असे तुकाराम महाराज उत्कट शब्दांत सांगतात. संतकृपेमुळेच भागवत धर्माचे रहस्य तुकाराम



महाराजांना आकळू शकले आणि इतरेजनांना साध्या-सोप्या भाषेत ते महत्त्व तुकाराम महाराज सांगू शकले.

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥१॥**
**आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥२॥**
**कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ॥३॥**
**तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे ॥तु.गा.३८६५.४॥**

हा उपदेश म्हणजे भागवत धर्माचे सार-सर्वस्व आहे.

### (४) श्रीसंत समर्थ रामदास स्वामी :

सतराव्या शतकात महाराष्ट्रात जे थोर महापुरुष झाले, त्यांत समर्थ रामदास स्वामींचा अत्यंत आदराने उल्लेख करावा लागेल. चौऱ्याहत्तर वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य रामदास स्वामींना लाभले होते. इसवी सन १६०८ चा त्यांचा जन्म. इसवी सन १६१६ ते १६३२ या काळात, नाशिकजवळ टाकळी येथे राहून त्यांनी खडतर तपश्चर्या केली. **'सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥ स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥म.बो.४९॥'** असे त्यांनी मनोबोधात केलेले उत्तम भक्ताचे वर्णन त्यांच्या साधक-जीवनाला पूर्णपणे लागू पडते.

**गुप्त तेचि प्रगटावे । असाध्य तेचि साधावे ।**
**कानडेचि अभ्यासावे । सावकाश ॥**

हा ध्यास त्यांना लहानपणापासूनच लागला होता. पार्थिवाकडून परतत्त्वाकडे आपल्याला जायचे आहे, ही जाणीव त्यांना बालवयापासूनच स्वस्थ बसू देत नव्हती. बारा वर्षांच्या तपश्चर्येच्या काळात, 'हे सारे विश्व ब्रह्ममयच आहे' असा साक्षात्कार त्यांनी करून घेतला होता. त्यांच्या ठिकाणी देहबुद्धीचे आत्मबुद्धीत पूर्ण रूपांतर झालेले होते. त्यांच्या इतका विवेकी, विरागी, जनहित-तत्पर संत तुलनेने दुसरा कोणी झालेला नाही, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. साधनाकाल पूर्ण झाल्यानंतर, इसवी सन १६३२ ते १६४४ अशी बारा वर्षे त्यांनी भारत-भ्रमण केले. सारी समाजस्थिती उघड्या डोळ्यांनी पाहिली. काय पाहावे लागले त्यांना ?

सारा भारत अर्थहीन, कळाहीन, अविवेकी बनला होता. परकीयांची आक्रमणे होत होती. लोक सतत भयभीत होऊन कसेतरी, पशुसमान जीवन जगत होते. पराभूत मनोवृत्तीने ग्रासून गेले होते. धर्ममंदिरे तोडली-फोडली जात होती. देवदेवता, स्त्रिया यांची क्रूर विटंबना होत होती. अन्याय, अत्याचार, लुटालूट, जाळपोळी ठिकठिकाणी होत होत्या. दुष्काळ पडल्याने खायला अन्न नाही, ल्यायला पटकूर नाही, असे करंटेपण असंख्यांच्या नशिबी आले होते. दैन्यवाणे बापुडेपण सर्वजण अगतिक होऊन भोगत होते. पुरे-पट्टणे, हाट-बाजारपेठांना उकिरड्यांची अवकळा आली होती. बहुतेक सारा समाज विकारी-भिकारी होऊन जगत होता. ते सर्व पाहून समर्थ उद्गारतात; **‘चिंतेने ऊर फाटतो ।’**. या एका वाक्यातच समर्थांच्या अंतर्यामीचे दुःख प्रकट झाले आहे.

हे चित्र बदलले पाहिजे. येथील प्रत्येक नागरिक आचारवंत, विचारवंत, जयवंत, यशवंत झाला पाहिजे. या समाजमनात सर्वत्र धीरता, वीरता प्रकटली पाहिजे. या समाजमनाचा आत्मविश्वास जागा केला पाहिजे. तो महत्त्वाकांक्षी, धीरगंभीर झाला पाहिजे; असा नवा ध्यास समर्थांच्या अंतर्यामी श्रीरामकृपेनेच निर्माण झाला. **‘देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।’** असा आदेश समर्थ रामदास स्वामींना मिळू लागला. **‘राघवाचा वर लाधलो सत्वर । जनाचा उद्धार करावया ।।’** ही जाणीव प्रबळ होत राहिली.

समर्थांनी मनाशी निर्धार केला;

**राघवाची पदे मानसी धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रे ।।**

**हेळामात्रे मुक्त करीन या जना । तरीच पावना राघवाचा ।।**

या जनसामान्यांना जो ऐहिक उत्कर्षाची व पारलौकिक सुखाची चेतना देतो, असा खरा धर्म सांगण्यास ते सरसावले. जवळ जवळ तीन तपे म्हणजे छत्तीस वर्षे अखंडपणे या ध्यासाने ते आसेतु-हिमालय अथक परिश्रम करीत धर्मसंस्थापनेचेच कार्य करीत राहिले. ‘धर्म’ म्हणजे लोकांना धारण करतो तो. पुण्यवान लोकांकडून जो धारण केला जातो तो. समाजाला आधार देणे, उचलून धरणे, त्याचे पोषण करणे हेच धर्माचे खरे स्वरूप आहे. इह-पर कल्याण साधण्यासाठीच त्याचे आचरण करावयाचे असते, हे लोकांना सांगण्या-शिकविण्यासाठी ते सर्वत्र संचार करू लागले.



**दुर्लभ शरीर, दुर्लभ आयुष्य । त्याचा करू नये नाश ।**

**दास म्हणे सावकाश । विवेक पाहावा ।।**

त्यांच्या भजन-कीर्तनाचे मुख्य सूत्र ठरले. दासबोधातील ‘निःस्पृह लक्षण’, ‘उत्तम पुरुष लक्षण’ या साऱ्या समासांमधून त्यांना आदर्श नेता, आदर्श संत-महंत घडवायचा होता, हे आपल्या लक्षात येईल. आधी माणूस घडवा, कुटुंब घडवा मग समाज आणि राष्ट्र आपोआप घडेल; हेही एक महत्त्वाचे विचारसूत्र आहे. ते योग्यही आहे. समाजाचे नेतृत्व सांभाळायला उत्तम पुरुष, आदर्श पुरुषच हवा. मग त्या समाजात अनीती-अवनीती घडत नाही. सारा समाज सतेज होतो, राष्ट्र बलवान होते.

**जेणे परमार्थ ओळखिला । तेणे जन्म सार्थक केला ।।**

हा विचार तर सत्य आहेच. पण केवळ मूर्तिपूजा, मठा-मंदिरांची समृद्धी म्हणजे परमार्थ नव्हे. शाश्वत-अशाश्वताचा विचार करा. देहबुद्धीने बांधलेल्या मनाला, बुद्धीला विवेकाने मुक्त करा. संशयरहित, संदेहरहित अशी अवस्था प्राप्त करून घ्या. जे मिथ्या ते टाकून द्या. समग्र जगत् ब्रह्ममय, चैतन्यमयच आहे आणि तदंगभूत आपण, तेही तसेच आहोत हे अनुभवा. असत्य त्यागून सत्य स्वीकारण्याने हे आकळते. विवेक-वैराग्याचा आश्रय करा. लोभ, मोह, अहंकार संपवून टाका. मूळ मायेपलीकडील जे ब्रह्मपद ते प्राप्त करून घ्या. ते निर्गुण, निराकार, परिपूर्ण तसेच अधिष्ठानरूप आहे. त्यालाच ‘परब्रह्म’ असे म्हणतात.

हे समग्र विचार, हे तत्त्वज्ञान आपल्या संत-परंपरेचेच आहे. पण त्याच्या प्राप्तीसाठी आणि उपासनेसाठी समर्थांनी लोकांना श्रीरामाची आणि हनुमानाची उपासना सांगितली. श्रीराम हा मानवी जीवनाचा महत्तम आदर्श आहे. तो महावीर, महाधीर, पूर्णप्रतापी आहे. तो कोदंडधारी आहे. तो धर्ममूर्ती आहे. सर्व दुःख- संकटांचा नाश करणारा आहे. लोककल्याण-जनकल्याण हा श्रीराम-जीवनाचा प्रमुख हेतू आहे. समर्थांचा हनुमान हा सुद्धा भीमरूपी, महारुद्र आहे. पुण्यवंत, पुण्यशील आहे. तो बुद्धिदाता आहे. तो सामर्थ्य देतो. साधकाने आपल्या जीवनातील दुर्बलता, भयग्रस्तता टाकून जे उत्कट, भव्य

आहे तेच घ्यावे. निश्चयाचे समाधान प्राप्त करून घ्यावे. हे सर्व साधन करताना प्रत्येकाने कसे वागावे ? तर;

**दुसऱ्याचे अंतर जाणावे । तदनुसारचि वर्तावे ।**
**लोकांस परीक्षित जावे । नाना प्रकारे ॥**
**स्वये आपण कष्टावे । बहुतांचे सोसित जावे ।**
**झिजोनी कीर्तीस उरवावे । नाना प्रकारे ॥**
**दुसऱ्याचे दुःखे दुखवावे । दुसऱ्याच्या सुखे सुखवावे ।**
**अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥**

हेही समर्थ रामदास स्वामी शिकवितात.

समर्थांचा **'दासबोध'** हा महाराष्ट्राच्या स्वतंत्र संस्कृतीचा पहिला स्वतंत्र ग्रंथ आहे. समर्थांनी महाराष्ट्राची अस्मिता जागृत केली. नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा समर्थांच्या रोमरोमांत वसत होती. एका थोर विचारवंताने समीक्षा करताना म्हटलेले आहे; ''समर्थ रामदास स्वामी जातीने ब्राह्मण म्हणून जन्माला आले नसते, तरी त्यांच्या विचार-कार्यात काहीही फरक पडला नसता. त्यांनी आपल्या धगधगत्या विचारांनी त्यांना हवी होती ती क्रांती घडवून आणलीच असती. समाजातील दैन्य, दारिद्र्य, जडमूढता नाहीशी व्हावी यासाठीच त्यांनी आपली काया झिजविली असती. 'राष्ट्र' घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ होते, हे आपण अमान्य करू शकत नाही. **'पतित हे जन करावे पावन ।'** हाच ध्यास त्यांना लागला होता. विचार-जागरण, समाज-जागरण हा त्यांचा खरा परमार्थ होता. **'पतित हे जन करावे पावन । तेथे अनुमान करू नये ।'** हे त्यांचे ब्रीद होते. **'वन्ही तो चेतवावा रे । चेतविताच चेततो । विवेक जाणिजे तैसा । वाढविताचि वाढतो ॥'** **'केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ॥'** **'यत्न तो देव जाणावा। अंतरी धरिता बरे ॥'** हा त्यांचा अनुभव होता, विश्वास होता.

**धीर्धरा धीर्धरा तकवा । हडबडू गडबडू नका ।**
**काळ देखोनि वर्तावे । सांडावे भय पोटीचे ॥**

तत्कालीन समाजमनाला हा दिलासा देण्यासाठीच ते आले होते. पतितपावन, दयासिंधू, अनाथबंधू अशा श्रीरामाचे ते दास होते.



समर्थ रामदास व संत तुकाराम महाराजांच्या या शिकवणुकीतून प्रेरणा घेऊनच संत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, विनोबाजी भावे हे आधुनिक काळातील संतश्रेष्ठ पुढे आले. त्या सर्वांनी समाजमन घडविण्याचेच प्रयत्न केले. आधुनिक काळातील संतांना अपेक्षेएवढे यश आले नाही हे खरे आहे; पण त्याचा अर्थ ते संत पराभूत झाले असा होत नाही. किंवा आता नव्या युगात संतकार्याला फारसे महत्त्व उरलेले नाही असाही निष्कर्ष काढता येणार नाही.

आजच्या समाजजीवनात अशांतता, अतृप्ती, स्पर्धा, असूया, द्वेष-मत्सर या दुर्गुणांना ऊत आला आहे. अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी रोज वाढत चालली आहे. गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी वाढतेच आहे. सत्तापिपासा सर्व थरांत वाढते आहे. परिवर्तन घडते आहे, पण ते विनाशाकडे नेत आहे. विध्वंस अमर्याद घडतो आहे. आत्मसामर्थ्य आणि मांगल्यभावना लोप पावते आहे. या समाजाला कोण वाचवेल ? कोण त्याचे सांत्वन करेल ? कोण त्याला दिशा देईल ? पुन्हा एकवार आपण संतसाहित्याकडे वळले पाहिजे, ते समजून घेतले पाहिजे. हेच एक उत्तर सर्वत्र दिले जात आहे.

□□

● BAPRAKHUMADEVIVARU [बापरखुमादेविवरु] ●

A spiritual & philosophical Marathi monthly magazine, Edited & Published by Prof. Shireesh Shantaram Kawade, at Shreewamanraj Prakashan, 'Shreegurukrupa', ShreeSant Mamasaheb Deshpande Path, Anandnagar, Sinhagad Road, Pune - 411 051, Phone : (020) 24351840; on behalf of ShreeJnanadev Siddhabet Tapovan, Jnana-Yoga-Adhyatma Vidyapeeth Pratishthan, Alandi, Dist. Pune. Printed by Mr.Rajwardhan Gaddam, at Samarth Offset, Plot No. 18, Hingne home colony, Karvenagar, Pune - 411 052.

Pune : 07.06.09

RNI NO. : MAH MAR/2001/6694 & PNCW / M-161 / 2009-2011